पुणे, मंगळवार, ६ मे २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 157 • वर्ष ४ थे, अंक १५७ • किंमत ₹ ६ • पाने : १२



पालिकेचा आरोग्य विभागच 'आयसीयु' मध्ये...! P3

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



१२ टीम इंडियाचा आयसीसीमध्ये दबदबा

## At a Glance

### पीओपीवरील बंदी कायमच

**मुंबई :** प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) वापरावरील बंदी संदर्भात राज्य सरकारनं केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे (सीपीसीबी) काकोडकर समितीचा अहवाल ५ मे रोजी पाठवला आहे. त्यावर उत्तर देण्यासाठी सीपीसीबीनं मुंबई उच्च न्यायालयाकडं वेळ मागितल्यामुळं यासंदर्भातील सुनावणी ९ जूनपर्यंत तहकूब करण्यात आली आहे. त्यामुळं यंदाच्या

» पान ७ वर

### कार्गो विमान सेवेत गांजा तस्करी

**नागपूर :** डॉ बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय नागपूर विमानतळावरील कार्गोच्या पार्सलमध्ये १० किलो गांजा आढळून आला आहे. यापूर्वी रेल्वे आणि बसच्या माध्यमातून गांजा तस्करी केली जायची. मात्र, आता विमान कार्गो पार्सलच्या माध्यमातून गांजा तस्करीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आली आहे. ओडिसावरून हा गांजा उत्तरप्रदेशमध्ये तस्करी करण्यात येत होता.

» पान ७ वर

# हुर्रे! मुलींचीच बाजी

## राज्याचा बारावीचा निकाल ९१.८८ टक्के

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्याचा इयत्ता बारावीचा निकाल ९१.८८ टक्के लागल्याचे जाहीर करण्यात आले असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनीच बाजी मारली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये उच्च माध्यमिक प्रमाणपत्र अर्थात बारावीची परीक्षा घेण्यात आली होती. सोमवारी दुपारी १ वाजता बारावीचा निकाल जाहीर करण्यात आला.

राज्याचा निकाल ९१.८८ टक्के लागल्याचे जाहीर करण्यात आले आहे. तर दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनीच बाजी मारली असल्याचे शिक्षण मंडळाकडून जाहीर करण्यात आले.

शिक्षण मंडळाने पत्रकार परिषदेच्या माध्यमातून दिलेल्या माहितीनुसार, पुणे, नागपूर, छत्रपती



### पैकीच्या पैकी कोणालाच नाही

● महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर झाला. मागील वर्षापेक्षा यंदा कमी निकाल लागला आहे. तसेच यंदाच्या निकालात शंभर टक्के कोणालाही मिळवता आले नाही. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बारावीचा निकाल जाहीर होण्याची मंडळाच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ आहे. यंदा मंडळाने बारावीच्या परीक्षाही लवकर घेतल्या होत्या. बारावीत शंभर पैकी शंभर गुण मिळवणारा एकही विद्यार्थी नाही. परंतु शंभर टक्के निकाल लागलेली अनेक महाविद्यालये आहेत. राज्यातील १ हजार ९२९ कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. तसेच ९० ते ९९.९९ टक्के निकाल लागलेली महाविद्यालये ४ हजार ५६५ आहेत.

### विभागीय निकाल

| | | | |
|---|---|---|---|
| पुणे | ९१.३२ | कोल्हापूर | ९३.६४ |
| नागपूर | ९०.५२ | अमरावती | ९१.४३ |
| छत्रपती संभाजीनगर | ९२.२४ | नाशिक | ९१.३१ |
| | | लातूर | ८९.४६ |
| मुंबई | ९२.९३ | कोकण | ९६.७४ |

### ३८ महाविद्यालयांचा शून्य टक्के निकाल

● राज्यात १० हजार ४९६कॉलेजातून विद्यार्थी बसले होते. त्यात शून्य टक्के निकाल लागलेली महाविद्यालये ३८ आहेत. यंदा निकाल मागील वर्षाच्या तुलनेत कमी लागला आहे. फेब्रुवारी मार्च २०२४ चा निकाल ९३.३७% होता. फेब्रुवारी मार्च २०२५ चा निकाल ९१.८८ टक्के लागला आहे. निकालाचा टक्का १.४९ ने कमी झाला आहे. यंदा २० हजार ९४३ विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स किंवा स्काऊट गाईडचे गुणे मिळाले आहेत. यंदा तृतीयपंथी १८ विद्यार्थी बसले होते.

झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या ७३.७३ टक्के इतकी आहे. तर पुर्नपरीक्षा अर्थात ४२ हजार २४ रिपीटर्स विद्यार्थ्यांनी यंदा परीक्षा दिली होती. त्यापैकी १५ हजार ८२३ रिपीटर्स विद्यार्थी उत्तीर्ण

» पान ७ वर

# रेपो दर कमी होणार?

## स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अहवालात शक्यता व्यक्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** स्टेट बँक ऑफ इंडियाने एक अहवाल प्रसिद्ध केला असून, या अहवालामध्ये येत्या काळात रिझर्व्ह बँक रेपो रेटमध्ये मोठी कपात करण्याची दाट शक्यता असल्याचा अंदाज वर्तवला आहे. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये आरबीआय आक्रमक व्याज दर कपात करेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. महागाई नियंत्रणात असल्याने हे शक्य असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अहवालात म्हटलंय की, जून आणि ऑगस्टच्या पहिल्या सहामाहीमध्ये रेपो रेट ७५ बेसिस पॉइंटनी तर दुसऱ्या सहामाहीमध्ये ५० बेसिस पॉइंटनी कमी केला जाऊ शकेल, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. म्हणजे एकूण मिळून १२५ अंकांची रेपो रेटमध्ये कपात होऊ शकेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

अर्थकारण

ग्राहक मूल्य निर्देशांक ६७ महिन्यांच्या नीचांकी स्तरावर म्हणजेच ३.३४ टक्क्यांवर आला आहे. हा निर्देशांक वस्तू आणि सेवांच्या किमतींमध्ये होणाऱ्या बदलांवर



आधारित असतो आणि तो सामान्य कुटुंबांनी खरेदी केलेल्या वस्तू आणि सेवांच्या किमतींमध्ये बदल दर्शवत असतो. खाद्यपदार्थांची चलनवाढ ही नियंत्रणात असल्याने ग्राहक मूल्य निर्देशांक खाली येण्यास मदत झाली आहे. ही सगळी परिस्थिती पाहिल्यानंतर रेपो रेट कमी करण्यासाठी पोषक वातावरण तयार झाले असल्याचे मत एसबीआयने नोंदवले आहे. येत्या काळात १५०-१७५ अंकांनी रेपो रेट कमी होऊ शकतो असा अंदाज आहे. जर रिझर्व्ह बँकेने ५० बेसिस पॉईंटने रेपो रेट कमी केला तर आरबीआयकडून दिला गेलेला तो सगळ्यात मोठा सकारात्मक संकेत असेल असे या अहवालात म्हटले आहे.

# सर्वोत्तम पॅकेज देऊन भूसंपादन

## शेतकऱ्यांवरील गुन्हे चौकशी करुन मागे घेऊ - महसूलमंत्री बावनकुळे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुरंदर विमानतळासाठी शेतकऱ्यांनी जमीन देण्यास नकार देण्याऐवजी, त्यांना जो मोबदला अपेक्षित आहे, त्यासह आपण आपल्या मागण्या सरकारकडे सात दिवसांत मांडण्याचे आवाहन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. कोणत्याही स्वरूपाचा अन्याय सरकार शेतकऱ्यांवर करणार नाही. या विमानतळामुळे पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाला चालना तसेच, भागातील तरुणांचे हाताला काम मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बावनकुळे म्हणाले;पुरंदर विमानतळासाठी भूसंपादनाला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध आहे. पण हा प्रकल्प नागपूरच्या मिहान प्रकल्पाप्रमाणे, पुरंदर विमानतळ पश्चिम महाराष्ट्राचे चित्र बदलेल. शेतकऱ्यांनी सात दिवसांत त्यांच्या मागण्या कळवाव्यात. जमिनीची किंमत, पुनर्वसन, किंवा इतर सुविधांबाबत अपेक्षा स्पष्ट कराव्यात. शासन सर्वोत्तम पॅकेज देण्यासाठी तयार आहे. निरपराध शेतकऱ्यांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यासाठी चौकशी करून निर्णय घेऊ. पण पुरंदर विमानतळ प्रकल्प राष्ट्रीय आणि राज्याच्या विकासासाठी अत्यावश्यक आहे, तो झाला पाहिजे

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनाच्या विषयात जिल्हाधिकारी कार्यालयात येथील सात गावातील शेतकऱ्यांसोबत सुमारे दोन तास बावनकुळे यांनी चर्चा केली. त्यांचे म्हणणे समजून घेतले. राज्यातील अन्य विकास प्रकल्पांचा विस्तार, त्या भागातील विकास याबाबत उदाहरणांसह चर्चा महसूल मंत्र्यांनी केली.

» पान ७ वर

### आंदोलनातील गैरसमज आणि आरोप

● आंदोलनादरम्यान काही गैरप्रकार घडल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. यावर बावनकुळे म्हणाले, "काही लोकांनी व्हॉट्सअॅपवर चुकीचे दर जाहीर करून गैरसमज पसरवले. शासनाची भूमिका पारदर्शक आहे. आम्ही शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देऊ." त्यांनी आंदोलनात बाहेरील लोकांचा सहभाग असल्याचा आरोप फेटाळला. चौकशीतून सत्य बाहेर येईल. दलालांनी जमिनी विकत घेतल्याच्या आरोपांवर ते म्हणाले, " असे झाल्याचे दिसत नाही. पण या प्रकरणाची चौकशी करू. पण एक-दोन दलालांमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाही."



पुरंदर येथील भूसंपादनाचे सर्वेक्षण सध्या थांबवण्यात आले आहे. "शेतकऱ्यांच्या भावनांचा आदर करून आम्ही सर्वेक्षण थांबवले आहे. पुढील १५ दिवसांत शेतकऱ्यांशी चर्चा करून मार्ग काढला जाईल."

**— चंद्रशेखर बावनकुळे,** महसूलमंत्री

### एजाज खानवर अटकेची तलवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अभिनेता एजाज खानवर अटकेची टांगती तलवार आहे. मुंबईच्या चारकोप पोलीस ठाण्यात एजाज खानविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांची पथकं त्याचा शोध घेत आहेत. त्यामुळं एजाज खानला आता कोणत्याही क्षणी अटक होऊ शकते. दरम्यान, 'हाउस अरेस्ट' या ओटीटीवरील शोवरून एजाज खानवर गुन्हा दाखल झालेला असतानाच, आता त्याच्याविरोधात बलात्काराचा गंभीर गुन्हा दाखल झाला आहे. याच शोमध्ये काम देण्याचं अमिष दाखवून एजाज खाननं बलात्कार केल्याचा आरोप एका ३० वर्षीय महिलेनं केला आहे.

तक्रारदार महिला एक अभिनेत्री असून तिनं यासंदर्भात चारकोप पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दिली आहे. 'उल्लू' या ओटीटी ॲपवर सुरू असलेल्या 'हाऊस

» पान ७ वर

# 'वक्फ' याचिकांवर खंडपीठ सुनावणी करणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** वक्फ सुधारणा कायद्याबाबत दाखल केलेल्या याचिकांवरची सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने आज पुढे ढकलली आहे. आता न्यायालय १५ मे रोजी या प्रकरणाची सुनावणी करणार आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना म्हणाले की, या प्रकरणाची सविस्तर सुनावणी होणे आवश्यक आहे.

आता पुढील सरन्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई यांच्यासमोर या प्रकरणाची सुनावणी होईल. यादरम्यान, सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या निवृत्तीबद्दल सॉलिसिटर जनरल तुषार मेहता भावनिक झाले. सरन्यायाधीश खन्ना १३ मे रोजी निवृत्त होत असून त्यांच्या निवृत्तीनंतर दुसऱ्याच दिवशी नामनिर्देशित





सरन्यायाधीश गवई त्यांच्या जागी नियुक्त सरन्यायाधीश गवई यांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होताच सरन्यायाधीश म्हणाले, 'तुम्ही (केंद्र) काही बाबी हाताळल्या आहेत, पण त्यासाठी स्पष्टीकरण ाची गरज आहे. मला या अंतरिम टप्प्यावर कोणताही निर्णय किंवा आदेश राखून ठेवायचा नाही. या प्रकरणाची सुनावणी लवकर ात लवकर व्हावी लागेल आणि हे माझ्यासमोर राहणार नाही. आम्ही (केंद्राच्या) प्रतिप्रतिज्ञापत्रात फार खोलवर गेलो नाही. होय, तुम्ही (वक्फ मालमत्तेच्या) नोंदणीसंदर्भात काही मुद्दे उपस्थित केले आहेत आणि काही वादग्रस्त आकडेवारी दिली आहे, ज्याचा थोडा विचार करणे आवश्यक आहे, असे सरन्यायाधीश म्हणाले. प्रत्येक वादाला उत्तर असल्याने आम्हाला तुमच्या (सरन्यायाधीशांचा) पाठपुरावा करायला आवडेल, असे केंद्र सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सरन्यायाधीशांच्या निवृत्तीचे संकेत देताना सांगितले.

आपल्या अधिपतीपदाची (निवृत्तीची) आठवण

» पान ७ वर

### पुतीन यांचा पंतप्रधान मोदींना फोन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला आहे. संपूर्ण जग भारत आता काय कारवाई करतोय, याकडे लक्ष ठेऊन आहे. या पार्श्वभूमीवर रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी सोमवारी ५ मे रोजी स्वतःच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोनवरून संपर्क साधला. यावेळी चर्चेत दहशतवादविरोधी लढाईत रशिया भारताच्या पूर्ण पाठिशी असल्याचे पुतीन यांनी मोदींना सांगितले आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने याबाबतची माहिती दिली आहे.

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवर संवाद साधत जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या भयानक दहशतवादी हल्ल्याचा

» पान ७ वर


## 'गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव'

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, महाराष्ट्र प्रदेश आयोजित, यंदाच्या ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त मुंबईत १ मे ते ४ मे या काळात 'गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव' संपन्न झाला. आज सकाळी अरबी सागरात महाराष्ट्रातील विभिन्न भागातील मंगलजल व मंगलमृदा प्रदेशाध्यक्ष मा. खा. सुनील तटकरे साहेब यांच्या हस्ते विसर्जन करण्यात आले. यावेळी राज्य महिला आयोग अध्यक्ष रूपाली चाकणकर उपस्थित होत्या.

### रिझर्व्ह बँकेच्या सुवर्णसाठ्यात २५ टनांची भर



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** रिझर्व्ह बँकेने आर्थिक वर्ष २०२५ च्या दुसऱ्या सहामाहीत आपल्या साठ्यात सुमारे २५ टन सोन्याची भर घातली आहे. रिझर्व्ह बँकेकडे सप्टेंबर २०२४ अखेर ८५४.७३ मेट्रिक टन सोन्याचा साठा होता, तो आता ८७९.५९ टन आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये रिझर्व्ह बँकेने आपल्या साठ्यात ५७ टनसोन्याची भर घातली आणि या कालावधीत सोन्याच्या किंमतीत ३० टक्क्यांनी वाढ झाली. गेल्या सात वर्षांतील ही सर्वात मोठी वार्षिक वाढ आहे.

# सीईटी सेल परीक्षेच्या विद्यार्थ्यांना लाखांचा गंडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**छ. संभाजीनगर :** महाराष्ट्र सीईटी सेल विद्यार्थ्यांवर लक्ष्य केंद्रित करत चोरट्यांनी अनोख्या पद्धतीने मोठा आर्थिक फटका दिला आहे. श्रेयस इंजिनिअरिंग कॉलेज सातारा आणि देवगिरी महाविद्यालय छ. संभाजीनगर परिसरातील २ आणि ३ मे रोजी सीईटी सेलची परीक्षा होती. या परीक्षेसाठी आलेल्या १८ विद्यार्थ्यांच्या दुचाकी आणि चारचाकींच्या डिक्या फोडल्या. तेवढचं नाहीतर, परीक्षेला गेलेल्या विद्यार्थ्यांच्या फोनचे सिमकार्ड, एटीएम व क्रेडिट कार्ड चोरले गेले. ही चोरी चोरट्यांनी अवघ्या तासाभरात केली असून विद्यार्थ्यांना ९ लाखांचा गंडा घातला.

या चोऱ्यांमध्ये एक विशेष बाब म्हणजे चोरट्यांनी मोबाईल फोडून त्यामधील सिमकार्ड, एटीएम व क्रेडिट कार्ड काढले. मोबाईल तसाच फेकून दिला. विद्यार्थी परीक्षा केंद्रात परतल्यावर त्यांना त्यांच्या फोनमधील सिम गायब असल्याचे लक्षात आले. काही विद्यार्थ्यांनी सिम बंद करून खात्यातील हालचाल तपासली असता, पैसे गायब झाल्याचे लक्षात आले.

सिमकार्ड आणि कार्ड्स चोरल्यानंतर चोरट्यांनी 'फरगेट पिन' पर्यायाचा वापर करत नवीन पिन निर्माण केला. नवीन पिनच्या साहाय्याने एटीएममधून रोख रक्कम काढली क्रेडिट कार्डद्वारे मॉलमध्ये व ऑनलाइन खरेदी करत एका तासात ५५ हजारांचे कपडे खरेदी केली.

चोरट्यांना परीक्षा केंद्रावर वेळेची माहिती आधीच माहिती असल्याचे समजते

» पान ७ वर

# 'पाक'च्या आर्थिक नाड्या आवळल्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिलला दहशतवादी हल्ला झाला. यामध्ये २६ पर्यटक मारले गेले. दरम्यान भारत दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानच्या विविध स्तरावर मुसक्या आवळत आहे. आता देखील भारताने पाकविरोधात आणखी एक पाऊल उचलत जागतिक स्तरावर पाकिस्तानची गळचेपी करण्याची मागणी केली आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने पाकिस्तानविरुद्ध दंडात्मक उपाययोजना कडक केल्या आहेत, असे सरकारी सूत्रांनी सोमवारी सांगितले. भारताच्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आशियाई विकास बँकेच्या (एडीबी) अध्यक्षांची भेट घेतली. त्यांनी पाकिस्तानला देण्यात येणाऱ्या निधीत कपात करण्याची मागणी केल्याचे वृत्त समोर आले आहे.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आशियाई विकास बँकेचे अध्यक्ष मासातो कांडा यांच्याशी झालेल्या भेटीव्यतिरिक्त, अर्थमंत्र्यांनी इटलीचे अर्थमंत्री जियानकार्लो जियोर्जेट्टी यांचीही भेट घेतली. यावेळी देखील अर्थमंत्र्यांनी याच मागणीचा पुनरुच्चार केल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. आर्थिक संकटात सापडलेल्या पाकिस्तानची अर्थव्यवस्था यापूर्वीच डबघाईला

» पान ७ वर

# राज्यात उभे राहणार 'मधूपर्यटन'

## १० गावांची 'मधाची गावे' म्हणून होणार ओळख

### योजना

**महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाने या योजनेसाठी राज्यातील दहा गावांच्या नावांचा प्रस्ताव राज्य शासनास सादर केला होता. या योजनेसाठी राज्य शासनाने ५ कोटी, १ लाख ९७ हजार रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी दिली आहे.** ज्या गावामध्ये ही योजना यावर्षी राबविण्यात येणार आहे, त्याच गावात सदर योजना पुढच्या वर्षीही राबविण्यात येईल, असे हमीपत्र आवश्यक असेल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :**महाराष्ट्रातील विविध १० जिल्ह्यांतील १० गावांमध्ये 'मधाचे गाव' ही योजना राबविण्याचा निर्णय राज्याच्या उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने ३० एप्रिल २०२५ रोजी घेतला आहे. सदर योजनेद्वारे राज्यात नैसर्गिक साधन संपत्ती लाभलेल्या विविध भागांमध्ये मधमाशांच्या संवर्धनातून तसेच मध आणि मधमाशांपासून तयार होणारी उत्पादनाची साखळी, प्रक्रिया व विक्री व्यवस्था करण्यात येईल.

या माध्यमातून राज्यात एक प्रकारे मधूपर्यटन होणार आहे. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाने या योजनेसाठी राज्यातील दहा गावांच्या नावांचा प्रस्ताव राज्य शासनास सादर केला होता. या योजनेसाठी राज्य शासनाने ५ कोटी, १ लाख ९७ हजार रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी दिली आहे.



ज्या गावामध्ये ही योजना यावर्षी राबविण्यात येणार आहे, त्याच गावात सदर योजना पुढच्या वर्षीही राबविण्यात येईल, असे हमीपत्र शासनाकडे सादर करणे हे संबंधित ग्रामपंचायतीला आवश्यक असेल.

### योजना राबविणारी गावे

● 'मधाचे गाव' ही योजना घोलवड (ता. डहाणू, जि. पालघर), भंडारवाडी (ता. किनवट, जि. नांदेड), बोरझर (ता. नवापूर, जि. नंदुरबार), काकडथाबा (ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली), चाकोरे (ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक), उडदावणे (ता. अकोले, जि. अहिल्यानगर), शेलमोहा (ता. गंगाखेड, जि. परभणी), सिंधीविहीर (ता. कारंजा, जि. वर्धा), सानोशी (ता. महाबळेश्वर, जि. सातारा) आणि आमझरी (ता. अमरावती, जि. अमरावती) या दहा गावांमध्ये राबविण्यात येणार आहे.

योजनेत समाविष्ट गावाच्या नावांची यादी बघून हे लक्षात येते की, गावांची निवड करताना संपूर्णपणे प्रादेशिक समतोल राखण्यात आला आहे. महाराष्ट्रातील कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि खान्देश अशा पाचही भागांतील गावे या यादीमध्ये आहेत. खेडेगावांमध्ये ही योजना राबविण्यात येणार असल्यामुळे ग्रामीण भाग हे व्यापाराचे केंद्र होण्यास तसेच ग्रामीण

» पान ७ वर



## तरुणाचा नऊ वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार

**पुणे :** पुण्यातील कोंढवा परिसरात एक धक्कादायक आणि संतापजनक घटना घडली आहे. घराजवळ राहणाऱ्या एका अल्पवयीन तरुणाने नऊ वर्षीय चिमुरडीवर स्वच्छतागृहात लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणी पीडित मुलीच्या आईने कोंढवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारावर पोलिसांनी अल्पवयीन तरुणाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पीडित मुलगी आणि आरोपी हे एकाच परिसरात राहतात. ही घटना ३ मे रोजी रात्री १० वाजता घडली. पीडित चिमुरडी रात्री स्वच्छतागृहात गेली होती. यावेळी आरोपीने देखील तिच्या मागोमाग प्रवेश करत दरवाजा लावून घेतला आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. जबरदस्ती केल्यानंतर कुणालाही सांगितल्यास ठार मारण्याची धमकी या आरोपीने पीडित मुलीला दिली.

मात्र घरी गेल्यानंतर पोट दुखू लागल्याने पीडित मुलीने आईला सगळा प्रकार सांगितला. त्यानंतर पीडितेच्या आईने तिच्या अंगावरून कपडे काढून पाहिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

## हवेली पंचायत समितीत ‘पुण्यश्री’ कॅन्टिनचे उदघाटन

**पुणे :** जिल्हा परिषदेच्या जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या मार्गदर्शनाखाली हवेली पंचायत समितीने महिला बचत गटाच्या माध्यमातून चालवल्या जाणाऱ्या ‘पुण्यश्री कॅन्टीन आणि सुपर मार्केट’चे उद्घाटन नुकतेच करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत हवेली पंचायत समितीच्या आवारात हे कॅन्टीन सुरू करण्यात आले आहे. या कॅन्टीनचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सचिन खरात, गटविकास अधिकारी भूषण जोशी, तसेच बचत गटातील महिला उपस्थित होत्या.

## कथक नृत्यागंणिचा विश्वविक्रम

**पुणे :** एकाचवेळी ११८८ कथक नृत्यांगनांनी एकत्र येत सादर केलेल्या नृत्याची नोंद ‘लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स’मध्ये झाली आहे. एकावेळी सर्वाधिक नृत्यांगनांनी कथक नृत्य सादर करण्याचा विश्वविक्रम यातून नोंदवला गेला.

पुण्यातील प्रेरणा फाउंडेशनच्या ‘नृत्यचक्रम’ या चमूने या विक्रमाची नोंद केली. विशेष म्हणजे याच सादरीकरणासाठी ‘वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडिया’मध्येही या विक्रमाची नोंद झाली. कथक नृत्यांगनांनी एकाचवेळी सादर केलेल्या सर्वाधिक रचनांसाठी ही नोंद झाली. गतवर्षी २५ फेब्रुवारीला या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शास्त्रीय कथक नृत्य सादरीकरणाचा हा उपक्रम महाराष्ट्रीय मंडळाच्या चंद्रशेखर आगाशे महाविद्यालयाच्या मैदानावर झाला. विविध गुरूंच्या एकूण ११८८ नृत्यांगनांनी एकत्र येत २० मिनिटांसाठी नृत्य सादरीकरण केले. यात तेजस्विनी साठे, ज्योती मनसुखानी, अस्मिता ठाकूर, रसिका गुमास्ते आणि डॉ. माधुरी आपटे या नृत्यगुरूंच्या शिष्यांचा समावेश होता.

## दोन दिवसीय पटकथा लेखन कार्यशाळेचे आयोजन

**पुणे :** चित्रपट क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी लेखक, दिग्दर्शक, निर्माते आणि कलावंतांना पटकथा लेखनाविषयीची माहिती असणे गरजेचे असते. एखाद्या संकल्पनेवरून चित्रपटाची निर्मिती करण्यासाठी व्यक्तिरेखांकन, कथा, पटकथा आणि संवाद लेखन यांचे तंत्र अवगत असणे आवश्यक आहे. चित्रपट उद्योग क्षेत्रात उत्तम पटकथा लेखकांची खूप मागणी आहे. या पार्श्वभूमीवर दोन दिवसीय ऑनलाइन कार्यशाळा १७ व १८ मे रोजी आयोजिली आहे. यामध्ये पटकथा लेखनाची प्रक्रिया व त्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आदींबाबत सविस्तर मार्गदर्शन होणार आहे.

## बिस्किट व कुकिज प्रशिक्षण १७ पासून

**पुणे :** आरोग्याच्या दृष्टीने मैदा विरहित पदार्थांचे महत्त्व खूप आहे. या पार्श्वभूमीवर व्यावसायिक दृष्टीतून घरीच मैदा विरहित बिस्कीट व कुकीज व ग्लुटन फ्री केकचे विविध प्रकार शिकवणारी कार्यशाळा १७ व १८ मे रोजी होणार आहे. यामध्ये सद्यःस्थितीत बिस्कीट, कुकीज व केक व्यवसायाला असणारी मागणी, नावीन्यपूर्ण पद्धती आणि अतिशय पौष्टिक अशा विविध प्रकारच्या कुकीज कशा तयार करायच्या याबांबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन होणार आहे. यामध्ये गहू, नाचणी, मिलेट्स, बाजरी, ड्रायफ्रूट, नमकीन, जीरा, उपवासाचे, हैदराबादी, शुगर फ्री बिस्कीटसह हेल्दी कुकीज व नानकटाई हे प्रकार प्रात्यक्षिकासह शिकविण्यात येतील. त्याचप्रमाणे फ्रूट, खजूर, मावा, पंचामृत, मँगो ड्रायफ्रूट, पमकिन, कॅरेट मलाई, मिलेट्स, उपवास स्पेशल, टी टाइम स्पेशल हे केकचे प्रकार प्रात्यक्षिकासह शिकविण्यात येतील.

## मेजवानी खेळांची आणि आनंदाची...!



पुणे — एकता मित्र मंडळ (ट्रस्ट), वंचित विकास यांच्या माध्यमातून व टॅप टू स्माईल संस्थेच्या सहकार्याने 'अभिरुची समर कॅम्पल' आयोजित करण्यात आला होता. या समर कॅम्प मध्ये मुलांनी झुम्बा डान्स केला, गाणी गायली, विविध खेळ खेळले, आलेल्या ताईंनी मुलांना पपेटच्या साह्याने छान गोष्टी सांगितल्या.

## ‘अभिरुची कॅम्प’ मध्ये सर्वोत्तम आठवणी

**पुणे :** मुलांना सुट्टीच्या काळात वेगळ काहीतरी करायचं, स्वतःच्या सुप्त कलागुणांना वाव देवून छान व्यक्तिमत्व घडवायचं या हेतूने एकता मित्र मंडळ (ट्रस्ट), वंचित विकास यांच्या माध्यमातून व टॅप टू स्माईल संस्थेच्या सहकार्याने 'अभिरुची समर कॅम्पल' आयोजित करण्यात आला होता.

टॅप टू स्माईलचे सर्व स्वयंसेवक हे मोठ्या आय.टी कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत. काही शिक्षक, डॉक्टर, इंजिनियर,बिझनेस करणारे आहेत. आपली सामाजिक बांधिलकी जपत वेळात वेळ काढून हे सर्व अशा उपक्रमात सहभागी होत असतात. या समर कॅम्प मध्ये मुलांनी झुम्बा डान्स केला, गाणी गायली, विविध खेळ खेळले, आलेल्या ताईंनी मुलांना पपेटच्या साह्याने छान गोष्टी सांगितल्या. सेवा निवृत्त मुख्याध्यापक शिक्षण मंडळ पुणे मनपाचे शिवाजी जाधव यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. टॅप टू स्माईलचे श्रुतिका भट्टड, उत्कर्षा गदादे व गार्गी पेठे यांनी समर कॅम्प घेतला. मुलांचे मनोबल वाढविण्यासाठी पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकता मित्र मंडळाचे अध्यक्ष सुधीर ढमाले, कार्याध्यक्ष योगेश मांढरे, वंचित विकासच्या तेजस्विनी थिटे व टॅप टू स्माईलचे अभिमन्यू उपाध्याय यांनी समर कॅम्पचे नियोजन केले.

# ‘पार्किंगचा अड्डा’ उखडला...!

### पुणे रेल्वे स्थानक परिसरात ‘नो पार्किंग: कोंडी फोडण्यासाठी निर्णय

पार्किंगचे पैसे वाचविण्यासाठी आणि वाहतूक पोलिसांची झंझट टाळण्यासाठी वाहनचालकांसाठी पुणे रेल्वे स्थानकाचा परिसर म्हणजे ‘पार्किंगचा अड्डा’ बनला होता, विशेष म्हणजे रेल्वेने प्रवास करत असलेल्या नागरिकांसह आजुबाजूच्या आस्थापनात काम करत असलेले कामगारांसाठीही हे ठिकाण हक्काचेच झाले होते. त्यामुळे गर्दीच्या परिसरातही याठिकाणी चारचाकी आणि दुचाकी वाहने लावण्यात येत होती, विशेष म्हणजे काही वाहनचालक तर आठ आठ दिवस वाहने लावून परगावी जात होते. त्यामुळे या परिसरात सातत्याने वाहतूक कोंडी होत होती, त्याचा त्रास अन्य प्रवाशी आणि वाहतूक पोलीससंह लोहमार्ग पोलीसांनाही सहन करावा लागत होता.



> पुणे रेल्वे स्थानक परिसरामध्ये कार अथवा दुचाकी पार्क केल्यास मोठा आर्थिक दंड भरावा लागू शकतो. एकीकडे वाहतूक कोंडीतून मुक्तता होणार असली तरी नो पार्किंग झोनचा नियम न पाळल्यास आर्थिक फटकाही बसणार आहे.
>
> **-अमोल झेंडे,** पोलीस उपायुक्त, वाहतूक विभाग, पुणे शहर



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लोहमार्ग पोलिसांनी वाहतूक विभागाशी चर्चा केल्यानंतर पुणे रेल्वे स्थानक परिसरामध्ये नवा नियम लागू केला आहे. पुणे रेल्वे स्थानक परिसर हा नो पार्किंग झोन म्हणून घोषित करण्यात आला आहे. त्यामुळेच आता पुणे रेल्वे स्थानक आवारातील अधिकृत वाहनतळ वगळता दोनशे मीटरच्या परिसरात कोणत्याही प्रकारची वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. यामुळे स्थानकाच्या आवारातील कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. मात्र त्याचवेळेस नागरिकांना काही प्रमाणात गैरसोयही सहन करावी लागणार असल्याची चर्चा आहे.

पुणे रेल्वे स्थानकाच्या आवारातील दोन्ही प्रवेशद्वारांवर (इन आणि आउट गेट) बेशिस्तपणे वाहने लावल्याने या भागातील वाहतूक विस्कळीत होत होती. प्रवेशद्वाराच्या परिसरात वाहने लावल्याने कोंडी होत असल्याच्या दिसून आलं होतं. रेल्वे स्थानकाच्या आवारातील कोंडीच्या पार्श्वभूमीवर लोहमार्ग पोलीस दलाचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक रोहिदास पवार यांनी वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांच्याशी उपाययोजनांबाबत चर्चा केली होती. त्यानंतर वाहतूक पोलिसांनी रेल्वे स्थानकाच्या परिसरातील दोन्ही प्रवेशद्वारांपासून 200 मीटर अंतरावर सर्व प्रकारची वाहने लावण्यास मनाई करण्याचा निर्णय घेतला.

### निर्णयासंदर्भात महत्त्वाचे मुद्दे

- पुणे रेल्वे स्थानकाच्या परिसरात नो पार्किंग झोन
- पुणे रेल्वे स्थानकातील अधिकृत पार्किंग वगळता २०० मीटर भाग नो पार्किंग झोन
- रेल्वे विभागाकडून फलक लावून या नो पार्किंग झोनबद्दल जनजागृती करणार
- जनजागृतीनंतर नियमाचा भंग झाल्यास दंडात्मक कारवाई
- पुणे रेल्वे स्थानकाच्या आत जाणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या दोन्ही प्रवेशद्वारावर बेकायदा पार्किंगची संख्या वाढल्याने निर्णय
- नो पार्किंग झोनमध्ये टॅक्सी, रिक्षा, पीक अँड ड्रॉपची सुविधा
- फायर ब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहिका नियमातून वगळले


# भाजप ही काँग्रेसचे नेते खाणारी चेटकीण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्या भाजप चे फोडाफोडीचे राजकारण सुरू झाले आहे. काही दिवसांपूर्वीच काँग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी भाजपात प्रवेश केला. त्यानंतर आता भाजप प्रदेशाध्यक्ष आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुणे भाजप पदाधिकाऱ्यांच्या बैठकीला संबोधित केलं. "काँग्रेसला फोडा आणि रिकामी करा", असे आदेश भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या पुण्यातील पदाधिकाऱ्यांना दिले आहे.

तर दुसरीकडे याच वक्तव्याचा काँग्रेसकडून जोरदार समाचार घेत प्रत्युत्तर देण्यात आलं आहे. भाजप ही काँग्रेसचे नेते खाणारी चेटकीण आहे. विरोधकांना फोडण्याचं जे भाजप प्रयत्न करतोय, त्याचा आम्ही निषेध करतो. असं म्हणत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपवर जोरदार टीका केली आहे.

पुढे बोलताना म्हणाले, नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस हे मोठे नेतृत्व सांगणारे नेते त्यांच्याकडे आहेत. परंतु ते काँग्रेसच्या भरवशावर निवडणुका जिंकतात हा विश्वास भाजपमध्ये आहे, असंही सपकाळ यावेळी म्हणाले. चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस फोडण्याच्या केलेल्या वक्तव्यावर हर्षवर्धन सपकाळ परभणीत बोलत होते. महत्त्वाचं म्हणजे शंकराचार्य यांनी राहुल



गांधींना हिंदू धर्मातून बहिष्कृत केल्याच्या वक्तव्यावरही त्यांनी भाष्य केलं.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, काँग्रेसला लोकं सोडून चालली आहेत. संग्राम थोपटे यांनी सगळं काँग्रेसला दिले तरी सुद्धा त्यांना पक्ष सोडावा लागला. त्यांना त्यांच्या पक्षाकडून, राहुल गांधी यांच्याकडून अपेक्षा नाहीत. कुठलं ही धोरण काँग्रेसला नाही. जो जो काँग्रेस किंवा इतर पार्टी मधून आमच्याकडे येईल त्याचे स्वागत आहे. काँग्रेसला फोडा, काँग्रेसला रिकामी करा. काँग्रेसची लोकं आपल्याकडे आली तरी तुमचा आधी विचार करणार असं आश्वासन बावनकुळे यांनी भाजप पदाधिकाऱ्यांना दिलं.

# ‘असे काहीसे गाणे’तून उलगडला जीवनप्रवास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्रत्येक कविता घेवून येते, नशीब आपले साथी, व्हावे गाणे कि उरावे अधुरे, हे नसते कवीच्या हाती... अशा एका पेक्षा एक सुरस कविता आणि तितकीचा दर्जेदार गीतांची मैफिल ‘असे काहीसे गाणे’ रंगली द बॉक्स स्टुडियोमध्ये. चिद्विलास स्टुडियोच्या वतीने या कार्यक्रमाचे मोफत आयोजन करण्यात आले होते.

‘प्रत्येक कवितेची असते एक गोष्ट’ या संकल्पनेला घेवून कवी व गीतकार चिद्विलास क्षीरसागर यांच्या कवितांचा व गीतांचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या गीतांना पराग पांडव यांनी संगीतबद्ध केले आहे. या गीतांचे सादरीकरण गायिका रमा कुलकर्णी व पराग पांडव यांनी केले. यावेळी आदिती गराडे, श्रीपाद शिरवळकर, मिहीर भडकमकर, अखिलेश चिंचपूरकर, अभय इंगळे व अभिजित यादव यांनी साथसंगत केली.

अनेक वर्षांच्या कालावधीनंतर नवीन कविता आणि गीतांचे सादरीकरण करण्याचा आम्ही प्रयत्न केला. यावेळी उपस्थित रसिकांनी कवितांना व गीतांना दिलेला प्रतिसाद निश्चित सुखावणारा होता. मानवी आयुष्याची जडणघडण उलघडून दाखविताना कविता कशा प्रकारे साथ देते, हे आम्ही मांडण्याचा प्रयत्न केला असल्याचे कवी व गीतकार चिद्विलास क्षीरसागर यांनी बोलताना सांगितले.




पुणे — ‘प्रत्येक कवितेची असते एक गोष्ट’ या संकल्पनेला घेवून कवी व गीतकार चिद्विलास क्षीरसागर यांच्या कवितांचा व गीतांचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते

# महाराष्ट्रातील १०३ दिव्यांगांना 'दगडूशेठ' तर्फे कृत्रिम अवयव




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम अवयव वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले. सणस मैदानासमोरील सजावट विभागात राज्यातील १०३ दिव्यांगांना कृत्रिम अवयव देण्यात आले. साधू वासवानी मिशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी ऑक्सफर्ड विद्यापीठातील स्वित्झर्लंड येथील शास्त्रज्ञ सॅबिन कुराटली, स्पेन येथील शास्त्रज्ञ डेव्हिड पोलिडो तसेच साधू वासवानी मिशन चे महाव्यवस्थापक सुंदर वासवानी यांसह ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, सौरभ रायकर व इतर पदाधिकारी उपस्थित होते. ऑक्सफर्ड विद्यापीठातील या शास्त्रज्ञांचा कोविशील्ड ही कोविड मधील लस बनविण्यात महत्वाचा सहभाग होता. त्या शास्त्रज्ञांनी शिबिरात येण्यापूर्वी मंदिरात श्रीं चे दर्शन देखील घेतले आणि ट्रस्टच्या सामाजिक कार्याची माहिती जाणून घेतली.

डेव्हिड पोलिडो म्हणाले, ज्याप्रमाणे आमचे येथे आदरातिथ्य झाले, त्याकरिता आम्ही आभारी आहोत. समाजासाठी सुरु असलेले हे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. त्यामध्ये आम्हाला सहभागी करून घेतल्याचा आनंद असल्याचे त्यांनी सांगितले. शिबीरात आलेल्या सुमन मरगळे म्हणाल्या, माझ्या मुलीला चालता येत नव्हते. यासाठी ट्रस्टच्या माध्यमातून माझ्या मुलीची तपासणी करून चालण्याकरिता रॉड देण्यात आले आहेत. यामुळे मला खूप मदत झाली असून मुलीला चालण्यासाठी सहकार्य होणार आहे.

> जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत विविध प्रकारच्या सुविधा आपण रुग्णांना देत असतो. शिबीरात कृत्रिम हात, पाय, कुबड्या दिव्यांगांना देण्यात आल्या आहेत. आजपर्यंत ६ हजार ८०० रुग्णांना कृत्रिम अवयव देण्यात आले असून, त्यांचे जीवन अतिशय सुकर व आनंददायी झाले आहे.
>
> **-महेश सूर्यवंशी,** कोषाध्यक्ष, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट

# पालिकेचा आरोग्य विभागच 'आयसीयु' मध्ये...!

## रुग्णालयात डॉक्टरांची कमतरता: सर्वसामान्य सुविधांपासून वंचित; रुग्ण वाढताहेत पण उपचार जैसे थे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोणत्याही पदावर नसतानाही माजी नगरसेवकांच्या आरोग्यासाठी सहा वर्षात सव्वातीनशे कोटीहूनही अधिक खर्च करत असलेल्या महापालिकेचा कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे; हद्दीलगतच्या गावांचा महापालिकेत समावेश झाल्यानंतर नागरीकरण वाढले असतानाही महापालिका रुग्णालयातील डॉक्टरांची आणि अन्य कामगारांची संख्या अद्यापही वाढविण्यात आलेली नाही. त्यामुळे कमी मनुष्यबळात रुग्णालयांचा कारभार सुरु असून नागरिकांचे आरोग्यच 'व्हेंटिलिटर'वर आले आहे' विशेष म्हणजे आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारीही यासंदर्भात मूग गिळून गप्प असल्याने हा कारभार 'रामभरोसे' सुरु असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महापालिकेमध्ये समाविष्ट गावे आल्यानंतर लोकसंख्येचा भार वाढला आहे. मात्र, त्या तुलनेत रुग्णालयांमधील मनुष्यबळ वाढलेले नाही. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, वर्ग '१' मधील ७२ टक्के पदे, वर्ग '२' मधील ७० टक्के आणि वर्ग '३' मधील ६९ टक्के पदे रिक्त आहेत. त्यामुळे महापालिकेच्या रुग्णालयांचा



कारभार रामभरोसे सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

समाविष्ट गावांमधील वाढत्या लोकसंख्येला पुरेशा आरोग्य सुविधा पुरवण्याचे आव्हान महापालिकेसमोर आहे. महापालिकेचे नायडू सांसर्गिक रुग्णालय, कमला नेहरू रुग्णालयांसह २१ प्रसूतिगृहे आणि ५१ दवाखाने कार्यरत आहेत.मात्र, डॉक्टरांची कमतरता भासत असल्याने आरोग्य सुविधा पुरवण्यात अडचणी निर्माण होत आहेत. रुग्णालयांमधील वर्ग 'अ' च्या १४४ मंजूर पदांपैकी १०५ पदे रिक्त आहेत.

महापालिकेच्या नियमानुसार आजी माजी नगरसेवकांना प्रशासनाने नेमलेल्या पॅनेलवरील रुग्णालयांमध्ये मोफत अथवा सवलतीच्या दरात उपचार केले जातात, त्यानुसार आजी नगरसेवकांना उपचारांमध्ये शंभर टक्के तर माजी नगरसेवकांना ९० टक्के उपचारामध्ये सवलत दिली जाते. त्यानुसार महापालिका प्रशासनाने गेल्या सहा वर्षांच्या कालावधीत या माननीयांवर उपचारासाठी तब्बल ३३७ कोटी ७१ लाख ४२ हजार ६९० रुपये इतका वारेमाप खर्च केला आहे. विशेष म्हणजे गेल्या तीन ते साडेतीन वर्षापासून



> गेल्या काही वर्षांच्या कालावधीत शहराचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे, त्या तुलनेत महापालिकेच्या आरोग्य विभागाची कुमक खूपच तुटपुंजी आहे. त्यामध्ये सर्वसामान्य रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक भरडले जात असून ते उपचारापासून वंचित राहात आहेत, ही बाब पुण्यासारख्या पुढारलेल्या शहरासाठी निश्चितच लाजीरवाणी अशीच आहे.
>
> **-डॉ. सिद्धार्थ धेंडे,** माजी उपमहापौर, पुणे मनपा

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

महापालिकेत प्रशासक राज असून सध्या सर्व नगरसेवक हे माजी आहेत.

कमला नेहरू रुग्णालयात अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक आणि विद्यार्थी आरोग्य सेवेसाठी हजर असले तरी त्यांच्याकडून एकहाती जबाबदारी उचलली जात नसल्याची तक्रार रुग्णालयातील डॉक्टरांकडून ऐकायला मिळत आहे. इतर रुग्णालयांमध्ये मोजकेच डॉक्टर अनेक रुग्णांची जबाबदारी सांभाळत आहेत. परिणामी, उपलब्ध डॉक्टरांवर ताण वाढला आहे आणि रुग्णांच्या समस्यांकडे आवश्यक त्या गांभीर्याने लक्ष देणे कठीण झाल्याचे निदर्शनास येत आहे. सरकारी दवाखान्यांमध्ये उपचार घेणे स्वस्त आणि सोयीचे असते. पण, डॉक्टरच वेळेवर मिळत नाहीत, त्यामुळे रुग्णांना नाइलाजाने खासगी रुग्णालयांकडे पावले वळवावी लागत आहेत. सध्या तरी महापालिकेकडून रिक्त पदांवर कंत्राटी आधारावर मनुष्यबळ नियुक्त करण्याचा विचार सुरू आहे. मात्र, दीर्घकालीन उपाय म्हणून नियमित भरती आणि आरोग्य सेवांचे सक्षमीकरण गरजेचे असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

### ही आहेत पदे रिक्त...!

| | |
|---|---|
| न्यूरोसर्जन | १ |
| न्यूरोफिजिशियन | १ |
| यूरोसर्जन | १ |
| कार्डिओलॉजिस्ट | १ |
| चेस्ट फिजिशियन | ३ |
| आयसीयू फिजिशियन | ४ |
| इनटेन्सिव्हिस्ट | ३ |
| स्त्रीरोगतज्ज्ञ | ८ |
| बालरोगतज्ज्ञ | ४ |
| क्ष-किरणतज्ज्ञ | १६ |
| पेडिॲट्रिक सर्जन | ४ |
| मानसोपचारतज्ज्ञ | २ |
| त्वचारोगतज्ज्ञ | १ |

# 'रातराणी'चे 'पीएमपी'ला 'अर्थबळ'...!

### वर्षात एक कोटींचे उत्पन्न : महसूल वाढीवर भर

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत दिवसा धावणारे पुणे आता रात्रीही चांगलेच धावू लागले असून पुण्याच्या रस्त्यावर रात्रीही वर्दळ वाढू लागली आहे; त्यामुळे नागरिकांना रात्रीही दळणवळणाच्या वाहनांची गरज भासू लागली आहे. त्यांची ही गरज ओळखूनच 'महामेट्रो' ने त्यांची सेवा रात्री अकरापर्यंत वाढविली आहे. तरीही बाहेरगावाहून येत असलेल्या प्रवाशांना नाईलाजाने का होइना पण रिक्षा आणि अन्य खासगी वाहनांचा आसरा घ्यावा लागत आहे. मात्र; या सेवा असुरक्षित असल्याने प्रवासी त्याकडे पाठ फिरवित आहेत. त्यासाठी 'पीएमपी' प्रशासनाने सहा मार्गावर 'रातराणी' सेवा सुरु केली आहे; त्याला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

> पीएमपीकडून सहा मार्गांवर रातराणी बस सुरू आहेत. त्याला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. पीएमपीच्या ताफ्यात नवीन बस दाखल झाल्यावर काही मार्गांवर रातराणी बससेवा वाढविण्याचे नियोजन आहे.
>
> **– नितीन नार्वेकर,** सहव्यवस्थापकीय संचालक, पीएमपी





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रात्रीच्या वेळी पीएमपीचा प्रवास सुरक्षित आणि माफक दरात होत असल्याने प्रवाशांकडून नवीन मार्गावर आणखी बस (रातराणी सेवा) सुरू करण्याची आवश्यकता आहे. रात्रीच्या वेळी पुणे विमानतळावरून ये- जा करणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त आहे. त्यामुळे पुणे विमानतळ ते स्वारगेट, पुणे स्टेशन ते विमानतळ, पुणे स्टेशन ते हिंजवडी अशा मार्गांवर रातराणी बस सुरू केल्यास प्रवाशांना फायदा होईल, तसेच काही महिने मनपा ते खराडी, न. ता. वाडी ते कोंढवा खुर्द असे दोन रातराणी मार्ग सुरू केले होते. तेही मार्ग सुरू व्हावे, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

बाहेरगावाहून रेल्वे, बसने रात्री पुण्यात येणाऱ्या प्रवाशांचा माफक दरात आणि सुरक्षित प्रवास व्हावा, यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून (पीएमपी) सहा मार्गांवर रातराणी सेवा सुरू केली आहे. त्याला प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. रातराणीच्या सहा मार्गांवर धावणाऱ्या पीएमपीला गेल्या आर्थिक वर्षात एक कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले असून, आणखी काही मार्गांवर बस सुरू करण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

शिक्षण, व्यवसाय, नोकरी यासह पर्यटनानिमित्त राज्य आणि राज्याबाहेरील नागरिकांचे पुण्यात ये- जा करण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे विमान, एसटी, रेल्वे, खासगी बसमधून रात्री- अपरात्री पुण्यात येणाऱ्या प्रवाशांची संख्याही जास्त आहे. त्या वेळी थोड्या अंतर असो की लांबचे अंतर प्रवाशांची रिक्षाचालकांकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट केली जाते, तसेच प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्नही निर्माण होतो.

त्यामुळे पीएमपीकडून पाच मार्गांवर रातराणी बस सुरू केली होती. या मार्गावर रात्रीच्या वेळी प्रवाशांची मोठी सोय झाली आहे. पुढे प्रवाशांची मागणी व मार्गाचा अभ्यास करून पीएमपीने आणखी एक मार्ग वाढविला आहे. त्यामध्ये पुणे स्टेशन ते निगडी हा नवीन मार्ग सुरू केला आहे. याचा प्रवाशांना फायदा होत आहे.

**'रातराणी'चे बस मार्ग**

- **कात्रज ते शिवाजीनगर बसस्थानक, पुणे स्टेशन ते एनडीए गेट १०, हडपसर ते स्वारगेट, हडपसर ते पुणे स्टेशन, निगडी ते पुणे स्टेशन (वाकडेवाडीमार्गे), कात्रज ते पुणे स्टेशन**

# रत्नागिरी आणि कर्नाटक हापूस आला आवाक्यात



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रत्नागिरी आणि कर्नाटक हापूसला मागणी वाढली आहे. येथील बाजारात रविवारी सुमारे ३ हजार पेटींची आवक झाली. घाऊक बाजारात तयार आंब्याला डझनाला ४०० ते ८०० रुपये मोजावे लागत आहे. रत्नागिरी हापूसच्या कच्च्या मालाच्या ४ ते ९ डझनाच्या पेटीला १५०० ते ४ हजार, तर तयार मालाच्या पेटीला २ हजार ते ४ हजार रुपये मोजावे लागत आहेत. कर्नाटक हापूसची आवक वाढली आहे. बाजारात ५ ते ७ हजार पेटींची आणि दोन डझनाच्या २० हजार बॉक्सची आवक झाली. हापूसच्या ३ ते ५ डझनाच्य पेटीला १ हजार ते १६०० रुपये भाव मिळत आहे.

आंब्यामुळे अन्य फळांच्या खरेदीकडे खरेदीदारांनी पाठ फिरविली आहे. परिणामी, या फळांना अपेक्षित मागणी नसल्याचे चित्र आहे. मागील काही दिवस कलिंगड व खरबुजाच्या वाढलेल्या दरात किलोमागे दोन ते तीन रुपयांची घसरण झाली आहे. बाजारातील आवक-जावक कायम असल्याने सर्व प्रकारच्या फळांचे दर गतआठवड्याच्या तुलनेत टिकून असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

लिंबाच्या वाढलेल्या दराचा फायदा घेण्यासाठी शेतकरी वर्गाकडून लहान तसेच कच्च्या लिंबाची तोड करून बाजारात विक्रीस पाठविण्यास सुरुवात केली. बाजारात येत असलेल्या लिबांमध्ये अपेक्षित रस नसल्याने तसेच ती कच्ची असल्याने त्याच्या खरेदी करण्याकडे पुणेकरांनी पाठ फिरविली. परिणामी, लिंबाच्या भावात १५ ते २० किलोच्या गोणीमागे दोनशे ते तीनशे रुपयांनी घसरण झाली आहे.



## डिजिटल चित्रपट निर्मिती अभ्यासक्रम २४ मे पासून

**पुणे :** चित्रपट निर्मितीच्या क्षेत्रात अनेक प्रकारच्या संधी सध्या उपलब्ध आहेत. चित्रपट निर्मितीसाठी लागणाऱ्या कौशल्याचे प्रशिक्षण देणारा तीन महिन्यांचा आठवड्याच्या शेवटी चालणारा अभ्यासक्रम २४ मेपासून सुरू होत आहे. या अभ्यासक्रमात ८० टक्क्यां पेक्षा जास्त अभ्यासक्रम प्रात्यक्षिकांवर आधारित असून यामध्ये विद्यार्थ्यांकडून लघुपट निर्मिती केली जाणार आहे. अभ्यासक्रमात चित्रीकरणाचे तंत्रज्ञान, संकलन, वीएफएक्स इफेक्ट, संकल्पना, कथालेखन, पटकथा निर्मिती आणि चित्रपट प्रदर्शन इत्यादी अनेक घटकांवर मार्गदर्शन होणार आहे. अभ्यासक्रम चित्रपटसृष्टी तसेच दूरचित्रवाणी क्षेत्रातील २५हून जास्त वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असलेले दिग्दर्शक शिवाजी कचरे यांच्या मार्गदर्शनाखाली चालवला जाणार आहे. प्रत्यक्ष चित्रीकरण स्थळाला भेटीचे आयोजन आहे.



## श्री काळभैरवनाथ मंदिराचा वर्धापनदिन उत्साहात

**पुणे :** खडकवासला:जांभळी येथे काळभैरवनाथ मंदिर वर्धापन दिन व श्री पांडुरंगाच्या मुर्ती स्थापना ४१ व्या वाढदिवसा निमित्त अखंड हरिनाम सप्ताह नामचिंतन सोहळा भक्तीमय वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात पाच दिवस पहाटे काकड आरती, सकाळी तुकाराम महाराज गाथा भजन,सायंकाळी प्रवचन, हरीपाठ रात्री किर्तन व त्यानंतर महाप्रसाद असे कार्यक्रम करण्यात आले. या नामचिंत सप्ताहात ह.भ.प. विलास महाराज बराटे, ह.भ.प. विष्णू महाराज टेंभूकर , ह.भ.प. अनंत महाराज चव्हाण, तसेच पंढरपूर येथील वैकुंठवासी गंगुकाका शिरवळकर फडाचे मालक ह.भ.प भागवत महाराज शिरवळकर किर्तन सेवा झाली. आणि काला किर्तन सेवा डोणजे येथिल ह.भ.प देवेंद्र महाराज निढाळकर यांची झाली. त्यांच्या ज्ञानदानाच्या कार्याची दखल घेऊन ग्रामस्थांच्या वतीने ह.भ.प. देवेंद्र महाराज निढाळकर यांना सन्मान चिन्ह आणि त्यांच्या श्री विठ्ठलराज वारकरी शिक्षण संस्थेस देणगी देऊन सन्मानित करण्यात आले . उपस्थित वारकरी व मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला.



## ध्रुव ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे गौरवशाली यश

**पुणे :** भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालय आणि परराष्ट्र मंत्रालयाने मंजूर केलेल्या आंतरराष्ट्रीय हिंदी ऑलिंपियाड २०२४-२५ मध्ये पुण्यातील ध्रुव ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. इयत्ता पाचवीच्या वरद मांडे ने स्पर्धेत पाचवा क्रमांक पटकावला, तर इयत्ता चौथीच्या आर्यंश कंसलने आठवा क्रमांक मिळवून शाळेचा आणि देशाचा अभिमान वाढविला.

स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल दोन्ही विद्यार्थ्यांना विशेष गुणवत्ता प्रमाणपत्र आणि प्रोत्साहन पुरस्कार देण्यात आला.

या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना शाळेचे संचालक यशवर्धन मालपाणी म्हणाले, "आमच्या विद्यार्थ्यांनी या आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उत्कृष्ट भाषिक प्रतिभा दाखवली आहे. ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे आणि आम्हाला विश्वास आहे की भविष्यातही ते जागतिक स्तरावर हिंदी भाषेला आदर मिळवून देत राहतील."

## छत्रपती शिवाजी महाराज सर्किटवर हेरिटेज टूर ९ जूनला

**पुणे :** शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास प्रत्येकाला अनुभवता यावा यासाठी इंडियन रेल्वे केटरिंग टुरिझम कॉर्पोरेशनने (आयआरसीटीसी) भारत गौरव पर्यटन उपक्रमांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज सहल सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. छत्रपती शिवाजी महाराज सर्किटवर हेरिटेज टूर दि.९ जून रोजी सीएसएमटी स्थानकातून निघणार आहे.

या सहलीमध्ये पर्यटकांना रायगड किल्ला, पुणे (लाल महाल, कसबा गणपती आणि शिवसृष्टी), शिवनेरी किल्ला, भीमाशंकर ज्योतिर्लिंग, प्रतापगड किल्ला आणि कोल्हापूर (महालक्ष्मी मंदिर आणि पन्हाळा किल्ला) पाहता येणार आहे. शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांची सफर घडविणारी सहल ५ रात्र आणि ६ दिवसांची असणार आहे. अत्याधुनिक भारत गौरव एसी टुरिस्ट ट्रेन ज्यामध्ये स्लीपर, एसी २ टियर आणि एसी ३ टियर कोच आहेत. एकूण ७४८ पर्यटक या ट्रेनने प्रवास करू शकतील. या सहलीमुळे पावसाळ्यात पर्यटकांना आनंद घेता येणार आहे.

# ब्राह्मण कार्यालयातर्फे जनकल्याण रक्तपेढीला रेफ्रिजरेटर भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ब्राह्मण कार्यालय संस्था शताब्दी वर्ष साजरे करीत आहे. या निमित्ताने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. शताब्दी वर्षानिमित्त पुण्यातील जनकल्याण रक्तपेढी या संस्थेला त्यांच्या आवश्यकतेनुसार साडेसहा लाख रुपये किमतीचा ८०० लिटर साठवण क्षमतेचा आणि दोन अंश तापमानापर्यंत कार्यक्षम असणारा मोठा रेफ्रिजरेटर भेट म्हणून देण्यात आला.

स्वारगेट येथील जनकल्याण रक्तपेढी येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ब्राह्मण कार्यालय संस्थेचे उपाध्यक्ष रमेश भागवत उपस्थित होते. या प्रसंगी जनकल्याण रक्तपेढी तर्फे डॉ. अतुल कुलकर्णी यांनी संस्थेचे आभार मानले. डॉ. माधुरी बर्वे यांनी रक्तपेढीच्या संपूर्ण कामकाजाची माहिती दिली.

डॉ. अतुल कुलकर्णी म्हणाले, ब्राह्मण कार्यालयाच्या वतीने देण्यात आलेल्या नवीन रेफ्रिजरेटरमुळे रक्त साठवणुकीची क्षमता लक्षणीय वाढणार आहे. परिणामी पुणे शहरातील रक्तसाठा व्यवस्थापन अधिक सक्षम होईल. पैशाअभावी रक्त मिळणार नाही, याची आम्ही विशेष काळजी घेतो. थॅलेसेमिया ग्रस्त लहान मुलांना दरवर्षी ४ हजार रक्तपिशव्या रक्तपेढीच्या वतीने विनामूल्य दिल्या जातात, असेही त्यांनी यावेळी सांगितले. रमेश भागवत म्हणाले , ब्राह्मण कार्यालय संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जनकल्याण रक्तपेढी यांना त्यांची गरज ओळखून केवळ रक्त पेढीसाठी उपयुक्त असणारा रेफ्रिजरेटर देण्यात आला. नेताजी सुभाषचंद्र बोस शाळेलाही सुरक्षा कॅमेरा बसविण्यात आर्थिक मदत संस्थेमार्फत करण्यात आली आहे. समाजाच्या कल्याणासाठी अशा कार्यात सहभागी होणे ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. भविष्यातही ब्राह्मण कार्यालय संस्था अशाच कार्यासाठी पुढे राहील, असेही त्यांनी सांगितले.



**पुणे** ब्राह्मण कार्यालय संस्था शताब्दी वर्ष साजरे करीत आहे. या निमित्ताने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. शताब्दी वर्षानिमित्त पुण्यातील जनकल्याण रक्तपेढी या संस्थेला त्यांच्या आवश्यकतेनुसार साडेसहा लाख रुपये किमतीचा ८०० लिटर साठवण क्षमतेचा आणि दोन अंश तापमानापर्यंत कार्यक्षम असणारा मोठा रेफ्रिजरेटर भेट म्हणून देण्यात आला.

# गणेशोत्सव कार्यकर्त्यांच्या साक्षीने जुळले दृष्टीहिनांचे 'सुस्वर'



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सनईचे मंगलमय सूर... कार्यकर्त्यांची सुरु असलेली लगबग....वाजत गाजत काढलेली वरात...भांड्यांपासून कपाट आणि सोफ्यापर्यंत विविध वस्तूंनी सजलेले रुखवत... वाद्यांचा गजर आणि वैदीक मंत्रोच्चाराचे सूर अशा मंगलमय वातावरणात गायिका असणारी शितल केंद्रे आणि सुनील पवार या दृष्टीहिन जोडप्याचा विवाह सोहळा संपन्न झाला. गणेशोत्सव कार्यकर्त्यांच्या साक्षीने शितल आणि सुनील यांनी प्रेमाची व नव्या स्वप्नाची गाठ बांधली.

शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळ ट्रस्टतर्फे या अनोख्या विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार मेधा कुलकर्णी, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार हेमंत रासने, सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत पाठक, कर्नल भार्गव, किशोर सरपोतदार, सुभाष सरपाले, मंडळाचे अध्यक्ष पराग शिंदे, अमर लांडे, सचिन ससाणे, रोहिणी चेन्नूर, सुनेत्रा राचेल्ला यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर, विविध गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

शितल केंद्रे ही मूळची नांदेडची तर सुनील पवार हा संगमनेरचा आहे. दोघेही वाघोलीच्या लुई ब्रेल अंध अपंग कल्याण संस्थेत असतात. शितल ही संस्थेच्या ऑर्केस्ट्रा मध्ये गायिका असून दोघेही स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहेत. विवाह सोहळ्यात साखरपुडा, हळदी समारंभ विवाहाचे धार्मिक विधी पार पडले. लुई ब्रेल अंध अपंग कल्याण संस्थेच्या सहयोगाने दरवर्षी या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

गणेशोत्सव मंडळातील पदाधिका-यांनी आणि कार्यकर्त्यांनी या मुलींचे मामा म्हणून कन्यादान केले. मेहेंदी, साखरपुडा, हळदी समारंभ अशा सगळ्या कार्यक्रमात आजूबाजूच्या परिसरातील महिलांनी मोठया उत्साहाने सहभाग घेतला.

# ज्युनिअर कॉलेजचा शंभर टक्के निकाल

## ‘अभिनव’ची उत्तुंग निकालाची परंपरा याहीवर्षी कायम





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वीच्या परीक्षेत आंबेगाव बु || येथील अभिनव एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मिडीयम स्कूल आणि जुनिअर कॉलेज चा सायन्स विभागाचा १०० टक्के तर कॉमर्स विभागाचा ९९ टक्के निकाल लागला आहे.

जुनिअर कॉलेज च्या सायन्स विभागामध्ये अर्णव काटेपल्लेवार ९३टक्के गुण मिळवून प्रथम, अवनी धामणे हिने ९२ टक्के गुण मिळवून द्वितीय तर उत्कर्ष माने हिने ९०टक्के गुण मिळऊन तृतीय क्रमांक पटकावला तर जुनिअर कॉलेज च्या कॉमर्स विभागामध्ये कनिष्क देशमुख हिने ८९ टक्के हिने गुण मिळवून प्रथम ,सक्षम शेट्टी याने ८४.०० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर अनुष्का पाटील हिने ८२.३३ टक्के गुण मिळऊन तृतीय क्रमांक पटकावला.

ज्युनिअर कॉलेजच्या सर्व शिक्षकांनी दररोजच्या अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या शंकांचे वेळोवेळी निरसन केल्याने त्याचबरोबर प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक मार्गदर्शन केल्यानेच आम्ही चांगले गुण मिळवू शकलो असे विशेष श्रेणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी सांगितले.


ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत उत्तुंग निकालाची परंपरा याही वर्षी कायम राखल्याबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव जगताप ,सेक्रेटरी सुनीता जगताप,सहसेक्रेटरी निर्मोही जगताप , खजिनदार ध्रुव जगताप,समन्वयक डॉ.सविता शिंदे,प्राचार्या वर्षा शर्मा,जुनिअर कॉलेजच्या पर्यवेक्षिका सुनीता यादव कार्यक्रम अधिकारी विनोदकुमार बंगाळे यांनी सर्व विद्यार्थी ,शिक्षक,आणि पालकांचे अभिनंदन केले आहे.

# इंद्रायणी संस्थेत मुलींचीच बाजी









■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तळेगाव दाभाडे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी/ मार्च २०२४-२५ रोजी घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत यंदाही निकालात मुलींनीच बाजी मारली.

इंद्रायणी महाविद्यालयच्या उज्वल परंपरेला साजेसा निकाल यंदाच्याही वर्षी लागला असून, कला, वाणिज्य, विज्ञान व तंत्रशिक्षण शाखांतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

विज्ञान शाखेतून मिताली संजय फडतरे या विद्यार्थिनीने



९४.८३% इतके गुण प्राप्त करीत प्रथम क्रमांक पटकवला. वाणिज्य शाखेतून श्रुतिका जाधव या विद्यार्थिनीने ९०.५% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला.

कला शाखेतून कुंदन बोरे या विद्यार्थ्याने ८६.१७ % गुण मिळवून प्रथम क्रमांक, तर तंत्रशिक्षण विभागातून विनायक होटकर या विद्यार्थ्याने 76.33% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला.

विज्ञान शाखेचा निकाल ९७.७८ टक्के, वाणिज्य शाखेचा निकाल ९५.१८ टक्के, कला शाखेचा निकाल ७६.६६ टक्के, तर तंत्रशिक्षण शाखेचा निकाल ९४.४३ टक्के निकाल लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष रामदास काकडे, कार्यवाह चंद्रकांत शेटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संभाजी मलघे, उपप्राचार्य प्रा. संदीप भोसले व सर्व पदाधिकारी आणि शिक्षकांनी अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### इंद्रायणी विद्यालयाचा शाखा निहाय निकाल पुढीलप्रमाणे

**विज्ञान शाखा**

मिताली संजय फडतरे -९४.८३%
उन्नती राजेश ठाकूर-९२.८३%
आकांक्षा पोपट दाभाडे-८९.५०%

**वाणिज्य शाखा**

जाधव श्रुतिका विकास-९०.५%
गोपाळे श्रुती प्रकाश-८८%
काशीद कृष्णराज धनंजय-८८%
गरुड मयुरा अमोल -८४.१७%

**कला शाखा**

बोरे कुंदन संदीप-८६.१७%
चिलप मयुरी निलेश-७७.६७%
वाघमारे कोमल राजेभाऊ-७५.३३%

**तंत्रशिक्षण**

होटकर विनायक मल्लिकनाथ-७६.३३%
माळी अथर्व अप्पासाहेब-६७.८३%
अंकुशी प्रदीप प्रकाश ६६..८३%

# आझम कॅम्पसच्या शाळांचे घवघवीत यश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या 'अँग्लो उर्दू गर्ल्स हायस्कुल अँड आबेदा इनामदार ज्युनिअर कॉलेज फॉर गर्ल्स ' ,अँग्लो उर्दू बॉईज स्कूल अँड ज्युनियर कॉलेज ,एम.सी.इ.एस. इंग्लिश मिडीयम स्कुल अँड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी बारावी परिक्षेत यश मिळवले. संस्थेचे अध्यक्ष डॉ .पी ए इनामदार,उपाध्यक्षा आबेदा इनामदार ,सचिव प्रा. इरफान शेख,अली रजा इनामदार,हनीफ शेख,मुख्याध्यापक राज मुजावर,प्राचार्या सौ. रोशन आरा शेख,मुख्याध्यापिका असफिया अन्सारी ,यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.अँग्लो उर्दू बॉईज हायस्कुल अँड ज्युनियर कॉलेजचा निकाल ९४ टक्के लागला. विज्ञान शाखेचा निकाल ९७ टक्के इतका लागला.कला शाखेचा निकाल ५६.२५ टक्के, तर वाणिज्य शाखेचा निकाल ९६ टक्के इतका लागला. विज्ञान शाखेतून ७१.५० टक्के गुण मिळवून शेख आतीफ अशपाक प्रथम आला.कला विभागात शेख मोहम्मद अकबर ६३.५० टक्के गुण मिळवून प्रथम आला तर कॉमर्स विभागात खान शेहझान इरफान ७३.८३ टक्के गुण मिळवून प्रथम आला .

'आबेदा इनामदार ज्युनिअर कॉलेज फॉर गर्ल्स, पुणे 'चा एकूण निकाल ९८.४७ टक्के लागला. एकूण ६५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले.विज्ञान शाखेचा निकाल ९८.९६ टक्के,वाणिज्य शाखेचा निकाल ९८.४८ टक्के,

कला शाखेचा निकाल ९६ टक्के निकाल लागला तर एच एस व्ही सी शाखेचा निकाल ९६.९६ टक्के लागला.कु बडगुजर रूशदा अमजदअली ही विद्यार्थीनी ९३.१७ टक्के गुण मिळवून कला शाखेत व कॉलेज मध्ये प्रथम आली .


वाणिज्य विभागात कु सुभेदार शिफा शफीक ही ९२.११ टक्के मिळवून प्रथम आली .कु शेख आलिया जफर ही ८५ टक्के गुण मिळवून विज्ञान शाखेत प्रथम आली. तर कु शेख बुशरा जाकीर अहमद ही व्होकेशनल ( एच एस व्ही सी ) शाखेत ८५.१७ टक्के गुण मिळवून प्रथम आली .

'एम.सी.इ.एस. इंग्लिश मिडीयम स्कुल अँड ज्युनियर कॉलेज' चा निकाल ९५.३४ टक्के लागला. विज्ञान शाखेचा निकाल ९८.८५ टक्के इतका लागला. कला शाखेचा निकाल ७८.३७ टक्के, तर वाणिज्य शाखेचा निकाल ९५.४५ टक्के इतका लागला. शेख फिझा ताहीर ही ८२.५० टक्के गुण मिळवून विज्ञान शाखेत प्रथम आली. कॉमर्स विभागात शेख अलिशा शाकीर ही ८६.१७ टक्के मिळवून प्रथम आली तर भारती निशा मुरली ही ७१ टक्के गुण मिळवून कला शाखेत प्रथम आली.

# 'पायवाटाची सावली' २३ मे ला होणार प्रदर्शित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लेखकाचा खडतर प्रवास पायवाटाची सावली या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतच मान्यवरांच्या उपस्थितीत या चित्रपटाचा ट्रेलर लॉंच सोहळा मुंबईत संपन्न झाला. या चित्रपटाचे निर्माते, लेखक, दिग्दर्शक मुन्नावर शमिम भगत, बॉलिवूड मधील सुप्रसिद्ध संगीतकार अनिल बिस्वास यांचे सुपुत्र अमित अनिल बिस्वास या चित्रपटाचे वितरक अकात डिस्ट्रीब्यूशनचे संस्थापक चंद्रकांत विसपुते हे उपस्थित होते. हा चित्रपट २३ मे रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होईल.




'मीना शमीम फिल्म्स' प्रस्तुत 'पायवाटाची सावली' या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची व लिखाणाची धुरा मुन्नावर शमीम भगत यांनी उत्तमरीत्या पेलवली आहे. तर चित्रपटाच्या निर्मितीची बाजू 'मीना शमीम फिल्म्स'ने सांभाळली आहे. तर संपूर्ण चित्रपटाचे संगीत अमित अनिल बिस्वास यांनी केले आहे. या चित्रपटात विजे भाटिया, शाल्वी शाह, रेवती अय्यर, प्रसाद माळी आणि शीतल भोसले हे कलाकार आहेत.

या चित्रपटाबाबत बोलताना दिग्दर्शक - लेखक मुन्नावर शामीम भगत यांनी त्यांचा अनुभव शेअर करत अस म्हटलं की, “एका गावात अनेक वर्ष पाऊस पडलेला नसतो. तेथील लोक पाण्याविणा आपला उदरनिर्वाह कसा करतात. त्यांची पाण्याप्रतीची तळमळ या चित्रपटात रेखाटली आहे. आयुष्यात हरलेला व स्वतःला निराशेच्या डोहात बुडवलेल्या एका लेखकाची दुर्दशा यात मांडली आहे. प्रेक्षकांना या चित्रपटाचा ट्रेलर नक्की आवडेल अशी मी आशा करतो. तसेच काहींना अस वाटेल की हे माझ्यासोबत देखील घडल आहे. काहीना आपल्या खऱ्या आयुष्याच्या वास्तवाची देखील प्रचिती होईल. सर्वांनी हा चित्रपट चित्रपटगृहात जाऊन एकदा तरी नक्की पहावा अशी मी आशा करतो.

## रिपाईतून मिनाज मेनन व पहिलवान यांची हकालपट्टी

**पुणे :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या पुणे शहरातील विशेष कमिटीची बैठक शुक्रवारी पक्ष कार्यालयामध्ये पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली, सदरच्या बैठकीमध्ये पक्षाच्या हडपसर विधानसभा अध्यक्षा मिनाज मेमन व मुस्लिम आघाडी पुणे शहर अध्यक्ष वसिम पहिलवान यांची एकमताने ठराव करून पक्षातून हकालपट्टी करण्यात आली.

या दोघानी पक्षाला बदनाम करणारे कृत्य वारंवार केले आहे. पक्षाला त्यामुळे मानहानी सहन करावी लागली. या कारणास्तव त्यांची पक्षातून हकलपट्टी करण्यात आली आहे. या बैठकीस परशुराम वाडेकर, रोहिदास गायकवाड, अशोक कांबळे, अशोक शिरोळे, शैलेंद्र चव्हाण, मोहन जगताप, महिपाल वाघमारे, बसवराज गायकवाड, शाम सदाफुले, रफिक दफेदार, महेंद्र कांबळे, भगवान गायकवाड, वसंत बनसोडे, हिमाली कांबळे, महादेव दंदी, बाळासाहेब जगताप, विरेन साठे, संदिप चांदोरे उपस्थित होते.

# ‘आयुष्मान’ रूग्णालयांच्या ‘निशाण्यावर’...!

## मनमानी कारभार आणि निधीची वाणवा; महत्त्वाकांक्षी योजनेला ‘ग्रहण’

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार, राज्यात आत्तापर्यंत १ कोटी ६ लाखाहून अधिक लाभार्थ्यांनी आयुष्मान कार्ड मिळवले असून, सुमारे ३५ लाख रुग्णांनी मोफत उपचाराचा लाभ घेतला आहे. सध्या राज्यातील २०३१ रुग्णालयांमध्ये योजना कार्यान्वित आहे. येत्या काही काळात आणखी २००० रुग्णालये योजनेअंतर्गत आणण्याचा शासनाचा मानस आहे.मात्र शासकीय रुग्णालयांची उदासीनता, खासगी रुग्णालयांची मनमानी आणि शासनाकडून निधी मिळण्यास होणारा विलंब, अशी आव्हाने योजनेची यशस्वी अंमलबजावणी करताना निर्माण झाल्याचे निदर्शनास येत आहे.

सर्व धर्मादाय रुग्णालयांमध्येही ही योजना सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, अनेक रुग्णालये योजनेच्या अंमलबजावणीत रुग्णांची आणि नातेवाइकांची दिशाभूल करत असल्याच्या तक्रारी वारंवार आरोग्य विभागाकडे केल्या जात आहेत.

आयुष्मान योजनेअंतर्गत अंगीकृत असलेली रुग्णालये बरेचदा गंभीर असलेला रुग्ण दाखल करून घेत असताना 'मला या योजनेचा लाभ घ्यायचा नाही,' असा अर्ज संबंधित रुग्ण किंवा नातेवाइकांकडून लिहून घेतात.

> महाराष्ट्र शासनकाही रुग्णालये गैरकृतीने जनसामान्यांची आर्थिक पिळवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. रुग्णालयांच्या वर्तणुकीमुळे शासनाची प्रतिमा मलिन होत आहे. राज्यातील एकूण अंगीकृत असलेल्या २०३१ रुग्णालयांतील प्रशासनाने व अंगीकृत असलेल्या धर्मादाय रुग्णालयांनी यापुढे रुग्णास तातडीने भरती करून उपचार सुरू करावेत. रुग्णास मोफत उपचारापासून वंचित ठेवल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.
>
> **- डॉ. ओमप्रकाश शेटे,** अध्यक्ष, आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती

बऱ्याचदा एखादा आजार योजनेअंतर्गत बसत नाही, असे सांगितले जाते किंवा औषधांसाठी जास्त पैसे आकारले जातात. या पार्श्वभूमीवर आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीकडून ९ एप्रिल २०२५ रोजी राज्यातील सर्व रुग्णालयांना पत्र पाठवण्यात आले आहे. रुग्णास मोफत उपचारांपासून वंचित ठेवलयाचे निदर्शनास आल्यास संबंधितांना कठोर कारवाई केली जाणार आहे.

## प्रॅक्टिकल शिका इव्हेंट मॅनेजमेंट शिबीराचे आयोजन

**पुणे :** इव्हेंट मॅनेजमेंट हा १० सत्रांचा विकेंड क्रॅश कोर्स रमेश पाटणकर इव्हेंट्स यांच्या संयुक्त विद्यमाने लवकरच सुरू होत आहे. यात लाइव्ह फिल्ड एक्सपिरियन्स देण्यात येणार असून दोन सत्रांमध्ये इव्हेंट सेटअप, डेकोरेशन, ड्रेपिंग आणि व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक घेण्यात येईल. अनुभवी आणि नावाजलेल्या मेंटर्सकडून मार्गदर्शन, बजेट मॅनेजमेंट सत्रात इव्हेंट बजेट नीट कसे हाताळावे तसेच कॉर्पोरेट इव्हेंट्स, इव्हेंट मॅनेजमेंटचे महत्त्वाचे पैलू जसे की प्रॅक्टिकल सोल्यूशन्स, लॉजिस्टिक्स हँडलिंग आणि क्रिएटिव्ह एक्सेक्यूशन इ.विषयी मार्गदर्शन होईल. इव्हेंट इंडस्ट्रींना कुशल मनुष्यबळाची वाढती मागणी असून हा कोर्स करणाऱ्यांना ही कौशल्ये शिकण्याची संधी आहे.

## कामगार बडतर्फी प्रकरणी शपथपत्र सादर करा

**पुणे :** इव्हेंट मॅनेजमेंट हा १० सत्रांचा विकेंड क्रॅश कोर्स रमेश पाटणकर इव्हेंट्स यांच्या संयुक्त विद्यमाने लवकरच सुरू होत आहे. यात लाइव्ह फिल्ड एक्सपिरियन्स देण्यात येणार असून दोन सत्रांमध्ये इव्हेंट सेटअप, डेकोरेशन, ड्रेपिंग आणि व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक घेण्यात येईल. अनुभवी आणि नावाजलेल्या मेंटर्सकडून मार्गदर्शन, बजेट मॅनेजमेंट सत्रात इव्हेंट बजेट नीट कसे हाताळावे तसेच कॉर्पोरेट इव्हेंट्स, इव्हेंट मॅनेजमेंटचे महत्त्वाचे पैलू जसे की प्रॅक्टिकल सोल्यूशन्स, लॉजिस्टिक्स हँडलिंग आणि क्रिएटिव्ह एक्सेक्यूशन इ.विषयी मार्गदर्शन होईल. इव्हेंट इंडस्ट्रींना कुशल मनुष्यबळाची वाढती मागणी असून हा कोर्स करणाऱ्यांना ही कौशल्ये शिकण्याची संधी आहे.

## कात्रजमध्ये कचरा डेपोला आग

**पुणे :** गुजर-निंबाळकरवाडीतील खोपडेनगर येथे डोंगरावर मोकळ्या जागेत एका खासगी ठेकेदाराकडून लाकडे, पाला-पाचोळा, नारळाच्या झावळ्या, प्लायवूड अशा प्रकारचा कचरा डंपिंग करण्यात येत होता. त्या ठिकाणी दुपारी चारच्या सुमारास आग लागण्याची घटना घडली.

# भीषण पाणीटंचाई; योग्य नियोजन करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्याधिकारी यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत प्रशासनाने डोळ्यात तेल घालून पाणीटंचाईला तोंड देण्याच्या आणि नियोजनबद्ध पद्धतीने पावले टाकून काम करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी त्यांनी प्रत्येक जिल्ह्यात किती टँकर्स सुरू आहेत आणि गेल्या वर्षी काय परिस्थिती होती, याचाही आढावा घेतला.

ग्रामीण असो किंवा शहरी भाग, लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागू नये. उन्हाळा तीव्र आहे त्यामुळे पिण्याचे पाणी जपून वापरा. तसेच, १५ जुलैपर्यंत पाणीसाठा पुरेल असे नियोजन करावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. तसेच, जिल्हा प्रशासन, पालिका प्रशासन जिल्हा परिषदा यांनी प्रत्यक्ष फिल्डवर भेटी देऊन पाण्याची सद्यःस्थिती जाणून घेण्याच्या व टंचाई असलेल्या भागात तत्काळ उपाययोजना करण्याचे आदेशही शिंदे यांनी दिले.

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्यात काही ठिकाणी पाण्याची टंचाई उद्भवली असून, येणाऱ्या दोन महिन्यांत प्रशासनाने दक्षता घ्यावी आणि बीडीओ, तहसीलदार, ग्रामसेवक, पोलीस पाटील यांनी सातत्याने फिल्डवर संपर्क ठेवून आपापल्या भागातल्या टंचाईचा सर्व्हे करावा व योग्य ती पावले तातडीने उचलावी. ज्या जिल्ह्यांनी कृती आराखडा सादर केला नाही त्यांनी दोन-तीन दिवसांत सादर करावा, असे आदेशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले. तात्पुरत्या नळयोजनांना तसेच तलावांत चर खणण्याच्या कामाला गती द्यावी. पाण्याचा अवैध उपसा थांबवला पाहिजे. लघु प्रकल्पातून वारेमाप उपसा होणार नाही हे पाहणे गरजेचे आहे.



> पाण्याचे प्रमाण कमी झाले की, स्त्रोत दूषित होऊ शकतात. हे पाणी पिण्यायोग्य आहे किंवा नाही ते तपासण्याची गरज आहे, कोणत्याही परिस्थितीत पिण्याचे पाणी वाहून नेणारे टँकर्सदेखील चांगले आणि स्वच्छ असावेत. त्यांच्यावर जीपीएस लावावे म्हणजे त्यांचा दुरूपयोग टळेल.
>
> **-एकनाथ शिंदे,** उपमुख्यमंत्री

# परीक्षा शुल्कात १० टक्क्यांची वाढ होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आता विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी ४७० रुपयांऐवजी ५२० रुपये भरावे लागणार आहेत. परीक्षा शुल्कात ५० रुपयांनी वाढ होणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता दहावी- बारावीच्या परीक्षा शुल्कात १० टक्क्यांची वाढ करण्यावर शिक्कामोर्तब केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांना यंदा मोठा भुर्दंड सहन करावा लागणार आहे.

राज्य शिक्षण मंडळाच्या कार्यकारी परिषदेच्या बैठकीत परीक्षा शुल्कवाढीचा मुद्दा चर्चेला आला होता. या चर्चेनंतर निर्णय घेत फक्त परीक्षा शुल्कात वाढ झाली.



इतर शुल्कांमध्ये जसे प्रशासकीय शुल्क, गुणपत्रक शुल्क व प्रमाणपत्र शुल्कात कोणताही बदल केला नाही. यामध्ये प्रत्येक प्रकारासाठी २० रुपये शुल्क कायम आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेनंतर मिळणाऱ्या गुणपत्रिका व प्रमाणपत्रे लॅमिनेट स्वरूपात दिली जातात. यासाठी प्रत्येकी २० रुपये शुल्क आकारले जात आहे. हे शुल्क देखील विद्यार्थ्यांकडूनच घेतले जाते.याव्यतिरिक्त १७ नंबर फॉर्म भरून परीक्षेला बसणाऱ्या खासगी विद्यार्थ्यांना १ हजार ११० रुपये नोंदणी शुल्क भरावे लागेल.

शासनाने तीन वर्षांत टप्प्याटप्प्याने एकूण ३० टक्के परीक्षा शुल्कवाढीचा निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे दरवर्षी १० टक्के वाढ करण्याचे ठरवण्यात आले होते. त्यानुसार आगामी शैक्षणिक वर्षातील परीक्षांसाठीही शुल्कात वाढ होणार आहे. शुल्कवाढीचे हे सलग तिसरे वर्ष आहे. याबाबत पालकांमधून मात्र नाराजीचा सूर आहे.

# राजकीय व्यंगचित्र लोकशाहीचे प्रतीक : शि. द. फडणीस




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आपल्या चेहऱ्यावर हास्याची लकेर उमटवणाऱ्या प्रत्येक व्यंगचित्रांची शाखा वेगळी असते. राजकीय व्यंगचित्र लोकशाहीचे प्रतीक असते, तर अभ्यासक्रमाशी संबंधित व्यंगचित्र शिक्षकाची भूमिका बजावणारे असते. या व्यंगचित्रांमुळे जीवनातील क्लिष्टता कमी होते, असे मत ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि.द. फडणीस यांनी व्यक्त केले.

विश्वास प्रकाशनातर्फे जागतिक व्यंगचित्रकार दिनाच्या पूर्वसंध्येनिमित्त व्यंगचित्रांचे ज्येष्ठ अभ्यासक, संग्राहक आणि प्रसिध्द लेखक मधुकर धर्मापुरीकर लिखित ‘हास्य चित्रे देशातली परदेशातली’ या पुस्तकाचे प्रकाशन आज ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. स्वा. सावरकर अध्यासन केंद्रात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे, लेखक मधुकर धर्मापुरीकर, प्रसिद्ध चित्रकार गिरीश सहस्रबुद्धे आणि विश्वास प्रकाशनाच्या संचालक वैशाली पेंडसे -कार्लेकर आदी उपस्थित होते. यावेळी मधुकर धर्मापुरीकर यांच्या खास शैलीत देशातल्या आणि परदेशातल्या हास्यचित्रांचा आस्वाद रसिकांनी घेतला. फडणीस म्हणाले की, बालभारतीच्या निमित्ताने गणितासारख्या क्लिष्ट विषयात व्यंगचित्रांचा समावेश करण्याचा प्रस्ताव आला, तेव्हा त्याला विरोध देखील झाला. मात्र, आमच्या आणि व्यंगचित्र कलेच्या बाजूने उभ्या राहिलेल्या सुजाण व्यक्तींमुळे ती संकल्पना प्रत्यक्षात आली. व्यंगचित्र हे केवळ हास्य निर्माण करत नाही, तर चित्र पाहणाऱ्याला ज्ञानचक्षू प्रदान करीत असते. नव्या पिढीतील मुलांपर्यंत व्यंगचित्रे पोहोचविण्याचा विश्वास प्रकाशनाचा प्रयत्न अतिशय स्तुत्य आहे.

> व्यंगचित्र वाचण्याची सवय आपण लावून घेतली पाहिजे. गेल्या काही वर्षांपासून अमेरिकेत 'कॅलव्हीन अँड हॉब्स' आणि 'डॉगमॅन' या हास्य चित्र मालिका प्रसिद्ध आहेत. पालकांनी मुलांना वेगवेगळ्या दर्जाचे साहित्य, चित्रे, हास्य चित्रे पाहू द्यावी. त्यातून मुलांची दृष्टी विकसित होते. लहान आणि मोठ्या मुलांना आवडतील अशीच पुस्तके काळाच्या ओघात टिकून राहतात.
>
> **-डॉ. वसंत काळपांडे,** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

# अतिक्रमण कारवाईत राजकीय हस्तक्षेप

## राजकीय दबावाला बळी पडून प्रशासन हतबल



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने सध्या शहरातील बेकायदेशीर फलक, फ्लेक्स यांच्याकडे मोर्चा वळवला आहे. शहरातील विविध भागातील राजकीय सामाजिक सर्वच अनधिकृत फ्लेक्सवर जोरदार कारवाईची मोहीम सुरू केली आहे. हे पथक सोमवारी (दि.०५) कारवाईला गेलं. नेत्यांचा अधिकाऱ्याला फोन आला आणि कारवाई न करताच पथक परत फिरलं. महापालिकेचे या अतिक्रमण विरोधी पथकाकडून सर्वसामान्यांना वेगळा आणि राजकीय मंडळींना वेगाने न्याय दिल्याबद्दल नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी शहरात अनधिकृत फ्लेक्सवर कडक कारवाई करा, कोणत्याही पक्षातला असला तरी त्याला थारा देऊ नका, शहर भकास होऊन देऊ नका, असे सक्त आदेश दिले असतानाही राजकीय दबावाला बळी पडून प्रशासन हतबल झाल्याचे दिसत आहे.

विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचा वाढदिवस शहरात मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी गाव येथे दि.४ मे ते १९ मे या कालावधीत भव्य आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पिंपरीतील नवमहाराष्ट्र मैदानावर या स्पर्धा होत असून मैदानाच्या प्रवेशद्वाराजवळ स्वागताचा भला मोठा अनधिकृत फ्लेक्स लावण्यात आला आहे. आज (दि.०५) रोजी पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिक्रमण विरोधी पथक या ठिकाणी कारवाईसाठी दाखल झाले. मात्र स्पर्धा आयोजकांच्या समर्थकांनी या ठिकाणी मज्जाव करत या अतिक्रमण विरोधी पथकाला हुसकावून लावले. फ्लेक्स काढूनच दाखवाचं मग बघू काय होते ते.. असा दम देखील अधिकाऱ्यांना देण्यात आला.. शेवटी एका वरिष्ठ अधिकाऱ्याला कार्यकर्त्यांनी फोन केला आणि कारवाई न करताच या पथकाला तेथून परतण्याची वेळ आली.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अतिक्रमण कारवाईवर गंभीर पक्षपाताचे आरोप होत आहेत. सामाजिक संस्था, ज्यांचा उद्देश लोकहिताचा असून, विविध जनकल्याणकारी उपक्रमांच्या माध्यमातून समाजसेवा करणाऱ्या या संस्थांना महापालिकेच्या कारवाईचा सामना करावा लागत आहे. तर दुसरीकडे, राजकीय नेत्यांच्या फ्लेक्स आणि बॅनरबाजीकडे मात्र हेतुपुरस्सर दुर्लक्ष होत असल्याची तक्रार वारंवार समोर येत आहे.

### राजकीय बॅनरवर डोळेझाक..

● पिंपरी चिंचवड शहरात अतिक्रमण विरोधी पथक नियमितपणे कारवाई करत असते. या कारवाया करताना सामाजिक संस्था लावलेल्या छोट्या सूचना फलकांवर तात्काळ कारवाई केली जाते, त्यांना नोटीसा पाठवल्या जातात, फलक काढून टाकले जातात किंवा दंड आकारला जातो. परंतु त्याच भागात राजकीय पक्षांचे फ्लेक्स मोठ्या प्रमाणावर झळकत असूनही, त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. हे प्रकार अतिक्रमण विभागाच्या कार्यपद्धतीतील दुजाभाव दाखवतात.

### नागरिकांचाही रोष

● सामान्य नागरिकही या पक्षपाती कारवाईबाबत नाराज आहेत. "राजकीय बॅनर रस्त्याच्या कडेला, झाडांवर, सार्वजनिक ठिकाणी लावून शहराची शान घालवत आहेत. पण त्यांच्यावर कारवाई होत नाही. मग नियम फक्त सामाजिक संस्थांसाठीच का?" असा सवाल अनेक सुज्ञ नागरिकांनी उपस्थित केला आहे.

### "सर्वांसाठी एकच नियम हवा"

● या प्रकारामुळे सामाजिक संस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. "आम्ही समाजहितासाठी काम करत असताना जर आमच्यावरच अन्याय केला जात असेल, तर पुढे समाजसेवा करणे कठीण होईल," असे मत एका संस्थेच्या पदाधिकाऱ्याने व्यक्त केले. सामाजिक संस्था या व्यापारी किंवा राजकीय उद्देश न ठेवता कार्यरत असूनही त्यांच्यावरच कठोर नियम लावणे हा अन्याय आहे, असे त्यांनी सांगितले.



## 'टॅरिफ युद्ध ही भारतासाठी सुसंधी!': डॉ. शैलेंद्र देवळाणकर

**पिंपरी :** 'अमेरिकेने सुरू केलेले टॅरिफ युद्ध ही भारतासाठी सुसंधी आहे!' असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय राजकारणाचे विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, पेठ क्रमांक २५, निगडी प्राधिकरण येथे केले. स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळ आयोजित चार दिवसीय छत्रपती शिवाजीमहाराज व्याख्यानमालेत 'अमेरिकन टॅरिफच्या भयकंपाचे वास्तव' या विषयावर तृतीय पुष्प गुंफताना शैलेंद्र देवळाणकर बोलत होते. हिंदुत्ववादी कार्यकर्ते आनंद रायचूर, इंद्रायणी सहकारी बँकेचे उपाध्यक्ष महेश चांडक, स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाचे अध्यक्ष के. विश्वनाथन नायर, कार्याध्यक्ष रमेश बनगोंडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

छत्रपती शिवाजीमहाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. आनंद रायचूर यांनी, 'अर्थविषयक ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे!' असे मत व्यक्त केले. महेश चांडक यांनी, 'शिवाजीमहाराज व्याख्यानमाला ही आता एक सांस्कृतिक परंपरा झाली आहे!' असे गौरवोद्गार काढले.

## पुणे-लोणावळा मार्गिकेचा डीपीआर तयार

**वडगाव मावळ, :** केंद्र सरकारकडून २०१७ मध्ये मावळ लोकसभा मतदारसंघातील लोणावळा ते पुणे दरम्यानच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेची घोषणा करण्यात आली होती. केंद्र सरकारने या प्रकल्पाला मंजुरी दिलेली, तसेच अर्थसंकल्पात त्याचा उल्लेखही केला होता. मात्र, जमीन अधिग्रहण आणि अन्य कारणांमुळे पुणे-लोणावळा तिसरा आणि चौथा मार्ग अद्याप रखडला आहे. परंतु आता हा प्रकल्प वेगाने पूर्ण होणार असल्याचे केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. यावेळी सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण आणि संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार श्रीरंग बारणे आणि मेधा कुलकर्णी उपस्थित होते. केंद्र सरकारकडून राज्यातील विविध रेल्वे प्रकल्पांना गती देण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. यात पुणे-लोणावळा तिसरी-चौथी मार्गिका, पुणे-नागपूर वंदेभारत गाडी सुरू करणे, पुणे-अहिल्यानगर, पुणे-नाशिक, इंदौर-मनमाड, जालना-मनमाड नवीन मार्गिकांची कामे, पुणे रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास आणि परिसरातील स्थानकांचा विस्तार यांसह राज्यातील इतर रेल्वे प्रकल्पांची कामे लवकर मार्गी लावणार आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.


## आरोपींची धिंड काढतेवेळी स्थानिक महिलेचा संताप

**पिंपरी :** गोरगरिबांच्या गाड्या फोडायला लाज वाटली नाही का? साहेब.., कपड्याने झाकलेली त्यांची थोबाडं उघडी करा... आमच्या पोरांना पण पाहू द्या !, अशा संतप्त शब्दांत एका स्थानिक महिलेने भोसरीत पोलिसांनी आरोपींची धिंड काढली तेव्हा आपला रोष व्यक्त केला. रविवारी (दि. 20) गव्हाणे वस्ती, आदिनाथनगर येथे बारा वाहनांची तोडफोड करण्याची घटना घडली. दरम्यान, आरोपींना अटक करून पोलिसांनी परिसरातून धिंड काढली. या वेळी स्थानिकांनी आपल्या भावना तीव— शब्दांत व्यक्त केल्या.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, रविवारी रात्री आरोपी हातात कोयते, दगड घेऊन सुखवानी बाग सोसायटीसमोर आले. त्यांनी काहीही कारण नसताना रस्त्यालगत उभ्या कार, टेम्पोची तोडफोड सुरू केली. यामध्ये १२ कार आणि एका टेम्पोचे नुकसान केले. आरोपींना पोलिसांनी घटनास्थळी नेऊन धिंड काढल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. अनेकांनी पोलिसांच्या कारवाईचे खुलेपणाने समर्थन केले. पोलिसांनी आरोपींना सर्वांसमक्ष उभे करून त्यांना कायद्याचा धडा शिकवल्याने सामान्य जनतेमध्ये सुरक्षिततेचा भाव निर्माण झाला आहे. या वेळी काहींनी अशा समाजकंटकांना शिक्षा झालीच पाहिजे,ङ्घ अशा शब्दांत प्रतिक्रिया दिली. तसेच, भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही या वेळी करण्यात आली.

## ऑनलाइन तिकीट आरक्षणात व्यत्यय; प्रवाशांना आर्थिक भुर्दंड

**पिंपरी :** सुट्ट्यांचा हंगाम सुरू झाल्यामुळे एसटीच्या



ऑनलाइन तिकीट आरक्षणाकडे प्रवाशांचा कल आहे. पण, मागील काही दिवसांपासून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) संकेतस्थळावर ऑनलाइन तिकीट आरक्षण करताना प्रवाशांना अनेक तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. संकेतस्थळ सुरळीत चालत नसल्याने तिकीट बुकिंग होत नाही. परिणामी, प्रवाशांना एसटी बसस्थानकाकडे धाव घ्यावी लागत आहे.

उन्हाळी सुट्ट्यांमध्ये गावी जाणाऱ्यांसह कौटुंबिक सहली आणि पर्यटनासाठी जाणाऱ्यांची गर्दी असते. या काळात एसटी बसेसना गर्दी असल्यामुळे अगोदरच तिकीट बुकिंग करून गावी जाण्याचे नियोजन असते. एसटी बसचे तिकीट आरक्षण करण्यासाठी https://msrtc.maharashtra.gov.in या संकेतस्थळाचा किंवा एसटी महामंडळाच्या ॲपचा वापर होतो; पण, मागील काही दिवसांपासून एसटी महामंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन तिकीट आरक्षण करताना अनेक तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. संकेतस्थळावर लॉग-इन करण्यापासून ते तिकिटाचे ऑनलाइन पैसे भरण्यापर्यंत अनेक अडचणी येत आहेत.

# काँग्रेसकडून संविधान बचाव अभियान



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) काँग्रेसच्या वतीने "संविधान बचाव अभियानाला" सुरुवात देहूरोड, विकासनगर येथून काल (३ मे) करण्यात आली. दि. ३ ते ३० मे, २०२५ पर्यंत शहरात राबविण्यात येणाऱ्या अभियानाची माहिती काँग्रेस शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी पुढीलप्रमाणे दिली. या अभियानाच्या माध्यमातून शहरातील कार्यकर्त्यांच्या माध्यमातून संवाद साधणार आहे. शहरातील विविध भागातील मुख्य चौकातुन दि. ३ ते ११ मे २०२५ या कालावधीत संविधान बचाव अभियाना अंतर्गत सभाचे आयोजन करण्यात आले आहे. या सभांच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाचे अपयश जनतेच्या निदर्शनास आणुन तसेच वाढती बेरोजगारी, महागाई, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न, शासनाने दिलेल्या आश्वासनांची न झालेली पुर्तता व अशा अनेक कारणांमुळे नागरिकांना होणारा त्रास याकडे सर्वांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणार आहोत.

शहरी भागामध्ये नागरिकांचे अनेक प्रश्न असून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका न झाल्यामुळे महानगरपालिका क्षेत्रात बोकाळलेला प्रचंड भ्रष्टाचार आणि अनियमितता व त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना होणारा मनस्ताप यासंदर्भात आवाज उठविणे गरजेचे आहे. महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्वच्छतेचे अनेक प्रश्न निर्माण झाले असून योग्य नियोजन नसल्यामुळे शहर दिवसेंदिवस बकाल होत चालले आहेत. या प्रश्नांबाबत सुध्दा आवाज उठवून सर्वांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणार आहोत.

विधानसभा स्तरीय संविधान बचाव पदयात्रा या अभियानाच्या दूसऱ्या टप्प्यात तिन्ही विधानसभानिहाय संविधान बचाव पदयात्राचे आयोजन १२ ते २० मे २०२५ या कालावधीत करण्यात येणार आहे. यावेळी केंद्र व राज्य शासनाचे विविध क्षेत्रातील अपयश तसेच ईडी, सीबीआय सारख्या केंद्रिय संस्थांच्या माध्यमातून विरोधी पक्षाच्या नेत्यांना गैरकायदेशीरपणे देण्यात येणारा त्रास, तसेच दलित वर्ग, आदिवासी, ओबीसी, अल्पसंख्यांक आणि महिला वर्गाच्या प्रश्नांकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष व समाजामध्ये निर्माण होत असलेले असंतोष या प्रश्नांवर या पदयात्रेमध्ये चर्चा घडवून आणण्यात येणार आहे.

घर घर संपर्क अभियान या अभियानाच्या तिसऱ्या व शेवटच्या टप्प्यात प्रत्येक घराघरांमध्ये जाऊन नागरिकांशी संवाद प्रक्रिया करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम दि. २१ ते ३० मे २०२५ या कालावधीत करण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक बुथवरील नेते मंडळी, कार्यकर्ते यांना सक्रिय करुन त्यांच्या माध्यमातून त्या बुथमधील प्रत्येक कुटूंबाशी संपर्क साधण्यात येणार आहे. वाढती महागाई, बेरोजगारी, महिला वर्गाचे प्रश्न, वाढती गुन्हेगारी तसेच आपल्या भागातील इतर ज्वलंत प्रश्नांबाबतची माहिती पत्रके तयार करुन त्याचे वाटप घरोघरी करण्यात येणार आहे. घर घर संपर्क अभियानाच्या दरम्यान नागरिकांशी जास्तीत जास्त संपर्क करण्यात येणार आहे.

## कुदळवाडी ग्रामस्थ आक्रमक टीपी प्लॅनची कॉपी जाळली



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिखली :** तीन महिन्यापूर्वी कडेकोट पोलिस बंदोबस्तात कुदळवाडीत बुलडोझर कारवाई करण्यात आली. प्रत्यक्षात ही कारवाई टीपी प्लॅनसाठीच असल्याचा इरादा महापालिकेने जाहीर केल्यानंतर ग्रामस्थ संतापले आहेत. कुदळवाडीतील ग्रामस्थांची यात प्रचंड बदनामी झाली, लोक बेरोजगार झाले, उद्योगधंदे बंद पडले, कोट्यवधींचे आर्थिक नुकसान झाले आणि आता टीपी योजनेसाठीच ही कारवाई रचल्याचे उघड झाल्याचे सांगत गावकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

विठ्ठल रुक्मिनी मंदिरात यासंदर्भात बैठक झाली आणि टीपी स्किमला विरोध करण्यासाठी तीव्र जनआंदोलन उभारण्याचा निर्णय करण्यात आला. आमचा जीव गेला तरी बेहत्तर पण टीपी स्किम होऊ देणार नाही, अशा अत्यंत कठोर शब्दांत ग्रामस्थांनी भावना व्यक्त केल्या. महापालिका प्रशासनाचा निषेध म्हणून टीपी स्किमचे जाहीरात यावेळी जाळण्यात आली. आम्हाला भूमिहिन करण्याचा प्रयत्न कऱणाऱ्यांचाच आम्ही खात्मा करू असा पवित्रा सर्वांनी घेतल्याने वातावरण तापले.

सकाळी सुरू झालेल्या या बैठकीत जोरदार भाषणे झाली. टीपी ला विरोध करायचा असे ठरले. यापूर्वी चिखली कुदळवाडीच्या जमिनी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणात गेल्या. महापालिकेच्या आरक्षणात मोठे क्षेत्र गेले. स्वस्त घरकूलासाठी १०० एकर क्षेत्र घेतले. आता कुठे बरे चालले होते तर टीपी योजना आणली. कारवाईला सर्व स्थानिकांनी मिळून एकमुखाने विरोध करायचे ठरले आणि त्यासाठी वाट्टेल ती किंमत मोजू, असा इशाराही देण्यात आला. आता टीपीस्किम करून भूमिहिन करणार असाल तर ते आम्ही कदापि सहन करणार नाही, असे निक्षून सांगण्यात आले.

## पीएमपीच्या ॲपला जनजागृतीचा अभाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** पुणे महानगर परिवहन महामंडळाचे (पीएमपीएमएल) 'आपली पीएमपीएमएल' ॲप १० लाख ५१ हजार प्रवाशांनी डाऊनलोड केले आहे. ॲपद्वारे त्यांनी १५ कोटी रुपयांची तिकिटे आणि १४ कोटी ९१ लाख रुपयांचे पास काढले आहेत. मात्र दैनंदिन प्रवाशांच्या तुलनेत ॲपद्वारे तिकीट आणि पास काढणाऱ्यांची संख्या अजूनही सरासरी केवळ ०.८३ टक्के असल्याचे दिसून येते. जनजागृतीअभावी ॲपला प्रवाशांचा थंड प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येते.

पीएमपी प्रशासनाने डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी क्यूआर कोडद्वारे ऑनलाइन पेमेंट सुविधा सुरू केली आहे. तसेच प्रवाशांना घरबसल्या बसचे 'लाइव्ह लोकेशन' दिसावे, ऑनलाइन तिकीट व पास काढता यावा, ऑनलाइन तक्रार करता यावी, म्हणून 'आपली पीएमपीएमएल' हे ॲप विकसित केले. १५ ऑगस्ट २०२४ पासून हे ॲप प्रवाशांच्या सेवेत दाखल झाले असून मार्च अखेरपर्यंत १० लाख ५१ हजार प्रवाशांनी 'आपली पीएमपीएमएल' ॲप डाऊनलोड केले आहे. ॲपद्वारे १५ कोटी ४ लाख ६८ हजार ३२१ रुपयांची तिकिटे आणि १४ कोटी ९१ लाख ४५ हजार ३९० रुपयांचे पास काढले आहेत. यावरुन महिन्याला सरासरी पावणे चार कोटी रुपयांचे ॲपद्वारे तिकीट आणि पास विक्री होत असल्याचे समोर आले आहे. मात्र पीएमपीचे दैनंदिन प्रवासी संख्या सरासरी दहा लाख आणि उत्पन्न सरासरी दीड कोटी रुपये आहे. यातुलनेत ॲपद्वारे तिकीट आणि पास काढणाऱ्यांची संख्या अजूनही सरासरी केवळ ०.८३ टक्के असल्याचे दिसून येते.




**पुणे** आपटे रोड,शिवाजी नगर येथे उभारण्यात आलेल्या ऑलविन फिनसर्व प्रा लि. च्या नूतन कार्यालयाचे दिमाखदार उदघाटन करण्यात आले. व्हाईटओक मुच्यअल फंडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष सोमय्या, यांच्यो हस्ते फीत कापून तसेच दिपप्रज्वलन करून उदघाटन झाले .

# शिरूर परिसरामध्ये धर्मांतराच्या कारस्थानाचा बंदोबस्त!

## आमदार महेश लांडगे यांच्या आक्रमक भूमिकेनंतर सात जणांवर गुन्हा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिरूर :** टाकळीहाजी (ता. शिरूर) येथील परिसरातील उचाळेवस्ती येथे हिंदू देवतांबद्दल अपशब्द व अपमानास्पद भाष्य करणे आणि ख्रिश्चन धर्मात येण्यासाठी दबाव टाकण्यात आला. यानंतर भेदरलेल्या संबंधित कुटुंबाने पोलिसांकडे धाव घेतली. मात्र, पोलिसांनी हात वर केल्यानंतर हा प्रकार भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या कानावर घालण्यात आला. आमदार लांडगे यांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर ख्रिश्चन धर्मात येण्यासाठी मतपरिवर्तन केल्याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात सात जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, शिरूर परिसरामध्ये अशाप्रकारे ठराविक धर्मात येण्यासाठी नागरिकांवर आमिष आणि दबाव आणला जात आहे. नागरिकांचे मत परिवर्तन करण्यासाठी काही मंडळी गावागावात फिरत असल्याचा आरोप बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. ख्रिश्चन धर्मात येण्यासाठी दबाव आणल्या प्रकरणी शेतकरी राहुल मारुती गायकवाड (वय ३९, रा. उचाळेवस्ती-टाकळीहाजी, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.याप्रकरणी सात आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे.

गुरुवारी (१ मे रोजी) सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास राहुल गायकवाड हे आपल्या कुटुंबासोबत घरासमोर बसले होते. यावेळी प्रशांत जालिंदर घोडे व त्याच्यासोबत सहा अनोळखी व्यक्ती त्यांच्या घरी आले. "तुम्ही कोणत्या धर्माचे?" अशी विचित्र चौकशी करत,"बायबल वाचा, चर्चमध्ये या, तुमच्यावर प्रभु येशूची कृपा होईल," असे सांगत धर्मपरिवर्तनासाठी दबाव टाकला." तुमच्या देवांनी काय केलं?" असा सवाल करत, सात जणांचे टोळके उचाळेवस्ती येथील गायकवाड कुटुंबाच्या दारात येऊन बसला! "प्रभु येशूला मान्य करा, चर्चमध्ये या, आर्थिक फायदा होईल असे अमिष दाखवले. त्यानंतर गायकवाड कुटुंबीयांनी पोलिसांकडे धाव घेतली. पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### धर्मपरिवर्तनासाठी गावागावात नागरिकांवर दबाव...

● शिरूर परिसरामध्ये वारंवार धर्म परिवर्तनासाठी दबाव आणला जात आहे. मात्र पोलिसांकडून याबाबत योग्य कारवाई केली जात नाही. वेळीच कारवाई होत नसल्यामुळे धर्म परिवर्तनासाठी फिरणाऱ्या लोकांचे फावले आहे, असा आरोप बजरंग दलाच्या वतीने करण्यात आला आहे. पोलिसांनी अशा प्रकारांवर तातडीने गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात येत आहे.



" धर्म परिवर्तन करण्यासाठी नागरिकांवर दबाव आणणे. त्यासाठी गावागावात फिरणे. हिंदू देवदेवतांचा अपमान करणे. अवमानकारक भाषा वापरणे हे सर्व प्रकार जाणीवपूर्वक केले जात आहेत. अशा प्रकाराबाबत तक्रार आल्यानंतर पोलिसांनी याबाबत कडक कारवाई तात्काळ करणे अपेक्षित आहे. वेळीच असे प्रकार रोखले नाही तर समाजातील अनुचित घटना वाढत जातील. राज्य सरकारनेही या प्रकारांची दखल घेतली आहे.

**— महेश लांडगे,** आमदार, भाजपा,

संपादकीय विशेष

# निर्णयाचे स्वागतच...

मागील आठवड्यात केंद्रीय मंत्रिमंडळाने जात निहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला. या संबंधीची घोषणा केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत केल्यानंतर संपूर्ण देशातून जात निहाय जनगणनेचे स्वागतच करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांपासून विरोधकांसह अनेक सामाजिक संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांसह विरोधकांकडून सातत्याने जात निहाय जनगणनेची मागणी होत होती. विशेषतः विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ही मागणी सातत्याने लावून धरली होती. उशिरा का होईना पण पण जात निहाय जनगणनेला मंजुरी देऊन सरकारने एक चांगला निर्णय घेलता आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच जात निहाय जनगणना होतेय हे विशेष याआधी इंग्रजांच्या काळात १८८१ ते १९३१ पर्यंत झालेल्या जनगणनेत जातींची गणना झाली होती. १९४१ च्या जनगणनेत देखील जातींची गणना करण्यात आली होती पण त्याची आकडेवारी जाहीर करण्यात आली नव्हती. १९५१ साली स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदा जनगणना झाली या जनगणनेत जात निहाय जनगणना व्हावी अशी मागणी झाली होती मात्र तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी त्यास नकार दिला त्यांच्या मते जात निहाय जनगणनेमुळे जातिजातीत विभाजन होऊन राष्ट्रीय एकतेला बाधा पोहचू शकते त्यामुळे त्यांनी जात निहाय जनगणेस नकार दिला होता. मात्र या जनगणनेत अनुसूचित जाती आणि जमातींची गणना करण्यात आली तशी ती प्रत्येक जनगणनेत करण्यात आली कारण अनुसूचित जाती जमातींची जनगणना व्हावी असे घटनेतच नमूद करण्यात आले आहे. अनुसूचित जाती जमातींची गणना जनगणनेत केली जाते मात्र इतर मागासवर्गीय जातींची गणना करण्यात येत नव्हती ती आता करण्यात येईल. जात निहाय जनगणना हा एक चांगला निर्णय आहे. जात निहाय जनगणना झाल्याने सर्व जातींची लोकसंख्या मोजण्यात येईल त्यामुळे कोणत्या जातींची किती लोकसंख्या आहे ते समजेल. १९३१ साली झालेल्या जनगणनेत मागासवर्गीय जातींची लोकसंख्या ५२ टक्क्यांहून अधिक असल्याचे सांगण्यात आले होते. मंडल आयोगाने इतर मागास वर्गाला आरक्षण देताना हीच लोकसंख्या ग्राह्य धरून इतर मागास वर्गाला २७ टक्के आरक्षण दिले होते. इतर मागास वर्गाची लोकसंख्या यापेक्षा अधिक आहे त्यामुळे २७ टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण मिळायला हवे अशी मागणी इतर मागास वर्गाकडून होऊ लागली होती. आता जात निहाय जनगणना झाल्यामुळे सर्व जातींची लोकसंख्या मोजली जाईल त्यामुळे या वर्गाची नाराजी दूर होईल. जात निहाय जनगणना झाल्याने आरक्षणाची जी ५० टक्के मर्यादा आहे ती देखील वाढवली जाईल. सध्या सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा ५० टक्के ठेवली आहे. जात निहाय जनगणनेमुळे संसद आणि विधान सभेचे चित्रही बदलू शकते. शिवाय जात निहाय जनगणना झाल्यावर प्रत्येक जातीच्या विकासासाठी त्यांच्या लोकसंख्येनुसार निधी उपलब्ध करून दिला जाईल. जात निहाय जनगणनेमुळे प्रत्येक जातीची शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थितीबद्दल स्पष्टता येईल. या आकडेवारीत स्पष्टता आल्यावर सरकार त्यांच्यासाठी अधिक मजबूत धोरणे बनवू शकेल एकूणच जात निहाय जनगणना ही देशाच्या सामजिक आणि आर्थिक क्षेत्रावर दूरगामी परिणाम करणारी ठरेल.

आता प्रश्न असा आहे की ही जात निहाय जनगणना होणार कधी ? जात निहाय जनगणने संदर्भातील विधेयक आगामी पावसाळी अधिवेशनात मांडले जाऊ शकते. म्हणजेच सप्टेंबर पासून जात निहाय जनगणनेची प्रारंभिक प्रक्रिया सुरू होऊ शकते. मात्र प्रत्यक्ष जात निहाय जनगणना एप्रिल २०२६ पासून सुरू होण्याची शक्यता आहे. २०२१ सालीच ही जनगणना व्हायला हवी होती मात्र कोरोणामुळे ती पुढे ढकलण्यात आली आता ती पुढील वर्षी होण्याची शक्यता आहे. जनगणना ही दर दहा वर्षांनी होते. जनगणना ही दीर्घ चालणारी प्रक्रिया आहे.

प्रत्यक्ष जनगणनेचे काम जरी काही महिनेच असले तरी त्यातून येणाऱ्या आकडेवारीचे प्रामाणिकिकरण आणि प्रकाशनासाठी एक दोन वर्ष लागतात म्हणजेच या जात निहाय जनगणनेची आकडेवारी २०२७ सालीच हाती येईल. या जात निहाय जनगणानेसाठी सुमारे १४ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे त्याची तरतूद आगामी अर्थसंकल्पात केली जाईल.

# सागरातील बदलांचा जीवसृष्टीवरील परिणाम

जीवसृष्टी रा
मिलद बेंडाळे
अभ्यासक

मानवजात पूर्णपणे महासागरांवर अवलंबून आहे. आपल्या अनेक महान संस्कृतींचा विकास महासागरांच्या किनाऱ्यावर झाला आहे. आज आपण आपल्या आर्थिक, सामाजिक आणि भौतिक कल्याणासाठी महासागरावर अधिक अवलंबून आहोत. जागतिक व्यापारापासून पर्यटनापर्यंत सागरी क्रियाकलाप वार्षिक 30 ट्रिलियन डॉलरपेक्षा अधिक रकमेची उलाढाल करतात. 'ओशन इकॉनॉमी' ही जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था आहे. पाणबुडीच्या केबल्सपासून शिपिंग, मत्स्यपालन आणि मत्स्यपालनापर्यंत आपण निळ्या अर्थव्यवस्थेवर अधिकाधिक अवलंबून रहात आहोत. आपण खात असलेल्या प्राणी प्रथिनांपैकी वीस टक्के समुद्री माशांपासून येतात; परंतु गेल्या शतकात महासागर नाटकीयरित्या बदलत असून भविष्यात आणखी बदल घडू शकतात. आज मानवता सामाजिक, राजकीय, पर्यावरणीय आणि वैज्ञानिक बदलांच्या केंद्रस्थानी आहे. समुद्राचे निरीक्षण करण्याची, मॉडेल करण्याची आणि समजून घेण्याची आपली क्षमता अलिकडच्या वर्षांमध्ये प्रचंड वाढली आहे; परंतु मानवी कल्याणावर लक्ष केंद्रित करणे आणि त्याचे सागरी प्रक्रियांवर अवलंबून राहणे हे एक महत्त्वाचे पाऊल ठरु शकते. आज समुद्राच्या तळाच्या प्रक्रियेद्वारे चाललेल्या हवामानबदलाच्या मोठ्या घटनांचा अंदाज घेण्याची आपली क्षमता सुधारणे आवश्यक आहे. सागरी भूकंप, त्सुनामी, चक्रीवादळ आणि वादळामुळे मानवी कल्याणाला गंभीर धोका निर्माण होतो. आज या घटनांचे निरीक्षण करण्याची, समजून घेण्याची आणि भाकित करण्याची क्षमता सुधारणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे.


महासागर संशोधन आणि मूलभूत अभ्यासासाठी सतत निधी मिळणे आवश्यक आहे. महासागर विज्ञान पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीवर अवलंबून असते. आपण उदयोन्मुख तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि विद्यमान महासागर पायाभूत सुविधांचा विस्तारित वापर एकत्र केला पाहिजे. यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य आवश्यक आहे, कारण यापैकी काही आव्हाने प्रत्यक्षात स्थानिक आहेत. तात्कालिक समस्यांकडे लक्ष देण्याची गरज असली, तरी गंभीर संशोधनासाठी आपली वचनबद्धता महासागरातील जटिल बदलांचे व्यवस्थापन करण्याची क्षमता निश्चित करते. त्यामुळे सामूहिक कृती आवश्यक आहे. त्यासाठी संशोधन संस्थांनी आपला दृष्टिकोन बदलायला हवा. धोरणकर्त्यांनी दीर्घकालीन तपासाला महत्त्व देणारी चौकट तयार करायला हवी. हंपबॅक व्हेल दर वर्षी आग्नेय पॅसिफिक महासागर ओलांडून एक लांब आणि आव्हानात्मक प्रवास करतात. ते अन्नासाठी मध्य आणि दक्षिण अमेरिकेपासून अंटार्क्टिकापर्यंत सुमारे दहा हजार किलोमीटरचा प्रवास करतात. नवीन संशोधनात दिसून आले आहे की, व्हेल त्यांच्या स्थलांतराची वेळ निश्चित करण्यासाठी पर्यावरण आणि समुद्राच्या परिस्थितीतील बदलांच्या त्यांच्या भूतकाळातील आठवणी वापरतात; पण हवामानात बदल होत असताना, सागरी परिस्थिती झपाट्याने बदलत असल्याने ही रणनीती तितकी प्रभावी ठरणार नाही, अशी शास्त्रज्ञांची चिंता आहे.

**महासागर सध्या 90 टक्के जागतिक उष्णता आणि सुमारे 30 टक्के कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात. महासागरातील भौतिक आणि जैविक बदलांमुळे हे दर कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यकाळात वातावरणातील तापमानात वाढ होईल. परिणामी, येत्या काळात परिसंस्थेच्या लवचिकतेत घट होऊन अन्नपुरवठा आणि उपजीविकेवर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे.**

मध्यंतरी मॅकगिल विद्यापीठाशी संबंधित शास्त्रज्ञांच्या नेतृत्वाखाली एक अभ्यास करण्यात आला. या अभ्यासात 2009 ते 2016 दरम्यानचा 'सॅटेलाइट ट्रॅकिंग डेटा' वापरला. या कालावधीत, कोस्टा रिका, पनामा आणि इक्वाडोरजवळ 42 टॅग केलेल्या व्हेलचा मागोवा घेण्यात आला. अंटार्क्टिका ओलांडून दक्षिणेकडे त्यांच्या हालचालींचे अनुसरण करून शास्त्रज्ञांना समजून घ्यायचे होते की व्हेलला दर वर्षी स्थलांतर कधी करायचे हे ठरवण्यासाठी कोणते संकेत मदत करतात. या अभ्यासाचे निष्कर्ष 'सायंटिफिक रिपोर्ट्स जर्नल'मध्ये प्रकाशित करण्यात आले आहेत. अभ्यासात असे दिसून आले आहे की व्हेल समुद्राचे तापमान आणि अन्न उपलब्धता यासारख्या स्थानिक संकेतांकडे लक्ष देतात. हवामानबदलामुळे महासागरातील आवाज पाचपटीने वाढू शकतो, सागरी जीवांना त्याचा फटका सहन करावा लागतो. त्यांच्या स्मृती आणि विद्यमान संकेतांच्या मदतीने ते लांबचा प्रवास कधी सुरू करायचा हे ठरवतात. दक्षिण महासागरात त्यांचे मुख्य अन्न केव्हा मुबलक असेल हे निर्धारित करण्यात ही माहिती त्यांना मदत करते. क्रिल हा एक लहान क्रस्टेशियन प्राणी आहे. तो अंटार्क्टिकामधील व्हेलचे मुख्य अन्न आहे. दर वर्षी, एका विशिष्ट हंगामात क्रिलची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. यासंदर्भात या अभ्यासाशी संबंधित प्रमुख संशोधक प्रा. व्हर्जिनी मिलियन यांनी म्हटले आहे की त्याला त्याच्या मुक्कामाची योग्य वेळ ठरवण्यास मदत होते. त्यामुळे ते अगदी त्याच वेळी पोहोचतात, जेव्हा त्यांचे अन्न मुबलक असते.

व्हेल मासे हवामानातील बदलांशी जुळवून घेऊ शकत नाहीत. हजारो वर्षांपासून व्हेल या वेळेची पद्धत वापरून स्थलांतर करत आहेत; मात्र हवामानातील बदलांमुळे हे अवघड होत आहे. गरम होणारे महासागर आणि समुद्रातील बर्फातील बदल क्रिलच्या वाढीच्या वेळेवर परिणाम करत आहेत. व्हेल या बदलांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करत असले, तरी असमर्थ ठरत आहेत. 2016 पासूनचे प्रत्येक वर्ष अधिकाधिक उष्ण ठरत आहे. प्रकाश प्रदूषणामुळे सागरी जीवांच्या पुनरुत्पादक आणि हार्मोनल चक्रात अडथळा निर्माण होत आहे. नर आणि मादी व्हेल वेगवेगळ्या प्रकारे स्थलांतर करतात, असेही या अभ्यासातून समोर आले आहे. नर हंपबॅक व्हेल जलद प्रवास करतात आणि सरळ मार्ग घेतात. दुसरीकडे, मादी, विशेषत: संतती असलेल्या, भक्षक टाळण्यासाठी आणि विश्रांतीसाठी वेळ मिळावा यासाठी लांब किनारी मार्ग स्वीकारतात. शास्त्रज्ञांच्या मते व्हेलचे स्थलांतर मार्ग आणि खाद्य क्षेत्रांचे संरक्षण अत्यावश्यक आहे. किनारपट्टीवरील जहाजांची वाहतूक वाढत जाते, तसतसे व्हेल माशांपुढील धोकेही वाढतात. अशा वेळी व्हेल माशांची जहाजांशी टक्कर होणे आणि स्थलांतराच्या मार्गात अडथळा येणे यामुळे या प्राण्यांची संख्या कमी होते. व्हेल समुद्राला निरोगी ठेवण्यास मदत करतात. ते सागरी परिसंस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहेत. ते खाऊन कचरा उत्सर्जित करतात, तेव्हा पाण्याद्वारे महत्त्वपूर्ण पोषक तत्वांचे वितरण करण्यास मदत करतात. हे 'फायटोप्लँक्टन' सारख्या लहान वनस्पतींना वाढण्यास मदत करते. या वनस्पती कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि ऑक्सिजन सोडतात. हे सागरी अन्न साखळीला समर्थन देते आणि जमिनीवरील हवामानावरदेखील परिणाम करते.

व्हेल शार्कसाठी शिपिंग हा मोठा धोका आहे. व्हेल त्यांच्यावर अवलंबून असलेल्या इतर सागरी प्राण्यांसाठी अन्नाच्या नवीन संधी निर्माण करतात. म्हणजे त्यांचे अस्तित्व जैवविविधतेलाही प्रोत्साहन देते. दुसरीकडे, व्हेल नामशेष झाल्यास समुद्राची उत्पादकताही कमी होईल. अशा परिस्थितीत, संशोधकांनी हंपबॅक व्हेलचे खाद्य क्षेत्र आणि स्थलांतर मार्गांच्या संरक्षणावर भर दिला आहे. विशेषत: हवामान वेगाने आणि सतत बदलत असताना हे केले जात आहे. शास्त्रज्ञांच्या मते या भागांच्या संरक्षणामुळे व्हेललाच फायदा होणार नाही, तर संपूर्ण सागरी अन्नसाखळीलाही आधार मिळेल. सतत हवामानबदल आणि शक्तिशाली 'एल निनो' इव्हेंटचा परिणाम जागतिक स्तरावर, विशेषत: होनोलुलुसारख्या बेट शहरांसाठी किनारपट्टीवरील समुदायांसाठी धोक्याची घंटा आहे. येथे वाढत्या महासागरांनी वास्तविक, तात्काळ धोका निर्माण केला आहे. हा केवळ नजीकच्या काळातला धोका नाही, तर सध्याचे वास्तव आहे, जे अनेक लोकांचे दैनंदिन जीवन बदलत आहे. समुद्रसपाटीपासूनची उंची मोजण्यासाठी शास्त्रज्ञ अनेक आधुनिक साधने वापरतात. उपग्रहांवरील विशेष उपकरणे समुद्रात मायक्रोवेव्ह सिग्नल पाठवतात आणि सिग्नल परत येण्यासाठी किती वेळ लागतो हे मोजतात. गेल्या 30 वर्षांमधील उपग्रह निरीक्षणांनी एक स्पष्ट चित्र रंगवले आहे. 1993 पासून जागतिक सरासरी समुद्रपातळीमध्ये तब्बल 4 इंच (9.4 सेंटीमीटर) वाढ झाली आहे. सर्वात वाईट बाब म्हणजे या वाढीचा वेग अधिक आहे. 1993 पर्यंत समुद्राची पातळी दर वर्षी सुमारे 0.07 इंच (0.18 सेंटीमीटर) वाढत होती. आता वार्षिक वाढ दुप्पट झाली आहे. 2050 पर्यंत जागतिक सरासरी समुद्रपातळीत आणखी 20 सेंटीमीटर वाढ होण्याच्या मार्गावर आहे. त्याचा परिणाम समुद्री जीवावर होऊ शकतो.




## राशीभविष्य

- **मेष** : कारकिर्दीत नव्या संधी लाभतील. स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील. खरेदीचा उत्साह राहील.
- **वृषभ** : कौटुंबिक प्रश्न हैराण करतील. नोकरीत सहकाऱ्यांशी मतभेद संभवतात. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **मिथुन** : दिलासादायक घटना घडतील. तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. खर्चाचं प्रमाण वाढतं राहील.
- **कर्क** : व्यवसायात कामाचा ताण वाढेल. महत्त्वाच्या भेटी लांबणीवर पडतील. प्रवासात काळजी घ्यावी.
- **सिंह** : उपजत कला-गुणांचा विकास होईल. प्रक्रिया उद्योगात संधी लाभतील. दानधर्माकडे ओढा राहील.
- **कन्या** : महत्त्वाची कामं मार्गी लागतील. आलेल्या संधींचा लाभ घ्यावा. प्रियजनांच्या भेटीचे योग आहेत.
- **तूळ** : घरगुती व्यवसायात उत्कर्ष होईल. नव्या करारांना चालना मिळेल. विवाहाच्या प्रयत्नात यश येईल.
- **वृश्चिक** : खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. छोटा-मोठा प्रवास घडेल.
- **धनु** : सरकारी कामांना गती येईल. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. स्थावर प्रश्न मार्गी लागतील.
- **मकर** : कामाचा ताण वाढेल, नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक स्वीकाराव्या. आर्थिक स्थिती साधारण राहील.
- **कुंभ** : सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. घरगुती प्रश्न मिटतील. विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव मिळेल.
- **मीन** : मनासारख्या घटना घडतील. कार्यातील सातत्य कामी येईल. प्रगतीच्या नव्या संधी लाभतील.

खादाडी

## टेस्टी ब्ल्यू रिबन ॲपल पाय

**साहित्य-** चारशे ग्रॅम मैदा, एक टी स्पून मीठ, २४० ग्रॅम लोणी, १०० मिली पाणी, ४७० ग्रॅम लाल सफरचंद, ४७० ग्रॅम हिरवं सफरचंद, १२० ग्रॅम साखर, ४५ ग्रॅम ब्राऊन शुगर, अर्धा टी स्पून लिंबाचा रस, पाच चमचा दालचिनी पावडर, ६० मिली सफरचंदाचा रस, अंड्याचा पांढरा भाग इत्यादी.

**कृती-** बाऊलमध्ये मैदा, मीठ आणि लोणी चांगल्या प्रकारे फेटून घ्यावं. यात पाणी मिसळून ते कणकेसारखं मळून तीन ते चार तास फ्रीजमध्ये ठेवून द्यावं. फ्रीजमधून बाहेर काढून त्याचे दोन भाग करावेत. दोन्ही भाग पोळपाटावर गोल लाटून घ्यावे. एक भाग बेकिंग डिशवर लावून अर्धा तास फ्रीजमध्ये ठेवून द्यावा. यानंतर भांड्यात लाल आणि हिरव्या सफरचंदाचे काप, साखर, ब्राऊन शुगर, लिंबाचा रस, मीठ, दालचिनी एकत्रित शिजवून घ्यावं. मिश्रण थंड झाल्यावर त्यात सफरचंदाचा रस मिसळावा. हे मिश्रण थंड करायला ठेवलेल्या पोळीवर पसरावं. त्यावर दुसरी लाटलेली पोळी ठेवून काठ दुमडून घ्यावेत. या पोळ्या मधोमध क्रॉस आकार देत कापून घ्याव्या. याचे काठ आणि पृष्ठभाग अंड्याच्या पांढऱ्या भागाने ब्रश करून घ्यावेत. त्यानंतर ओव्हनमध्ये ३० मिनिटांपर्यंत बेक करून घ्यावं. ओव्हनमधून बाहेर काढल्यानंतर दोन तास थंड होण्यासाठी ठेवून द्यावं. थंड झाल्यावर सर्व्ह करावं. टेस्टी ब्ल्यू रिबन ॲपल पाय तयार आहे.

## ६ मे

दिनविशेष

२०१० : २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याप्रकरणी अजमल कसाब याला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.

२०१३ : देशातील ६८ टक्के लोकांना अन्न पुरवण्याची तरतूद असणारे अन्नसुरक्षा विधेयक चोरट्या पद्धतीने, बळजबरीने संमत करण्याचा काँग्रेसचा डाव फसला.

२०१७ : विधायक चळवळीतील अग्रणी आणि 'ऑर्डर ऑफ कॅनडा' म्हणून गौरवलेले डॉ. जगन्नाथ वाणी यांचे निधन

महत्त्वपूर्ण काही

## व्हॉट्स ॲपवर ब्लॉक केलं तर...

दोस्तांनो, तुमचं एखाद्या मित्राशी किंवा मैत्रिणीशी भांडण झालं आहे का? त्यांनी तुम्हाला व्हॉट्स ॲपवर ब्लॉक केलं आहे का? आता आपलं म्हणणं त्यांच्यापर्यंत कसं पोहोचवायचं असा प्रश्न आपल्याला पडतो. अबोला संपवायचा असेल तर त्यांना संपर्क करायला हवा. यासाठी तुम्ही युक्ती लढवू शकता.

* ही युक्ती लढवण्यासाठी तुम्हाला एका मित्राची मदत लागेल.
* हा मित्र व्हॉट्स ॲप ग्रुप बनवेल. या ग्रुपमध्ये तुम्ही, तुमचा मित्र आणि तुमच्याशी अबोला धरणारा मित्र असे तिघेजण असतील.
* या ग्रुपच्या माध्यमातून तुम्ही त्या मित्राशी संपर्क साधू शकाल.
* पुढे हा ग्रुप तयार करणारा मित्र ग्रुपमधून बाहेर पडेल. मग तुम्ही दोघेच उराल. आता या ग्रुपवर तुम्ही तुमचं म्हणणं मांडू शकता. तुमच्याशी न बोलणाऱ्या मित्राशी संपर्क साधू शकता. आहे ना गंमत? मग मित्राशी भांडण झालं तरी काळजी करू नका. या मार्गाने त्याच्याशी संपर्क साधा आणि पुन्हा मैत्री करा.

## पंचांग

**मंगळवार, ६ मे २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
वैशाख शु. ९, नक्षत्र : मघा,
चंद्रराशी : सिंह, योग : ध्रुव
सूर्योदय: ६.१०, सूर्यास्त: ७.०१

## फॉरवर्डस

**मुझे किसी के बदल जाने का कोई गम नही।**

**बस कोई था, जिस पर खुद से ज्यादा भरोसा था।**

आरोग्यमंत्र

## 'डेंटल फोबिया' विषयी...

दातदुखी हे अत्यंत वेदनादायी दुखणं असून एकदा या वेदना सुरू झाल्या की रुग्ण तळमळत राहतो. एखादी वेदनाशामक गोळी घेऊन वेदना कमी करण्यावर बहुतेकांचा भर असतो. मात्र यामुळे मूळ दुखणं तसंच राहतं. रुग्ण दंतवैद्याकडे जाण्याची टाळाटाळ करत राहतो. डेंटिस्टकडे जाण्याच्या विचारानेच त्याला कापरं भरतं. तुम्हीही यातील एक असाल तर काही तरी चुकतंय, हे लक्षात घ्या. याला 'डेंटल फोबिया' असं म्हटलं जातं. अशा फोबियामुळे दंततज्ज्ञाची भेट टाळली जाते आणि हिरड्या किंवा दातांच्या वेदना सहन केल्या जातात. डेंटल एंग्झायटी आणि फोबिया हे दोन वेगळे प्रकार आहेत. डेंटल एंग्झायटी म्हणजे दंततज्ज्ञाकडे जाण्याची विचित्र भीती. दंततज्ज्ञाच्या भेटीच्या वेळी ताण येण्याला एंग्झायटी म्हणू शकतो तर फोबिया असलेल्या व्यक्तींना दातांच्या उपचारांची प्रचंड भीती वाटते. अशा व्यक्ती दंततज्ज्ञाकडे जाण्याबाबत टाळाटाळ करतात. डेंटल फोबिया किंवा एंग्झायटी असणाऱ्या व्यक्तींना हिरड्यांचे विकार, दात पडणं, दात किडणं अशा समस्या निर्माण होतात. खराब दात, हिरड्यांच्या समस्या, तोंडाची दुर्गंधी, तोंडाच्या आरोग्याची काळजी न घेणं अशा कारणांमुळे अशा व्यक्तींचा आत्मविश्वास डळमळीत होतो. मानसिक पातळीवरही ते तणावग्रस्त होतात. या विकारांवर उपचार करणं शक्य आहे. इतर कोणत्याही मानसिक विकाराप्रमाणे यावर उपचार शक्य आहेत.



## वाचा तर खरं

एके काळी हार्डवेअर आणि नेटवर्किंग क्षेत्रात फारशा संधी उपलब्ध नव्हत्या. पण गेल्या काही वर्षांत आयटी क्षेत्राचा विस्तार झाला आहे. त्यातही हार्डवेअर उद्योगला मिळालेल्या बळकटीमुळे हे क्षेत्र बरंच पुढे गेलं आहे. २०२० पर्यंत इलेक्ट्रॉनिक उत्पादनं तसंच उपकरणांची मागणी प्रचंड वाढणार असल्याचं बोललं जात आहे. म्हणूनच हार्डवेअर आणि नेटवर्किंग हे करीअरसाठी उत्तम संधी देणारं क्षेत्र ठरत आहे.

या क्षेत्रात येण्यासाठी दहावीनंतरही अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. इंजिनिअरींग करूनही तुम्ही या क्षेत्रात येऊ शकता. **क्रमश:**

करिअरवाटा

## आपत्ती व्यवस्थापनातील संधी

व्यवस्थापन क्षेत्रात कारकिर्द घडवायची असल्यास केवळ पदवी किंवा अनुभव कामी येत नाही तर वारंवार उद्भणारे प्रश्न, नवे कायदे, नवं वातावरण याचा सतत धांडोळा घ्यावा लागतो. व्यवस्थापन शास्त्रातील नव्या ज्ञानाचं आकलन करून घेऊन रिफ्रेशर कोर्स करावे लागतात. इथं एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, ती म्हणजे रिफ्रेशर कोर्समध्ये प्रवेश घेऊ इच्छिणारे व्यवस्थापक विद्यार्थ्याप्रमाणे पूर्ण वेळ अभ्यासक्रमाला हजेरी लावू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्यासाठी पार्टटाईम आणि शक्यतो कामाच्या वेळेनंतर वर्ग भरवणारे अभ्यासक्रम घेतले जातात. अलिकडे नैसर्गिक संकटांमध्ये होणारी वाढ, अपघातांची वाढती संख्या, आगीच्या वाढत्या दुर्घटना यामुळे आपत्ती व्यवस्थापनाला महत्त्व प्राप्त झालं आहे. याही क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची वानवा दिसते. आपत्ती व्यवस्थापनामध्ये संबंधितांना विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यादृष्टीने शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम असणंही गरजेचं ठरतं. हे लक्षात घेता आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भातील अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत. त्यामुळे आवड असल्यास या क्षेत्रातही काम करता येईल.



खेचाखेची

## मस्करी महागात

**संता** : काय रे, कुठे पळतो आहेस?

**बंता** : अरे काल गर्लफ्रेंडला मस्करीत म्हणालो, ''दिल चीर के देख, तेरा ही नाम होगा''

तर कालपासून ती येडी, चाकू घेऊन माझ्या मागे लागलीये!!

## वेगळं काही

अरूणाचल प्रदेशातल्या चीनी सीमा म्हणजे 'लाईन ऑफ ॲक्च्युअल कंट्रोल' (एलएसी) जवळ 'काहू' नावाचं एका गाव आहे. या गावात १२ कुटुंब राहतात. इथली लोकसंख्या अवघी ७६ आहे. गावात मयोर जमातीचे लोक राहतात. ही जमात फार कमी प्रमाणात आढळते. इथे मूलभूत सुविधाही उपलब्ध नाहीत. या गावापर्यंत पोहोचण्यासाठी चांगले रस्ते नाहीत. दूरसंचाराचीही साधनं नाहीत. इथले लोक कष्टाचं जीवन जगतात. पावलोपावली त्यांना आव्हानांना सामोरं जावं लागतं. इथल्या लोकांना भारतीय लष्कराकडून मदत मिळते. सैन्यातले अधिकारी गावकऱ्यांना सर्वतोपरी मदत करतात. तसंच सर्व सोयी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करतात.

संगोपन

## मुलांना घडवताना...

उन्हाळी सुट्ट्यांमध्ये विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित होत असतात. त्यानिमित्त नातेवाईक आणि मित्रमंडळी एकत्र येतात. अशा वेळी मुलांच्या हट्टीपणामुळे रंगाचा बेरंग होऊ शकतो. हे टाळण्यासाठी मुलांना काही एटिकेट्स शिकवणं गरजेचं असतं.

* पाहुण्यांचं स्वागत योग्यप्रकारे कसं करायचं हे मुलांना शिकवावं. प्रत्येशाशी हसून बोलण्याचे धडे द्यावेत. * पाहुण्यांनी दिलेल्या भेटवस्तूचा हसतमुखाने स्वीकार करणं आणि धन्यवाद देणं त्यांना शिकवावं. * पाहुण्यांनी आणलेल्या भेटवस्तूंबाबत लगेचच कोणतीही प्रतिक्रिया देऊ नये, भेटवस्तू आवडली नसल्यास नाराजी व्यक्त करू नये, हे त्यांना समजावून सांगावं. * पार्टीसाठी पाहुणे म्हणून गेल्यानंतर कसं वागावं याचेही धडे त्यांना द्यावेत. * गिफ्ट देण्यासाठी मुलांना पुढाकार घेऊ द्यावा. यातूनच संवाद सुरू होतो. * मुलं लवकर बोअर झाल्यास त्यांचं मन रमवण्याचा प्रयत्न करावा. कोणतंही सामान वापरण्यापूर्वी यजमानांची अनुमती घ्यायला मुलांना शिकवावं. * निघताना यजमानांचा निरोप घेण्यास त्यांना शिकवावं. मोठ्यांना अभिवादन करण्यास सांगितलं जावं.



'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

At a Glance

## भारताचा पाकला जोरदार प्रत्युत्तर?

**पुणे :** नौदल, हवाई दल प्रमुखानंतर संरक्षण सचिव पीएम मोदींच्या भेटीला नवी दिल्ली पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव वाढला आहे. भारत पाकिस्तानविरुद्ध काही कठोर कारवाई करणार असल्याचे अंदाज वर्तवले जात आहेत. दरम्यान, देशाचे संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पंतप्रधान निवासस्थानी भेट घेतली. नौदल आणि हवाई दल प्रमुखांनंतर, पंतप्रधान मोदींची संरक्षण सचिवांसोबतची बैठक खूप महत्त्वाची मानली जात आहे. २६ एप्रिल रोजी पंतप्रधान मोदींनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, संरक्षण प्रमुख जनरल अनिल चौहान आणि तिन्ही सैन्याच्या प्रमुखांसोबत एक महत्त्वाची बैठक घेतली. ही बैठक सुमारे दीड तास चालली, ज्यामध्ये पंतप्रधान मोदींनी सर्व दलांना पाकिस्तानविरुद्ध कारवाई करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले. पंतप्रधान मोदींनी बैठकीत सांगितले की, 'सैन्यदलाने स्वतःच्या सोयीनुसार वेळ आणि लक्ष्य ठरवून प्रत्युत्तर द्यावे.'

पान १ वरून

## सीईटी सेल परीक्षेच्या...

आहे. परीक्षा देणारे काही विद्यार्थी नोकरी करणारे त्याच्या खात्यामध्ये बरीच रक्कम होती. ही चोरी सकाळी ७.३० ते १०.३० या वेळेत झाली असावी असा अंदाज वर्तवला जात आहे. या प्रकरणाबद्दल माहिती उस्मानपूरा आणि सातारा पोलिस ठाण्यांमध्ये तक्रारी दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखा सायबर सेल करत आहे.

# लाडक्या बहिणींना २१०० नाहीच

## संजय शिरसाट यांची स्पष्टोक्ती

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आल्यास लाडक्या बहिणींना १५०० रुपयांत
वाढ करुन २१०० रुपये देण्यात येतील, अशी घोषणा महायुतीच्या जाहीरनाम्यात
करण्यात आली होती. मात्र, राज्यात महायुती सरकार येऊन ६ महिने होत आले, त्यातच एक अर्थसंकल्पीय अधिवेशनही पार पडलं. मात्र, लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी मिळणार हा प्रश्न अनुत्तरीत आहे. त्यातच, सरकारमधील मंत्री नरहरी झिरवाळ यांनी २१०० रुपये देण्याचा शब्द दिलाच नव्हता असे म्हटले. तर, आता मंत्री संजय शिरसाट यांनीही स्पष्टपणे भूमिका मांडली आहे. लाडक्या बहिणींना १५०० चे २१०० देता येणार नाही ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल, असे शिरसाट यांनी म्हटले आहे. राज्यातील सामाजिक व न्याय विभागाचे मंत्री असलेल्या संजय शिरसाट यांनी गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या खात्याला पैसे कमी मिळत असल्याचा दावा केला. विशेष म्हणजे लाडकी बहीण योजनेसाठी आपल्या खात्याचा पैसा वळविण्यात आल्याचेही त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे, सरकारमध्येच लाडकी बहीण योजनेवरुन एकवाक्यता नसल्याचे दिसून येते. त्यातच, आज भूमिका मांडताना शिरसाट यांनी स्पष्टच शब्दात लाडक्या बहिणींना १५०० ऐवजी २१०० रुपये देण्यात येणार नसल्याचेही स्पष्ट केले.

राज्याचे बजेट अडीच लाख कोटी रुपयांच आहे. सामाजिक न्याय विभागाला साडे एकोणतीशे कोटी मिळायला हवेत. मला २२ हजार कोटी रुपये मिळाले आहेत.

लाडक्या बहिणींसाठी ३ हजार कोटी विविध योजनेसाठी ७ हजार कोटी दिले आहेत.

मला केवळ १५ हजार कोटी रुपये मिळाले, त्यातील ७ हजार कोटी दुसऱ्या योजनेला गेले आहेत. त्यामुळे, मला ३ हजार कोटी रुपये देणे आहे. मुख्यमंत्र्यांना मी लेखी पत्र दिलं आहे, अजित पवार यांना देखील विनंती केली आहे. ११. ८ टक्के रक्कम मला म्हणजेच माझ्या खात्याला देणं गरजेचे आहे, असे म्हणत मंत्री संजय शिरसाट यांनी आपली भूमिका परखडपणे मांडली.

लाडक्या बहीणींबाबत मला फेब्रुवारी मधे फाईल आली होती त्यावेळी मी स्पष्टपणे पैसे देत येणार नाही, असे लिहिले होते. लाडक्या बहीण योजनेचे सरकारवर बर्डन आहे. अजित पवार जाणीवपूर्वक करत असतील असं मला वाटत नाही. त्यांना गाईड करणारे सेक्रेटरी चुकीच ब्रीफ करत असणार, असे म्हणत संजय शिरसाट यांनी आपली नाराजी आणि लाडकी बहीण योजनेबद्दलची वस्तुस्थिती माध्यमांसमोर मांडली. १५०० रुपयेची रक्कम २१०० करता येणार नाही ही वस्तुस्थिती आहे ती मान्य करावी लागेल, असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले.

# सायबर हल्ल्याचा पाकिस्तानी हॅकर्सचा दावा

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पहलगाम हल्ल्यानंतर भारत पाकिस्तानमध्ये तणाव वाढत असतानाच आता पाकिस्तानच्या पाकिस्तान सायबर फोर्स या हॅकर गटाने भारताच्या अनेक वेबसाईट्स हॅक केल्याचा दावा केला आहे. भारताच्या संरक्षण क्षेत्राशी संबंधित अनेक वेबसाईट्स हॅक करून संवेदनशील माहिती मिळवल्याचा दावा केला जात आहे. दरम्यान, या घटनेने दोन्ही देशांमध्ये वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सायबर सुरक्षा यंत्रणांना सतर्क केले आहे. पाकिस्तानी हॅकर गटाने भारतीय सैनिकी अभियांत्रिकी सेवा, मनोहर पर्रीकर संरक्षण अभ्यास आणि विश्लेषण संस्था आणि इतर काही महत्वाच्या संरक्षण संस्था हॅक केल्याचा दावा केला आहे. हॅकर्सनी त्यांच्या एक्स (माजी ट्विटर) खात्यावरून पोस्ट करत सांगितले की, त्यांनी भारतीय लष्कराच्या कर्मचाऱ्यांची वैयक्तिक माहिती व लॉगिन क्रेडेन्शियल्स (संगणकीय खात्यांमध्ये प्रवेश देणारे गोपनीय तपशील) मिळवले आहेत. भारतीय सायबर सुरक्षा यंत्रणांनी यासंदर्भात तातडीने तपास सुरू केला आहे. हॅकर्सनी संरक्षण मंत्रालयाअंतर्गत असलेल्या एका सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीची वेबसाईट डिफेस केल्याचा दावा देखील केला आहे. वेबसाईटवर पाकिस्तानचा ध्वज व 'अल खालिद' टँकचा फोटो लावण्यात आला होता. यामुळे ही वेबसाईट सध्या तात्पुरती ऑफलाइन करण्यात आली आहे आणि तिचा सखोल ऑडिट सुरू आहे. भारतीय सायबर सुरक्षा संस्थांनी याप्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, भविष्यातील कोणतेही

# महायुती सरकारला सर्वोच्च दिलासा

## बदलापूर प्रकरणात नव्या एफआयआरची गरज नाही



राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बदलापुरातील शाळेत दोन चिमुकल्या विद्यार्थीनींवर त्याच शाळेत सफाई कर्मचारी असलेल्या अक्षय शिंदेने अत्याचार केला होता. या प्रकरणी त्याला अटक झाल्याच्या काही महिन्यातच त्याचा एन्काउंटर करण्यात आला. यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाकडून एसआयटी स्थापन करण्यात आली. तर, या प्रकरणातील दोषी पोलिसांवर नव्याने एफआरआय दाखल करावे, असे आदेश उच्च न्यायालयाकडून सरकारला देण्यात आले होते. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात राज्य सरकारने सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती. या प्रकरणी आज सोमवारी सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली असून राज्य सरकारला मोठा दिलासा मिळाला आहे. ही सुनावणी न्यायमूर्ती बेला त्रिवेदी आणि न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांच्या खंडपीठासमोर पार पडली. यावेळी सुप्रीम कोर्टाने राज्य सरकारला दिलासा देत म्हटले की, अक्षय शिंदे एन्काउंटर प्रकरणी नव्याने एफआयए दाखल करायची गरज नाही. एसआयटी पोलीस महासंचालकांच्या देखरेखीखाली काम करेल.

तक्रारदारांनी म्हणजेच अक्षय शिंदेयांच्या कुटुंबीयांनी स्वतः याचिका मागे घेतली आहे. त्यामुळे त्यांना नोटीस जारी करण्याची आवश्यकता नाही. ज्यामुळे आता राज्य सरकारला मोठा दिलासा मिळाला असून मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात आम्ही बदल करत असल्याचे सर्वोच्च न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पोलीस महासंचालक एसआयटी स्थापन करतील. अधिकाऱ्यांची निवड पोलीस महासंचालकांकडून करण्यात येईल. पोलीस महासंचालकांच्या देखरेखीखाली एसआयटी काम करेल. तर, तक्रारदार मजिस्ट्रेट किंवा सत्र न्यायालयात दाद मागू शकतात, असेही यावेळी सर्वोच्च न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, सरकारने मुंबई उच्च न्यायाविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर तुषार मेहता यांनी स्वतः राज्य सरकारची बाजू मांडली आहे. चौकशी कोणता अधिकारी करेल, हे उच्च न्यायालयानेच ठरवले आहे. पण आता डीजीपी स्वतः ठरवतील कोणत्या अधिकाऱ्याने चौकशी करावी, असे तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात म्हटले आहे.

पान १ वरून

## सर्वोत्तम पॅकेज देऊन भूसंपादन

कोणावरही अन्याय होणार नाही, ही ग्वाही दिली. यावेळी आमदार विजय शिवतारे, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी व या प्रकल्प क्षेत्रातील भूसंपादन अधिकारी उपस्थित होते.

आंदोलन आणि गुन्ह्यांचा आढावा घेताना बावनकुळे यांनी सांगितले की, नुकत्याच पुरंदर येथे झालेल्या आंदोलनादरम्यान काही शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल झाले आहेत. यासंदर्भात त्यांनी आमदार विजय शिवतारे आणि जिल्हाधिकाऱ्यांसह मान्यवरांशी चर्चा केली. आंदोलनात निरपराध शेतकऱ्यांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यासाठी चौकशी केली जाईल. मात्र, अधिकाऱ्यांवर हल्ला करणाऱ्यांवर कारवाई होईल, यासाठी आमच्याकडे गंभीर व्हिडिओ पुरावे आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करू. आंदोलनात बैलगाड्या सोडण्याच्या घटनेवरही त्यांनी भाष्य केले. "या प्रकरणाची चौकशी होईल. काही लोकांनी आंदोलन चिघळवण्याचा प्रयत्न केला असावा, पण निरपराध शेतकऱ्यांना न्याय मिळेल," असेही ते म्हणाले.

## हुर्रे! मुलींचीच बाजी

झाले. रिपीटर्स विद्यार्थ्यांची उत्तीर्ण टक्केवारी ३७.६५ टक्के इतकी आहे.

तसेच, यंदा बारावीच्या परीक्षेला ७ हजार २५८ दिव्यांग विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ६ हजार ७०५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. विभागीय निकालाची माहिती देताना शिक्षण अधिका-यांनी कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक ९६.७४ टक्के इतका लागल्याचे जाहीर केले. तर सर्वात कमी निकाल लातूर विभागाचा लागला आहे. लातूरमधून फक्त ८९.७४ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्याशिवाय, विज्ञान शाखा – ९७.३५ टक्के, कला शाखा – ८०.५२ टक्के,वाणिज्य शाखा – ९२.६८ टक्के असा निकाल लागला आहे. तर, व्यवसाय अभ्यासक्रमात ८३.०३ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत आणि आयटीआयचे ८२.०३ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

## 'वक्फ' याचिकांवर खंडपीठ सुनावणी करणार

करून देणे वेदनादायी आहे, असे विधी अधिकाऱ्याने सांगितले. यापूर्वी केंद्र सरकारने १७ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाला आश्वासन दिले होते की, ते ५ मेपर्यंत वक्फ मालमत्तांना अधिसूचित करणार नाहीत किंवा केंद्रीय वक्फ कौन्सिल आणि बोर्डावर कोणत्याही नियुक्त्या करणार नाहीत. संसदेने विचारविनिमय करून मंजूर केलेल्या या कायद्याला सरकारचे म्हणणे ऐकल्याशिवाय स्थगिती देऊ नये, असे आश्वासन केंद्राने खंडपीठाला दिले. 'इन रे द वक्फ (अमेंडमेंट) ॲक्ट, २०२५' असे या पाच याचिकांचे नाव असून त्यात एमआयएमचे प्रमुख आणि हैदराबादचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी दाखल केलेल्या याचिकेचाही समावेश आहे. २५ एप्रिल रोजी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात केंद्र सरकारने सुधारित कायद्याचा बचाव केला आणि संसदेने पारित केलेल्या घटनात्मकतेचा अंदाज असलेल्या कायद्याला न्यायालयाने सरसकट स्थगिती देण्यास विरोध केला.

'वक्फ बाय युजर' मालमत्तेबाबतच्या तरतुदीचे समर्थन करताना न्यायालयाने म्हटले आहे की, कोणत्याही हस्तक्षेपामुळे न्यायालयीन आदेशाद्वारे कायदेविषयक व्यवस्था निर्माण होईल. वापरकर्त्याद्वारे वक्फ म्हणजे अशी प्रथा जिथे मालकाने वक्फची औपचारिक आणि लेखी घोषणा केली नसली तरीही अशा हेतूंसाठी त्याच्या दीर्घकालीन, अखंड वापरावर आधारित मालमत्तेला धार्मिक किंवा धर्मादाय देणगी (वक्फ) म्हणून मान्यता दिली जाते. वक्फ (दुरुस्ती) कायदा २०२५ ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची ५ एप्रिल रोजी मंजुरी मिळाल्यानंतर केंद्र सरकारने गेल्या महिन्यात अधिसूचना जारी केली. लोकसभेत २८८ सदस्यांच्या पाठिंब्याने हे विधेयक मंजूर झाले, तर २३२ खासदारांनी विरोधात मतदान केले. राज्यसभेत या विधेयकाच्या बाजूने १२८ तर विरोधात ९५ मते पडली. द्रमुक, वायएसआरसीपी, एआयएमआयएम, डावे पक्ष, स्वयंसेवी संस्था, मुस्लीम संघटना अशा अनेक राजकीय पक्षांनी या कायद्याच्या वैधतेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

## एजाज खानवर अटकेची तलवार

अरेस्ट' या शोमध्ये काम देण्याचं अमिष देत एजाज खानं या महिलेशी जवळीक साधली. तसंच या शोच्या शूटिंग दरम्यान एजाज खानं तिला प्रपोज केलं. त्यानंतर एजाज खान हा त्या महिलेच्या घरी तिला भेटण्यासाठी गेला. त्यावेळी त्यानं संबंधित महिलेच्या इच्छेविरोधात तिच्यावर बलात्कार केला, असा आरोप महिलेनं आपल्या तक्रारीत केला आहे. दरम्यान, महिलेच्या तक्रारीवरून मुंबई पोलिसांनी एजाज खानविरोधात भारतीय न्यायसंहिता बीएनएसमधील कलम ६४, ६४(२ एम), ६९, ७४ अंतर्गत गुन्हा दाखल केला असून मुंबई पोलीस त्याचा शोध घेत आहेत. अंधेरीतील आंबोली पोलीस ठाण्यात वादग्रस्त शो 'हाऊस अरेस्ट' बाबत समाजात अश्लीलता पसरवल्याबद्दल तक्रार दाखल आहे. या तक्रारीच्या आधारावर मुंबई पोलिसांनी 'उल्लू' या ओटीटी ॲपसह अभिनेता एजाज खान आणि 'उल्लू' ॲपशी संबंधित पदाधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. यात भारतीय न्याय संहितेतील कलम २९६, ३(५), आयटी कलम ६७, ६७(अ) यांसह महिलांचे असभ्य प्रतिरूपण कायद्यातील कलम ४,६ आणि ७ अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

## राज्यात 'मधूपर्यटन'

भागातील रोजगार वाढीस फार मोठी मदत मिळणार आहे. शासनाचा निर्णय अत्यंत योग्य असा आहे. ज्या भागात दाट जंगल आहे, अशा भागात मधाची गावे शासनाने निवडली आहेत. मध हा आयुर्वेदात अत्यंत उपयुक्त असून, मधाचे अनेक फायदे आहेत. तसेच मध नैसर्गिक गोड पदार्थ असून, ज्यामध्ये अनेक पोषक तत्वे आहेत.

## पुतीन यांचा पंतप्रधान मोदींना फोन

तीव्र निषेध व्यक्त केला. या हल्ल्यात २६ निष्पाप लोकांचा ज्यापैकी बहुतांश पर्यटक होते त्यांचा बळी गेला होता. पुतीन यांनी या हल्ल्यात प्राण गमावलेल्या नागरिकांसाठी शोक व्यक्त केला आणि भारताच्या दहशतवादाविरोधातील लढ्यात "पूर्ण पाठिंबा" देण्याचे आश्वासन दिले. रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी ठामपणे सांगितले की, "या हल्ल्यामागील दोषींना आणि त्यांच्या समर्थकांना न्यायासमोर आणलेच पाहिजे." याबाबत माहिती देताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स (पूर्वीचे ट्विटर) वर पोस्ट शेअर केली. पुतीन यांच्या पाठिंब्याने भारताचे पारडे जड ही घोषणा अशा वेळेस आली आहे जेव्हा भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव पुन्हा एकदा उफाळून आला आहे. पहलगाममधील बायसरन खोऱ्यात घडलेला हा हल्ला पर्यटकांच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील स्थळी झाला होता. पुतीन यांच्या या प्रतिक्रियेने भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर एक महत्त्वाचा पाठिंबा मिळाला आहे.

## पीओपीवरील बंदी कायमच

गणेशोत्सवात पीओपीच्या मूर्ती दिसणार की नाही? याचा फैसला आता जून महिन्यात होणार आहे. सीपीसीबीच्या सुचनेनुसार, मुंबई उच्च न्यायालयानं राज्यात लागू केलेल्या पीओपी बंदीला काही मूर्तिकार संघटनांनी न्यायालयात आव्हान दिलं आहे. संपूर्ण राज्यभरात चालणारा उत्सव आणि त्यावर आधारित व्यावसायिकांची संख्या पाहता, राज्य सरकारनंही यात नरमाईची भूमिका घेतली आहे. त्यामुळं याविषयावर राज्य सरकारतर्फे सीपीसीबीला डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल पाठवण्यात आल्याचं महाधिवक्ता डॉ. बीरेंद्र सराफ यांनी सोमवारी उच्च न्यायालयात स्पष्ट केलं. तसंच, हा नवा अहवाल नुकताच पाठवण्यात आल्यानं त्यावर उत्तर देण्यासाठी सीपीसीबीनं उच्च न्यायालयाकडे वेळ मागून घेतला. त्यावर येत्या ९ जूनपर्यंत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश जारी करत उच्च न्यायालयानं तूर्तास पीओपी व्यावसायिकांना कोणताही दिलासा दिलेला नाही.

## कार्गो विमान सेवेत गांजा तस्करी

ओडिसावरून उत्तरप्रदेश जाणाऱ्या पार्सलमध्ये गांजा आढळून आला आहे. पार्सल नागपूरच्या कार्गोमधून जाताना हा प्रकार उघडकीस आला. एका खरड्याच्या बॉक्समध्ये गांजा पार्सल पॅक करण्यात आला. मात्र, कार्गोतील काही कर्मचाऱ्यांना बॉक्स संशयास्पद वाटू लागल्यानं त्यांनी बॉक्सची तपासणी केली. त्यामध्ये १० किलो गांजा आढळून आला.

## 'पाक'च्या आर्थिक नाड्या आवळल्या

आली आहे. तो फिलीपिन्सस्थित प्रादेशिक विकास बँकेच्या निधीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. तसेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडूनदेखील पाकिस्तानला मदत मिळते. दरम्यान इस्लामाबादला निधी रोखण्याचा नवी दिल्लीचा निर्णय हा सीमापार दहशतवादाला पाठिंबा देण्यासाठी आणि शेजारील देशात दहशतवाद्यांना होणारा निधी रोखण्यासाठी त्याच्या व्यापक आर्थिक धोरणाचा एक भाग आहे.

# पुरंदर विमानतळाला तीव्र विरोध

# विरोधकांचा सरकारवर हल्लाबोल

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्या राज्यात पुरंदरचं प्रस्तावित विमानतळ प्रकरण चांगलं गाजत आहे. गेल्या दोन दिवसात या प्रकरणावरून पोलिस आणि आंदोलकांमध्ये मोठी झटापट झाली. पोलिसांनी अश्रू धुराच्या नळकांड्या फोडत आंदोलकांवर लाठी चार्ज ही केला. याच मुद्द्यावरून विरोधक सरकारवर तुटून पडले आहेत. सरकार हा प्रकल्प करण्यावर ठाम आहे, तर या प्रकल्पाला जमिनी देण्यास बाधित गावातील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध आहे. पुण्याच्या पुरंदरमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचं विमानतळ होऊ पाहत आहे. यासाठी तब्बल २६७३ हेक्टर भूसंपादन केलं जाणार आहे. मात्र या भूसंपादनाला सात बाधित गावातील शेतकऱ्यांनी कडाडून विरोध दर्शवला आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून यासाठी ड्रोन सर्वेक्षणचं काम हाती घेण्यात आलं होतं. मात्र गेल्या दोन दिवसापूर्वी पुरंदरच्या कुंभारवळण परिसरात बाधित गावातील शेतकऱ्यांनी बैलगाड्यांसह रास्ता रोको करत हा ड्रोन सर्वे हाणून पाडला होता. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पुन्हा पोलीस बंदोबस्तात हे ड्रोन सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात आलं. याच वेळी ८७ वर्षीय अंजनाबाई कामथे या वृद्ध शेतकरी महिलेचा मृत्यू झाल्याने आंदोलन भावनिक झाले. वातावरण चिघळत गेलं आणि पोलिस व आंदोलकांमध्ये चकमक झाली. यात काही पोलीस जखमी झाले. तर काही शेतकरी देखील जखमी झाले आहेत. मात्र, शेतकऱ्यांनीच दगडफेक केल्याने पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचा दावा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी केला आहे. पोलिसांनी केलेल्या या लाठी चार्ज वरून आंदोलकांनी आमदार विजय शिवतारे यांना लक्ष केलं आहे. गुंजवणीचं पाणी आम्हाला देतो म्हणून आमदाराने आम्हाला फसवलं, आम्ही त्यांना निवडून दिलं, मात्र त्यांनी एक वर्षात विमानतळाचा प्रकल्प आणला. पूर्वीचे आमदार संजय जगताप यांनी दिल्लीत खलबद करीत हे विमानतळ पूर्वेला प्रस्थापित केलं होतं, पण सरकार बदललं आणि आणि पुन्हा आहे त्याच मूळ जागी हे विमानतळ प्रस्तावित झालं, असा आरोप आंदोलन शेतकऱ्यांनी केलाय. याच्या पाठीमागे विद्यमान आमदार विजय शिवतारे असल्याचा आरोपही या शेतकऱ्यांनी केला आहे. विमानतळाच्या मुद्द्यावरून विरोधी पक्ष देखील मैदानात उतरला आहे. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी थेट कुंभारवळण गाठलं. पुरंदर पासून अवघे ३६ किलोमीटर पुण्याचे विमानतळ आहे. ज्यांना फिरायची फार हौस असेल त्यांनी इथून ६० किलोमीटर अंतरावर बारामतीचे विमानतळ आहे ते मोठे करावे. इकडून तिकडं जायला, गद्दारी करायला तुम्हाला पळावे लागतं, गुपचूप अमित शहा, नरेंद्र मोदी यांना भेटावं लागतं, त्यामुळे बारामतीचे विमानतळ मोठे करा अशा शब्दात अंबादास दानवे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली आहे. पुणे जिल्ह्यात विमानतळ झालं पाहिजे असं पालकमंत्र्यांना वाटत असेल, तर मग पुण्यातलं विमानतळ काय जिल्ह्याच्या बाहेर आहे का? आज घडीला पुणे विमानतळावरून राष्ट्रीय असेल आंतरराष्ट्रीय उड्डाणे होतात. असं असताना पुरंदरमध्ये विमानतळाचा घाट का घातलाय ? असा प्रश्न सुषमा अंधारे यांनी पस्थित केला आहे.

# अतिक्रमणसह मोजणीही पोलिस बंदोबस्तात

## महसूलमंत्र्यांचा पाठपुरावा, गृहविभागाचे निर्देश



**मुंबई :** शेत व पाणंद रस्त्यांचे अतिक्रमण काढताना तसेच, सर्व प्रकारच्या रस्त्यांची मोजणी करण्यासाठी पोलिस बंदोबस्त मोफत देण्याचा निर्णय गृह विभागाने घेतला आहे. जे शेतकरी अतिक्रमण काढताना व मोजणी करताना अडवणूक करतात त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करा, अशा सूचनाही क्षेत्रीय पोलिस अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

महसूल, नियोजन व रोहयो विभागाच्या शासन निर्णयानुसार आता गृह विभागाने स्पष्ट निर्देश जारी केले आहेत. या निर्देशाने, राज्यातील शेतीला आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत रस्ता उपलब्ध होण्यासह पाणंद रस्त्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी हे पाऊल महत्वाचे ठरणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पाणंद रस्त्यांच्या अंमलबजावणीबाबत गेल्या महिन्यांत दोन वेळा बैठका घेऊन अंमलबजावणीत स्पष्टता यावी यासाठी प्रयत्न केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करुन मोफत पोलीस बंदोबस्त देण्याचा निर्णय करुन घेतला. तालुका पातळीवरचे पोलीस निरीक्षक हे क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मागणीनुसार पोलिस बंदोबस्त पुरविण्याचा निर्णय घेतील.

> शेतापर्यंत जोपर्यंत रस्ता, वीज आणि पाणी व महत्वाची शेतीपूरक वाहने जात नाहीत तोपर्यंत शेतकऱ्याची परिस्थिती सुधारणार नाही. यासाठी पाणंद रस्त्याची विशेष मोहीम राज्यभर राबवित आहोत. त्याला चांगले यश येत असून शेतकऱ्यांना पोलीस बंदोबस्तासाठी थांबावे लागत होते. आर्थिक भार सहन करावा लागत होता. आता या दोन्ही अडचणी काढून टाकल्या आहेत. यामुळे योजनेला आणखी गती येईल.
>
> -**चंद्रशेखर बावनकुळे,** महसूलमंत्री, महाराष्ट्र

## चौकशीची नोटीस

**मे. धर्मादाय उप आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेसमोर**

**(सन १९५० चा महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, चे कलम २२)**
**बदल अर्ज क. १०६/२०२५**

जा. क्र./१९३७/२०२५ सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे, विभाग पुणे
४२/२, ढोले पाटील मार्ग, पुणे-०१

**दि.- १५/४/२०२५**

१. सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थाः- इंडो सायन्स ईज्यूकेशन ट्रस्ट
२. न्यासाचा जुना पत्ताः- सं.नं. १३८+१३९ एमपीटी.२५, फ्लैट नं १०४ सिल्हेनिआ, ई-विंग मगरपट्टा, हडपसर, पुणे ४११०२८
न्यासाचा नवीन पत्ता : द्वारा श्री संतोष जगन्नाथ पिसे, स.नं. २३५/५ कलाबन पार्क, फुरसुंगी, पुणे ४१२३०८
नोंदणी क्र. F३७७४५/ पुणे या न्यासाबाबत.
श्री संतोष जगन्नाथ पिसे.................अर्जदार
**बदल अर्ज :** - न्यासाचा पत्ता बदल करणेबाबतचा बदल अहवाल बाबत.

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उप आयुक्त, पुणे विभाग, पुणे हे वर नमूद केलेल्या बदल अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये चौकशी करणार आहेत. सदर बदल अर्जाव्दारे न्यासाचा पत्ता बदल करण्यासाठी बदल अहवाल दाखल करण्यात आलेला आहे. सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत/ हरकत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयात समक्ष येवून कैफियत/हरकत दाखल करावी. त्यानंतर आलेल्या कैफियतेचा/ हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत/हरकत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पूरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

सदरची नोटीस माझ्या सहीनिशी व मे. धर्मादाय उप आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्या शिक्कानिशी आज दि. ०९/०४/२०२५ रोजी देण्यात येत आहे.

शिक्का

सही
**अधिक्षक (न्यास शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
पुणे विभाग, पुणे.

## महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

### जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४६६/२०२४/१९०

**अर्जदार**
निर्मल साई होम्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: सर्वे नं. ३१, हिस्सा नं. १/२२, खराडी, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०१४
तर्फे, अध्यक्ष : श्री. संदेश अर्जुन चव्हाण, सचिवः सौ. अंजली लक्ष्मीकांत बोरुडे

**विरुध्द**


गैरअर्जदार / जमिनमालक
प्रवर्तक / जाब देणार नं. १
मे. न्यु जय माँ कन्स्ट्रक्शन्स तर्फे प्रोप्रायटर, श्री. जयराज पिननमल टेकचंदानी
पत्ता: फ्लॅट नं. ४७, दुसरा मजला, हेमु कालानी को. ऑप. हौ. सोसायटी, फेज ३, पिंपरी, पुणे- ४११ ०१७.

२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये निर्मल साई होम्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सर्वे नं. ३१, हिस्सा नं. १/२२, खराडी, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०१४ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४६६ / २०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक २२/०४/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने ॲड. निता यादव हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र.१ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक १३/०५/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदरची नोटीस आज दिनांक २३/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

## पाकिस्तानी नागरिकांना हद्दपार करण्याची मागणी



**जम्मू :** बेकायदा स्थायिक झालेल्या रोहिंग्या आणि पाकिस्तानी व बांगलादेशी नागरिकांना तात्काळ हद्दपार करावे, या मागणीसाठी भाजपने सोमवारी जम्मूत रॅली काढली. या रॅलीचे नेतृत्व भाजपचे जम्मू-काश्मीर प्रदेश अध्यक्ष सत शर्मा, खासदार जुगल किशोर शर्मा आणि माजी मंत्री शामलाल शर्मा यांनी केले. जम्मूत बेकायदा स्थायिक झालेल्या या परदेशी नागरिकांची लवकरात लवकर हकालपट्टी करण्यात यावी, या मागणीसाठी शेकडो कार्यकर्त्यांनी उपायुक्त कार्यालयावर मोर्चा काढला.

## केजरीवाल यांच्या याचिकेवर १२ ऑगस्टला सुनावणी




**नवी दिल्ली :** उत्पादन शुल्क घोटाळ्याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) आरोपपत्राची दखल घेण्याच्या कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाविरोधात आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांनी दाखल केलेल्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी १२ ऑगस्ट रोजी सुनावणी ठेवली. सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) वकिलांनी सांगितले की, २०२४ मध्ये दाखल करण्यात आलेल्या याचिका निरर्थक आहेत कारण एजन्सीला आवश्यक मंजुरी मिळाली आहे. आमच्याकडे परवानगी आहे. न्यायालयात परवानगी दाखल केली जाते, असे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी न्यायमूर्ती रवींद्र दुडेजा यांच्यासमोर सांगितले.

## पाणीवाटपावरून पंजाब, हरयाणा पुन्हा वादात



**चंडीगड :** भाखड़ा ब्यास मॅनेजमेंट बोर्डाच्या (बीबीएमबी) भाजपशासित राज्याला अतिरिक्त ४,५०० क्युसेक पाणी सोडण्याच्या निर्णयावरून हरयाणा आणि आपशासित पंजाब यांच्यात पुन्हा संघर्ष सुरू झाला आहे. पंजाब आणि भाजपशासित हरयाणामध्ये रावी-ब्यासच्या पाण्याच्या वाटपावरून अनेक दशकांपासून वाद सुरू आहे. १९६६ मध्ये तत्कालीन संयुक्त पंजाबमधून हरयाणा ची निर्मिती झाल्यानंतर दोन्ही राज्यांमधील वाद सुरू झाला. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्षाच्या सरकारने ६ मे रोजी विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावून आपल्या वाट्याचे पाण्याचा एक थेंबही शेजारच्या राज्याला न सोडण्याचा ठराव आणला.

## पवन कल्याण यांची परराष्ट्र मंत्रालयाला विनंती



**अमरावती :** तामिळनाडूचे मच्छीमार आणि श्रीलंकेदरम्यान निर्माण झालेल्या वादावर सामंजस्याने तोडगा काढावा, असे आवाहन आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी परराष्ट्र मंत्रालयाला केले आहे. तामिळनाडूच्या नागपट्टिनम जिल्ह्यातील २४ मच्छिमारांवर शुक्रवारी बंगालच्या उपसागरात मध्य समुद्रात झालेल्या पाच वेगवेगळ्या घटनांमध्ये हल्ला झाल्याची माहिती समोर आल्यानंतर कल्याण यांनी हे आवाहन केले आहे. भारत आणि श्रीलंका सरकारने सहकार्याच्या भावनेतून या चिंतादूर करण्यासाठी रचनात्मक आणि सातत्यपूर्ण संवाद साधणे आवश्यक आहे, असे कल्याण यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

## राफेल'वरून वादंग, भाजपचा काँग्रेसवर आरोप

**लखनौ :** पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर निष्क्रियतेच्या आरोपावरून काँग्रेसचे उत्तर प्रदेश अध्यक्ष अजय राय यांनी खेळण्यांच्या जेटवर 'निंबू-मिरची' टांगून केंद्रसरकारची खिल्ली उडवल्याने राजकीय वादळ उठले असून भाजपने हा लष्कराचा अपमान असल्याचे म्हटले आहे. भाजप खासदार अमरपाल मौर्य म्हणाले की, काँग्रेसने नेहमीच सुरक्षा दलांचा अपमान केला आहे आणि त्यांच्या क्षमतेवर शंका उपस्थित केली आहे. त्याचं हे आणखी एक उदाहरण आहे. मी सांगू इच्छितो की, काँग्रेस आणि सर्व देशद्रोही, मग ते देशांतर्गत असोत किंवा देशाबाहेर, त्यांना सडेतोड उत्तर दिले जाईल, असे भाजपच्या उत्तर प्रदेश शाखेचे सरचिटणीस मौर्य यांनी सांगितले.

# हवाई दलाला 'ब्रह्मोस'चे बळ

## सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्र ताफ्यात होणार दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाम हल्ल्यानंतर देशात तणावाचे वातावरण आहे. त्यातच दुसरीकडे पाकिस्तानचा कांगावा आणि कुरापतीही वाढल्या आहेत. यादरम्यान भारतासाठी एक महत्वाची बातमी समोर आली आहे. भारताच्या हवाई शक्तीला लवकरच एक घातक धार मिळणार आहे. भारतीय हवाई दल आणि नौदल त्यांच्या राफेल लढाऊ विमानांमध्ये ब्रम्होस-एनजी (नेक्स्ट जनरेशन) सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्र तैनात करण्याची तयारी करत आहेत. २९० किलोमीटरचा पल्ला आणि ४१७० किमी/तास वेगाने उड्डाण करणारे हे क्षेपणास्त्र शत्रूवर अचूक आणि विनाशकारी प्रहार करण्यास सक्षम असणार आहे.

डिसॉल्ट एव्हिएशनने राफेलमध्ये भारताच्या स्वदेशी शस्त्र प्रणालींचे एकत्रीकरण करण्यास मान्यता दिली, ज्यामुळे 'मेक इन इंडिया'मोहिमेलाही नवीन बळ मिळेल आणि भारताचे रणनैतिक स्वातंत्र्य आणखी मजबूत होईल. यामुळे पाकिस्तानचे टेन्शन वाढले आहे. कारण पाकिस्तानला आधीच भारताच्या राफेल ताफ्याची चिंता होती. आता जेव्हा या अत्याधुनिक लढाऊ विमानांमध्ये ब्रम्होस-एनजीसारख्या घातक क्षेपणास्त्रे बसवली जातील, तेव्हा त्याचा त्यांच्या दहशतवादाला पाठिंबा देणा-या धोरणावर मोठा परिणाम होईल. आता भारतीय हवाई क्षेत्रात घुसखोरी करण्याच्या शत्रूच्या प्रयत्नांना दिले जाणारे प्रत्युत्तर अधिक जलद, अचूक आणि प्राणघातक असेल, असे सांगण्यात आले.

राफेल हे पाकिस्तानच्या जेएफ-१७ सारख्या विमानांपेक्षा अनेक पटीने अधिक सक्षम आहे आणि ब्रम्होस-एनजीच्या समावेशानंतर ते एक धोरणात्मक स्ट्राइक प्लॅटफॉर्म बनेल. विशेष म्हणजे सीमा ओलांडल्याशिवाय हे क्षेपणास्त्र पाकिस्तानमधील कोणत्याही लष्करी तळाला, कमांड सेंटरला किंवा दहशतवादी लाँचपॅडला क्षणार्धात लक्ष्य करू शकते. हे क्षेपणास्त्र हवेतून सोडले जाणारे, जमिनीवरून आणि जहाजावरून मारा करणारे आवृत्त्यांमध्ये उपलब्ध असेल. याचा अर्थ जमीन, पाणी आणि आकाश या प्रत्येक आघाडीवर समान प्राणघातक शक्ती असणार आहे.

### हलके आणि कॉम्पॅक्ट डिझाईन

- ब्रम्होस-एनजीचे वजन सुमारे १.५ टन आहे, जे मूळ ब्रम्होस क्षेपणास्त्रापेक्षा सुमारे ५० टक्के कमी आहे. त्यामुळे तेजस एमके-१ए, राफेल, मिराज-२०००, सुखोई-३० एमकेआयसारख्या लढाऊ विमानांमधून ते सहजपणे डागता येते. गुप्त वैशिष्ट्यांसह डिझाइन केले गेले आहे, त्यामुळे ते शत्रूच्या रडारवर अदृश्य असेल.




### २०२६ मध्ये चाचणी, लखनौमधून उत्पादन

- या क्षेपणास्त्राची पहिली चाचणी २०२६ मध्ये होणार आहे आणि ते उत्तर प्रदेशातील लखनौ येथे बांधल्या जाणा-या ब्रम्होस उत्पादन केंद्रात तयार केले जाणार आहे. हे केंद्र क्षेपणास्त्र उत्पादनात भारताच्या स्वावलंबी होण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार आहे. ब्रम्होस-एनजी ही ब्रम्होस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्राची हलकी आणि प्रगत आवृत्ती आहे, जी आधुनिक लढाऊ विमाने आणि मोबाइल प्लॅटफॉर्मवरून प्रक्षेपित करण्यासाठी विकसित केली जात आहे.

### अचूक हल्ला

- ब्रम्होस-एनजीचा वेग मॅक ३.५ (सुमारे ४१७० किमी/तास) आहे, ज्यामुळे तो शत्रूच्या रडार आणि संरक्षण प्रणालींना चुकवून अचूकतेने हल्ला करू शकतो. याची रेंज २९० किलोमीटर आहे, म्हणजेच हे मिसाईल सीमा ओलांडल्याशिवाय सीमेपलीकडे असलेल्या शत्रूंच्या महत्त्वाच्या तळांना नष्ट करू शकते.

# लाल किल्लाच काय ताजमहालही मागा!

## सर्वोच्च न्यायालयाने सुनावले

सुल्ताना बेगम हिने आपण मुघल सम्राट बहादूर शाह जफर (दुसरा) याचे आपण कायदेशीर वंशज असल्याचा दावा करत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. बहादूर शाह जफरच्या पणतूची आपण विधवा असल्याचा सुल्तानाचा दावा आहे. हादूर शाह जफर याची वंशय असल्याने देशाची राजधानी दिल्ली इथे असलेल्या लाल किल्ल्याची मालकी आपल्याला देण्यात यावी, अशी मागणी केली होती. यापूर्वी तिने ही याचिका दिल्ली उच्च न्यायालयात केली होती. तिथे याचिका फेटाळून लावल्यानंतर तिने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयात या याचिकेवीरल सुनावणीदरम्यान बरंच नाट्य घडलं.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी याचिकेवर सुनावणी करत असताना म्हटले की फक्त लाल किल्ला कशाला मागत आहात. तुम्ही फतेहपूर सिक्री, ताज महालदेखील का मागत नाही ? या मुद्दावर तुम्ही युक्तिवाद व्हावा अशी इच्छा व्यक्त करत आहात का ? असा सवालही त्यांनी विचारला. सरन्यायाधीशांनी बहादूर शाह जफर (दुसरा) ची वंशज असल्याचे सांगत सुल्ताना बेगम हिने याचिका दाखल केली होती. सुल्ताना ही मूळची कोलकात्यातील हावडाची रहिवासी आहे. २०२१ साली सुल्तानाने दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सरकार या याचिकेचा सहानुभूतीपूर्वक विचार करेल आणि आपल्याला आर्थिक मदत करेल अशी सुल्तानाने अपेक्षा व्यक्त केली होती.

लाल किल्ला हे राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहे. या किल्ल्याची मालकी आपल्याला मिळावी अशी सुल्तानाची मागणी आहे. सुल्तानाने तिच्या याचिकेमध्ये म्हटले होते की, १८५७ साली लाल किल्ला ब्रिटीशांनी बळजबरीने आपल्याकडे घेतला होता. अडीचशे एकर परिसरात लाल किल्ला असून सुल्तानाचं म्हणणं आहे की लाल किल्ल्यावर ताबा मिळवल्यानंतर इंग्रजांनी बहादूर शाह जदफर याला अटक करून रंगून येथील तुरुंगात पाठवलं होतं. त्यानंतर हा किल्ला ब्रिटीशांच्याच ताब्यात होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या किल्ल्याची मालकी सरकारकडे आली होती.

### १५० वर्ष उशीर का केलात ?

- न्यायालयामध्ये सुल्तानाने याचिका दाखल केली होती, तेव्हा न्यायमूर्ती रेखा पल्ली यांनी म्हटले होते की, माझा इतिहास जरा कच्चा आहे, मात्र तुमच्या म्हणण्यानुसार १८५७ साली ईस्ट इंडिया कंपनीने तुमच्या पूर्वजांवर अन्याय केला होता. मग यासंदर्भात दावा करण्यासाठी १५० पेक्षा जास्त वर्षे का लागली ? यावर सुल्ताना यांचे वकील विवेक मोर यांनी म्हटले होते की, ही मंडळी विदेशातून भारतात परत आल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी सुल्ताना बेगम यांचे पती मिर्झा बेदर बख्त यांना पेन्शनची व्यवस्था करून दिली होती. त्यांच्या निधनानंतर ही पेन्शन सुल्ताना यांना मिळू लागली. सध्या सुल्ताना यांना पेन्शनपोटी फक्त ६ हजार रुपये मिळत असून यात त्या त्यांचा उदरनिर्वाह कशा करू शकतील, असं त्यांचे वकील यावेळी म्हणाले.

# उज्जैनच्या महाकाल मंदिरात भीषण आग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उज्जैन :** मध्य प्रदेशातील प्रसिद्ध ज्योतिर्लिंग उज्जैन महाकालेश्वर मंदिराच्या गेट क्रमांक १ वर भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. अचानक लागलेल्या आगीमुळे मंदिर परिसरात उपस्थित असलेल्या भाविकांमध्ये खळबळ उडाली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी पोहोचल्या.

मंदिर परिसरातील आग विझवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले गेले. सध्या ही आग नियंत्रणात आली असल्याची माहिती समोर येत आहे. या आगीची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी आणि एसपी यांनी घटनास्थळी धाव घेतली. ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्या या प्रकरणाचा तपास पोलिस करत असून, यानंतरच आगीचे नेमके कारण समोर येईल.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास महाकालेश्वर मंदिराच्या फॅसिलिटी सेंटरवर असलेल्या प्रदूषण मंडळाच्या नियंत्रण कक्षात अचानक आग लागली. या आगीने प्रचंड स्वरूप घेताच परिसरात धुराचे लोट दिसू लागले. यामुळे मंदिर परिसरात खळबळ उडाली. या घटनेची माहिती तातडीने पोलिस आणि अग्निशमन दलाला देण्यात आली. अथक प्रयत्नांनंतर अखेर या आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाला यश मिळाले.



### गेट क्रमांक १ तूर्तास बंद

दररोज हजारो भाविक बाबा महाकालेश्वराचे दर्शन घेण्यासाठी उज्जैनच्या मंदिरात हजेरी लावत असतात. या आगीच्या घटनेनंतर मंदिरात चांगलाच गदारोळ माजला होता. सुरक्षेचा विचार करता मंदिर प्रशासनाने गेट क्रमांक १ तूर्तास बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या मंदिराच्या या प्रवेशद्वारातून भाविकांना आत जाता येणार नाही. या घटनेत कोणतीही जीवितहानी घडली नसल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. मात्र, आगीमुळे मंदिराच्या मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे.

# जपानही भारताच्या बाजूने उभा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव शिगेला पोहोचला आहे. दहशतवाद्यांना पोसणा-या पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी भारताने अनेक धोरणात्मक पाऊले उचलली आहेत. तसेच, भारतीय लष्कराने युद्धाभ्यास सुरू केल्यामुळे पाकिस्तानची घाबरगुंडी उडाली आहे. विशेष म्हणजे, अमेरीका आणि रशियासह अनेक देशांनी भारताला पाठिंबा जाहीर केला आहे. अशातच, आता जपानदेखील भारताच्या बाजूने आला आहे.

भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि जपानचे संरक्षण मंत्री नाकातानी यांच्यात आज एक मोठी बैठक झाली. या बैठकीत पहलगाम दहशतवादी हल्ला, भारत आणि पाकिस्तानमधील वाढता तणाव आणि दक्षिण चीन समुद्रात चीनच्या वाढत्या लष्करी हालचालींबाबत चर्चा झाली. याशिवाय, दोन्ही देशांनी प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा परिस्थिती आणि द्विपक्षीय संरक्षण सहकार्य आणखी वाढवण्यावरही भर देण्यात आला. महत्वाचे म्हणजे, गेल्या ६ महिन्यांत दोन्ही देशांच्या संरक्षण मंत्र्यांची ही दुसरी बैठक आहे.

भारत-जपान संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत राजनाथ सिंह म्हणाले की, पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारतासोबत मजबूत एकता दाखवल्याबद्दल मी जपान सरकारचे आभार मानू इच्छितो. बैठकीनंतर राजनाथ सिंह यांनी वर पोस्ट केले की, नवी दिल्लीत जपानचे संरक्षण मंत्री जनरल नाकातानी सॅन यांना भेटून आनंद झाला. भारत आणि जपानमध्ये एक विशेष, धोरणात्मक आणि जागतिक भागीदारी आहे. बैठकीदरम्यान, आम्ही संरक्षण सहकार्य आणि प्रादेशिक सुरक्षेवर चर्चा केली. दोन्ही बाजूंनी सर्व प्रकारच्या दहशतवादाचा निषेध केला आणि सीमापार धोक्यांचा सामना करण्यासाठी सहकार्य आणि प्रयत्न वाढवण्याच्या गरजेवर भर दिला.



**केप टाउन** दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊनमधील टोकाई येथील टेबल माउंटन नॅशनल पार्कच्या एका भागात वणवा लागल्याने, मोठे नुकसान झाले.

# काश्मिरातील हस्तकला उद्योगाचे भवितव्य संकटात!




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर :** काश्मिरी हस्तकला त्यांच्या कलात्मक कामासाठी आणि भव्यतेसाठी जगभर ओळखली जाते. मात्र, पहलगामच्या हल्ल्यानंतर काश्मीरच्या या पारंपरिक व्यवसायावर विपरीत परिणाम झाला आहे. काश्मिरी शाली आणि गालिचे व्यावसायिकांचे मोठे नुकसान होत आहे. पहलगाम हल्ल्यापासून काश्मिरात भीतीचे सावट आहे. याचा राज्यातील हँडलूम उद्योगावर विपरित परिणाम दिसून येत असून, तब्बल एक ते दीड हजार कोटींची उलाढाल असलेल्या हस्तकला उद्योगाचे भविष्य अंधारात सापडले आहे.

काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला. त्यामुळे काश्मिरात दहशत वाढली असून, उद्योग, व्यवसाय, पर्यटनावरही विपरित परिणाम झाला. त्यातच आता या दहशतवादी हल्ल्याने काश्मीरच्या हँडलूम उद्योगावर शोककळा पसरल्याचे चित्र आहे. काश्मिरी शाली, गालिचे, महिलांचे कपडे बनवणे हे उद्योग ठप्प झाल्याचे दिसून येत आहे. या दहशतवादी हल्ल्यामुळे दोन-अडीच लाख लोकांच्या हातचा रोजगार गेला. पर्यटकांनीच पाठ फिरवली तर शाली, गालिचे घेणार कोण, असा प्रश्न उपस्थित होत असून, व्यावसायिकांची चिंता वाढली आहे.

काश्मीरमध्ये फिरण्यासाठी जाणारे पर्यटक तिथल्या शाली आणि गालिचांकडे आपोआप आकर्षित होतात. शाली आणि गालिचे बनवण्यासाठी मोठी मेहनत आणि एकाग्रता लागते. या दोन सूत्रांवर हा व्यवसाय आजही तग धरून आहे. डिझाइनच्या शाली आणि महिलांच्या ड्रेसवर बनवले जाणारे नक्षीकाम हे हाताने केले जाते. त्यामुळे या हस्तकलेला विशेष महत्त्व आहे.

शाली आणि महिलांच्या कपड्यावरील नक्षीकामानंतर येथे गालिचे बनतात. त्यासाठीसुद्धा एकाग्रता आणि संयम लागतोच. अचूक आणि सावधगिरीने हे गालिचे बनवतात. त्यासाठी अनुभवही खूप महत्त्वाचा मानला जातो.

एक गालिचा बनवायला किमान सहा ते सात महिन्यांचा कालावधी लागतो. म्हणूनच काश्मीरच्या या गालिचांची किंमतसुद्धा डोळे विस्फारणारी असते. त्यावरील करण्यात येणा-या आकर्षक नक्षीकामामुळे या गालिचांना देशातच नव्हे तर जगभरात मोठी मागणी आहे.

# पिराण टेकडीवर परदेशी पाहुण्यांचे आगमन

## रशिया, युरोपसह जगभरातून हजारो पक्षी दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी देवकर :** उजनी धरणाच्या बॅक वॉटर म्हणजेच फुगवट्याजवळ मौजे शहा (इंदापूर) या गावात असलेली पिराण टेकडी ही शेकडो प्रजातीच्या परदेशातून आलेल्या पक्षांची गोकुळ नगरी म्हणून ओळखली जाते. त्याच पिराण टेकडीवरती यंदाच्या हंगामात परदेशातून अनेक पक्षांचे आगमन झाले असून, यामध्ये रशिया, युरोप सह संपूर्ण जगभरातील शेकडो प्रजातीचे पक्षी प्रजननासाठी दाखल झाले आहेत. पुणे, सोलापूर, अहिल्यानगरसह राज्यातील पक्षीप्रेमींना पक्षी निरीक्षणासाठी व पर्यटनासाठी पर्वणी निर्माण झाली.

पुणे आणि सोलापूर जिल्ह्याच्या सीमेवर उजनी बॅक वॉटरमध्ये मौजे शहा या गावामध्ये असलेला उजनीचा अथांग जलाशय आणि या जलाशयातून पाणी कमी झाल्यावर पाण्यातून वरती येणारी पिराण टेकडी ही स्थलांतरित पक्ष्यांसाठी स्वर्ग मानली जाते. या टेकडीवरती हजारो किलोमीटर चा प्रवास पार करून युरोप, रशिया, मध्य आशिया, आफ्रिका, ब्रह्मदेश तसेच भारतीय उपखंडातील काही राज्यांमध्ये व देशांमध्ये आढळणारे अनेक पक्षी प्रजननासाठी दाखल झाले आहेत.

या पिराण टेकडी वरती सद्यस्थितीला नॉर्दर-शॉवलर हा रशिया व युरोप मधील मोठी व चपट्या टोकाची चोच असलेला पक्षी आढळत आहे. तसेच पेंटेड स्टॉर्क हा भारतातील गुलाबी पंख असलेला स्थानिक पक्षी या ठिकाणी दाखल झाला आहे. तसेच ब्लॅक टेल्ट गॉडविट (युरोप, नेदरलँड), कॉमन टील (युरेशिया), ओस्प्रे (युरोप, रशिया), व्हाईट वॅगटेल (मध्य आशिया), इंडियन स्पॉट- बिल्ड डक (भारत- स्थानिक पक्षी), रिव्हर टर्न (भारत ) स्मॉल प्रेंटेकोल (भारत) बार -हेडेड गूज (तिबेट- मंगोलिया) असे अनेक पक्षी या टेकडीवरती सध्या स्थितीला वास्तव्याला आले.

या पिराण टेकडीवरती दाखल झालेले पक्षी प्रजननानंतर नवीन पिढीला जन्म घातल्यानंतर नवजात पिल्लांसह भारतातून आपल्या मायदेशात प्रवासाला काही महिन्यानंतर निघतात. मार्च व एप्रिल महिन्यात उजनी धरणातून व कालव्यातून पाण्याचा विसर्ग सुरू झाल्यानंतर हळूहळू पिराण टेकडी उघडी पडते. त्यानंतर पिराण टेकडीवरती उथळ व टणक जमीन उघडी पडल्याचा परदेशी पक्षांना अचूक अंदाज येतो. यानंतर हे पक्षी हळूहळू या ठिकाणी प्रजननासाठी दाखल होतात. या ठिकाणी हजारोच्या संख्येने अनेक प्रजातीचे पक्षी अधिवासासाठी एकत्र राहत शहा गावातील पिराण टेकडीवरून संपूर्ण जगाला एकात्मतेचा संदेश देतात.



## जळोची सुविधा केंद्रावरून १८० टन आंबा निर्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** बारामती बाजार समितीचे जळोची सुविधा केंद्रावरून १८० टन आंबा निर्यात केला आहे. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांनी उभारलेल्या बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीचे जळोची उपबाजार येथील निर्यात सुविधा केंद्र बाजार समितीचे मार्गदर्शक आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या सुचनेनुसार बाजार समिती चालवत असून, या निर्यात सुविधेवरून चालु हंगामात एप्रिल २०२५ अखेर १८० टन आंबा लंडन व अमेरिका येथे निर्यात करण्यात आला, अशी माहिती सभापती विश्वासराव आटोळे आणि उपसभापती रामचंद्र खलाटे यांनी दिली.

या सुविधा केंद्रावरून रेन्बो इंटरनॅशनल प्रा. लि. पुणे यांचे मार्फत दरवर्षी आंबा निर्यात केला जात असून, ज्या शेतकऱ्यांकडे रिशुड्यु फ्री व निर्यातक्षम दर्जाचा आंबा असल्यास त्यांनी रेन्बो इंटरनॅशनल यांचेशी संपर्क साधुन सुविधा केंद्राचा फायदा घ्यावा, असे आवाहन निर्यातदार अभिजित भसाळे यांनी केले आहे,

बारामती बाजार समिती मार्फत जळोची निर्यात सुविधा केंद्र हे सन २०१४ पासुन चालवित असुन गतवर्षी याच सुविधा केंद्रावरून रेन्बो इंटरनॅशनल मार्फत ४८५ टन आंबा ऑस्ट्रेलिया आणि युरोप या देशात निर्यात केला आहे.

रेन्बो इंटरनॅशनलचे अभिजित भसाळे हे शेतक-यांकडुन निर्यातक्षम आंबा खरेदी करून आमगो ब्रॅण्ड या नावाने आकर्षित पॅकींग करून निर्यात करीत आहेत. या हंगामात एप्रिल २०२५ पासुन आत्ता पर्यन्त लंडन येथे ७५ टन तर १०५ टन अमेरिका, युरोप येथे निर्यात झाला.

आंबा उत्पादक शेतक-यांनी रेन्बो इंटरनॅशनलचे सुभाष पवार यांचेशी संपर्क साधुन निर्यातक्षम मालाची विक्री करता येईल, असे आवाहन सचिव अरविंद जगताप यांनी केले आहे.

## बनावट आंबे विकून ग्राहकांना गंडा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** इंदापूर शहर हे तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे, संपूर्ण तालुक्यातील नागरिकांची वर्दळ लहान मोठ्या वस्तू खरेदीसाठी इंदापूरला असते. त्यातच आंब्याचा सीजन असल्यामुळे ग्राहक चवीने आंबा खरेदी करतात. मात्र, इंदापूर पंचायत समितीच्या समोर, राजरोसपणे बनावट आंबे आणून ग्राहकांच्या माती मारले जात आहेत. साडेतीनशे ते पाचशे, सहाशे रुपये डजनाचे पेटीचे दर घेतले जातात. मात्र, घरी गेल्यावर हेच आंबे आतून खराब निघत आहेत. त्यामुळे मोठा ग्राहकांना पश्चाताप सहन करावा लागत आहे. येथून पुढच्या काळात आंबे खरेदी करताना सावधान पद्धतीने खरेदी करावेत, अशी चर्चा इंदापूरात रंगली आहे.

इंदापूर शहरात परप्रांतीय तसेच काही स्थानिक व्यापारी आंबे विक्री करत आहेत. मात्र हे आंबे नैसर्गिक रित्या पिकवले आहेत का? ओरिजनल आंब्यांची विक्री होते का? हे तपासणारी यंत्रणा मात्र, अध्याप इंदापूर शहरात फिरलेली दिसत नाही. राज्यभर आंब्याचे दर कमी झालेले असताना, इंदापुरात दरात मात्र वरचढपणा, तर गुणवत्ता शून्य अशी परिस्थिती यंदाच्या आंबे विक्रेत्यांकडून दिसत आहे. पैसे घ्या मात्र चांगले आंबे द्या, अशी अपेक्षा ग्राहकांना आहे. मात्र वेगवेगळी केमिकल वापरून आंब्याला रंग आणला जातोय, ना गुणवत्ता, ना चव,यामुळे ग्राहक हैराण झाले आहेत.

एका ग्राहकाने शनिवारी साडेतीनशे रुपये डझनाने आंब्याची पेटी खरेदी केली. यामध्ये तब्बल तीन ते चार आंबे आतून काळे झालेले बाद निघाले. कोणताही ग्राहक आपल्या कुटुंबाला एक चांगला खाऊ निर्माण होवा, यासाठी कोणतीही फळे खरेदी करतात. फळे ओरिजनल विकावीत, पैसे कमवावेत याबद्दल कोणतीही हरकत नाही. मात्र, बोगस फळे विक्री करून सामान्य माणसाच्या जीविताशी, आरोग्याशी, अशा बोगस विक्रेत्यांनी खेळ करू नये. अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या संदर्भात अन्न प्रशासन विभागाने व संबंधित विभागाने बोगस आंबा विक्री करणाऱ्यांवर, धाडी टाकून, त्यांना जेलची हवा खाण्यास लावावी. बोगस आंबा विक्रेत्यांची चौकशी व्हावी, अशी मागणी होत आहे.

## ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या आरोग्याची योग्य काळजी घेण्याची गरज असल्याचे मत ज्येष्ठ समाजसेविका माहेर संस्थेच्या संस्थापिका लुसि कुरियन यांनी व्यक्त केला आहे. शिक्रापूर येथे ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन करताना ज्येष्ठ समाजसेविका माहेर संस्थेच्या संस्थापिका लुसि कुरियन बोलत होत्या,

या प्रसंगी सरपंच रमेश गडदे, उपसरपंच वंदना भुजबळ, जिल्हा परिषद सदस्या कुसुम मांढरे, रोहिणी सासवडे, ग्रामपंचायत सदस्य त्रिनयन कळमकर, सुभाष खैरे, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राच्या अध्यक्षा रेणुका थिटे, उपाध्यक्ष रावसाहेब करंजे, सल्लागार जयश्री फुलवारे, मारुती राऊत, अर्जुन शिर्के, देवेंद्र कोळपकर, बाबासाहेब सासवडे, डॉ. निला कात्रे, सुर्यकांत शिर्के सर, ज्ञानेश्वर मिडगुले, दिनकर कळमकर, शिला करंजे, ज्योती पाटील, साधना जगताप यांसह आदी उपस्थित होते.

ज्येष्ठ नागरिक संघांसाठी ग्रामपंचायतच्या वतीने जागा उपलब्ध करण्यात देण्यात आल्याचे सरपंच रमेश गडदे यांनी जाहीर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री फुलवारे यांनी केले तर प्रास्ताविक रेणुका थिटे यांनी केले आणि रावसाहेब करंजे यांनी आभार मानले.



## केंद्र सरकारच्या माध्यमातून निर्णय घेतलेल्या जातनिहाय जनगणनेचे राजगुरुनगरात स्वागत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** राजगुरुनगर शहरातील, सर्व जाती समूहाच्या प्रमुखांनी नरेंद्र मोदी यांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून निर्णय घेतलेल्या जातनिहाय जनगणनेचे स्वागत केले आहे.

या निर्णयाचे समर्थन करण्यासाठी शनिवारी राजगुरुनगर येथे शहरातील विविध जाती समूहाच्या प्रमुखांची बैठक संपन्न झाली. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील, माजी नगराध्यक्ष शिवाजी मांदळे, निलेश घुमटकर, राजेंद्र जाधव, प्रवीण सुतार (अध्यक्ष सुतार समाज), सचिन गायकवाड (अध्यक्ष नाभिक समाज), अनिल कहाणे (अध्यक्ष तेली समाज), उद्धव कुंभार (अध्यक्ष कुंभार समाज), गणेश गायकवाड , प्रवीण वायकर (अध्यक्ष शिंपी समाज), निखिल सांडभोर, सूरज वाडेकर, दत्ताभाऊ सांडभोर, रामदास शेलार, अमर बोऱ्हाडे, अविनाश कहाणे, दिलीप लोखंडे, सुधीर येवले उपस्थित होते.

यावेळी ओबीसी समाजातील विविध प्रमुखांनी जातनिहाय जनगणना आमच्या समाजासाठी उपयुक्त आहे. आमच्या समाजाचे एकत्रित डाटा आम्हाला मिळत नव्हता तो आता मिळेल आणि आमच्या न्याय हक्कासाठी आम्हाला प्रयत्न करता येईल, असे सांगण्यात आले.

शरद बुट्टे पाटील म्हणाले की, केवळ राजकीय आरक्षण किंवा योजना नाही तर या जनगणनेच्या माध्यमातून जातनिहाय उपलब्ध झालेल्या सांख्यिकी माहितीचा उपयोग केंद्र आणि राज्य सरकारच्या बरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांना आपले काम करताना होणार आहे. हा डाटा लक्षात घेऊन नव्याने योजनांचे स्वरूप देखील बदलता येणार आहे. काँग्रेस सरकारने कायमच जात निहाय जनगणने कडे दुर्लक्ष केले. तर काही राज्यांनी अशी जनगणना करून त्याचा डाटा कधीच प्रसिद्ध केला नाही.

भाजपाने मात्र ही भूमिका घेतली आणि त्याप्रमाणे निर्णय देखील करून दाखवला. १९३१ नंतर पहिल्यांदा अशाप्रकारे अधिकृत पणे केंद्र सरकारच्या माध्यमातून जात निहाय जनगणना होत आहे.आज समाजातील छोट्या छोट्या जाती या निर्णयाचे स्वागत करत आहेत. असे बुट्टे पाटील म्हणाले.



## खेड तालुक्याला अर्थसंकल्पात निधी नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** यावर्षीच्या अर्थसंकल्पात खेड तालुक्याला एक पैसाही निधी मिळाला नाही, असा आरोप माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी केला आहे. सध्याचे आमदार बाबाजी काळे यांच्यावर घणाघाती टीका करताना, ते जनतेची दिशाभूल करत असून आपल्या काळात मंजूर झालेल्या कामांचे श्रेय घेत आहेत, असे मोहिते म्हणाले. "खेड तालुक्याला काय मिळाले? आमदार काळे यांनी अर्थसंकल्पात काय मांडले? ते आमच्या कामांचे श्रेय घेतात, पण नवीन काहीच करत नाहीत," असे मोहिते यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

प्रशासकीय इमारतीच्या कामाचे श्रेयवादआमदार बाबाजी काळे यांनी महाराष्ट्र दिनी ध्वजारोहणानंतर सांगितले होते की, प्रशासकीय इमारतीसाठी ३८ कोटींचा निधी मिळवला असून, ५ मे रोजी जागेची मोजणी होईल आणि लवकरच कामाला सुरुवात होईल. यावर मोहिते यांनी प्रत्युत्तर देताना सांगितले की, खेडचे तहसीलदार कार्यालय ब्रिटिश काळातील आहे, रस्ते अरुंद आहेत, आणि प्रांत कार्यालय भाड्याच्या इमारतीत आहे. सर्व कार्यालये एकाच ठिकाणी असावीत यासाठी आपण प्रशासकीय इमारत बांधण्याचा प्रस्ताव मांडला होता.



"पंचायत समितीच्या जागेत ही इमारत बांधण्याचे ठरले होते, पण विरोधकांनी अडथळा आणला. अखेर सध्याच्या पंचायत समितीच्या जागेत इमारत बांधण्याचे निश्चित झाले. २०२१ मध्ये याचे टेंडर निघाले, वर्क ऑर्डरही झाली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते भूमिपूजनही झाले. मात्र, निवडणुकीत मला अपयश आले आणि आता काळे माझ्या कामांचे श्रेय घेत आहेत," असे मोहिते यांनी स्पष्ट केले.

पार्किंग समस्येवर उपाययोजनाप्रशासकीय इमारतीमुळे उद्भवणाऱ्या पार्किंग समस्येवर बोलताना मोहिते म्हणाले, "पार्किंगची समस्या निर्माण होऊ नये यासाठी पोलिस आणि नगर परिषदेने व्यवस्था करावी. नागरिकांनीही नियम पाळावेत. शहराबाहेरील रस्ते आणि आरबूज वाडीचा पूल पूर्ण झाल्यावर वाहतूक कमी होईल.

भविष्यात तहसीलदार कार्यालयाच्या जागेवर वाहनांसाठी मोठी पार्किंग इमारत बांधण्याचे नियोजन आहे, त्यामुळे पार्किंगची समस्या सुटेल."जनतेला आवाहनमोहिते यांनी जनतेला आवाहन केले की, आमदारांनी तालुक्यासाठी नेमके काय केले आणि काय देणार हे त्यांनी स्पष्ट करावे. "केवळ आयत्या पिठावर रेघोट्या मारण्याचे काम थांबवावे," असे ते म्हणाले.

### आश्वासनांची पूर्तता कधी?

- मोहिते यांनी काळे यांच्यावर निवडणुकीतील आश्वासने पूर्ण न केल्याचा आरोप केला. "निवडणुकीत दिलेली आश्वासने कधी पूर्ण करणार? ५२ हजार मतांनी विजय मिळाला म्हणजे विकास होतो का? तालुक्याच्या विकासासाठी ठोस कामे करा, दुसऱ्यावर टीका करून काही होत नाही. शासकीय विश्रामगृहात बसून अधिकाऱ्यांवर दबाव टाकला जातो, बगलबच्चे अधिकाऱ्यांना त्रास देतात, हे खपवून घेतले जाणार नाही," असे मोहिते यांनी ठणकावले.

## संतोष कचरेची भारतीय संघात निवड



**बारामती :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा खेळाडू संतोष कचरे याची इराण या ठिकाणी होणाऱ्या पश्चिम आशियाई बेसबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. हा संघ दि.१५ ते २२ मे दरम्यान इराण या ठिकाणी खेळणार आहे. या पूर्वी देखील संतोष कचरे याने वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत तीन वेळा सुवर्णपदक तसेच अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून खेळत असताना दोन सुवर्ण व एक रौप्य पदक प्राप्त केले आहे. इयत्ता अकरावीपासूनच तो महाविद्यालयात बेसबॉलचे प्रशिक्षण घेत होता. कनिष्ठ महाविद्यालयातर्फे देखील शालेय व संघटनेच्या राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले आहे. विपरीत परीस्थितीतही त्याने बेसबॉल खेळावरील आपली श्रद्धा कायम ठेवली. अतिशय गरीब कुटुंबातून मेहनतीने संतोषने आजपर्यंत बेसबॉल खेळात प्रगती केलेली आहे. संस्थाचालक व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी वेळोवेळी अनेक स्पर्धांसाठी संतोषला मदत केली आहे. जिद्द,चिकाटी व खेळातील सातत्य यामुळे त्याने आज आंतरराष्ट्रीय स्तरावरती भारतीय संघात स्थान मिळवले आहे. त्याला डॉ.गौतम जाधव, प्रा.अशोक देवकर, प्रा. सुहास डेरे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. संतोषच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ.अविनाश जगताप, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## जातेगाव बुद्रुकला पाणी सोडण्याची मागणी

**शिक्रापूर :** जातेगाव बुद्रुक, ता. शिरुर येथील गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीने तळ गाठला असताना, विंधन विहिरींची देखील पाणी पातळी खालावली असल्याने येथील पाण्याची समस्या गंभीर होत असल्याने जातेगाव बुद्रुक ओढ्याला चासकमानचे पाणी सोडण्याची मागणी ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात आली आहें. जातेगाव बुद्रुक, ता. शिरुर येथील गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीसह सर्व विंधन विहिरींनी तळ गाठला असल्याने नागरिकांना पाण्याच्या समस्येला सामोरे जाण्याची वेळ आलेली आहे. तसेच जनावरांच्या पाण्याचा आणि शेतातील पिकांचा प्रश्न गंभीर होत चालला असताना चासकमानचे पाणी ओढ्याला मिळाले, तर गावातील पाण्याचा प्रश्न सुटणार असल्याने सदर ओढ्याला चासकमान चारी क्रमांक ११ व १२ मधून पाणी सोडण्याची मागणी सरपंच निलेश उमाप यांनी केली आहे, तर चासकमान विभागाच्या वतीने गावातील ओढ्याला पाणी न सोडल्यास आंदोलनाचा इशारा देखील सरपंच निलेश उमाप यांनी दिला आहे. जातेगाव बुद्रुक येथील पाण्याच्या समस्येबाबत चासकमान विभागाचे शाखा अधिकारी सुनील म्हस्के यांच्याशी संपर्क साधला असता सध्या त्या भागासाठी आवर्तन नसून लवकरच नवे आवर्तन आल्या नंतर जातेगाव बुद्रुकसाठी पाणी सोडण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे शाखा अधिकारी सुनील म्हस्के यांनी सांगितले.

## नीरेचे पात्र पडले कोरडे

**भवानीनगर :** मे महिन्यात कोणाच्या झळा वाढल्या असताना नीरा नदी कोरडी पडली आहे. त्यामुळे नदी काठावरील गावांच्या पिण्याच्या पाणी योजना बंद पडल्या असून जनावरांच्या व शेतीच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. त्यामुळे वीर धरणातून नीरेत पाणी सोडून बंधारे भरण्याची मागणी शेतकरी व नागरिकांनी केली आहे. इंदापूर तालुक्यातील नरसिंहपूर, गिरवी, ओझरे, लुमेवाडी, सराटी, निरनिमगाव तर माळशिरस तालुक्यातील संगम, गणेशगाव, तांबवे, माळीनगर, अकलूज, आनंदनगर, चाकोरे गावांच्या पिण्याच्या पाणी योजना बंद पडल्या आहेत. जनावरांच्या चाऱ्याचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. नीरा नदीच्या पाण्यावर इंदापूर व माळशिरस तालुक्यातील शेकडो एकर शेतीवरील पिके जोपासली जातात. अनेक ठिकाणी पिके जळून चालली आहेत तर अनेक ठिकाणी शेती ओसाड ठेवण्याची वेळ शेतकरी राजावर आली आहे. वीर धरणातून नीरा नदीत पाणी सोडून बंधारे भरून घेण्याची मागणी शेतकरी व नागरिकांनी केली आहे.

## वंचित बहुजन युवा आघाडी करणार आंदोलन



**बारामती :** लाडक्या बहीण योजनेसाठी स्वातंत्र्य तरतूद करणे, सामाजिक न्यायाचा निधी बेकायदेशीरपणे वापरणाऱ्या जबाबदार व्यक्तींवर अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यासंदर्भात व त्यांच्यावर कठोर कारवाई करणे या मागण्यासाठी वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने दिनांक ०८/०५/२०२५ रोजी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या सहयोग सोसायटी, बारामती येथील घरासमोर वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष, मंगलदास निकाळजे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करणार असल्याचे निवेदन मा.उपविभागीय अधिकारी बारामती यांना दिले आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे पुणे जिल्हाध्यक्ष राज कुमार, वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष मंगलदास निकाळजे, उपाध्यक्ष गणेश थोरात, सहसचिव कृष्णा साळुंके, जितेंद्र कवडे, किशोर मोरे, सागर गवळी, मंगेश सोनवणे, जितेंद्र जगताप, शिवाजी बनसोडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## बुद्ध विचार परिषदेसाठी डॉ जगदीश शेवते यांची निवड




**सासवड :** आधुनिक काळात बुद्ध विचारांची प्रस्तुतता व त्याची गरज याविषयी व्हिएतनाम येथील ताय हो मध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी सासवडचे सुपुत्र व नसरापूर येथील शंकरराव भेलके विद्यालयाचे मराठी भाषा प्रमुख डॉ जगदिश शेवते यांची निवड झाली आहे. २९ मे ते १ जुन या कालावधीत संपन्न होणाऱ्या या परिषदेसाठी शेवते यांना भारतीय सामाजिक विज्ञान अणुसंशोधन परिषद अर्थात आयसीएसएसआर या संस्थेने प्रवास खर्च देखील मंजुर केला आहे. सदरच्या परिषदेत डॉ शेवते बुद्धांचा पर्यावरणीय विचार याविषयी शोध निबंध सादर करणार आहेत. डॉ शेवते हे सासवडच्या साहित्य परिषदेचे कार्यकारणी सदस्य असल्याने त्यांच्या या निवडीबद्दल सासवड येथे आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानच्या संकुलात त्यांचा गौरव करण्यात आला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते, साहित्य परिषदेचे अध्यक्ष ॲड दिलीप निरगुडे, ॲड अण्णासाहेब खाडे, डॉ राजेश दळवी, कलाताई फडतरे शांताराम पोमण, कुंडलिक मेमाणे, केशव काकडे, वसंत ताकवले, संतोष काकडे, हेमंत ताकवले, सुनील लोणकर बाळासाहेब मुळीक, सतीश पाटील यांसह अनेक मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.

## शिक्षक पतसंस्थेची वार्षिकसभा खेळीमेळीत

**लोणी-धामणी :** शिक्षक पतसंस्था हि शिक्षकांची पगारधारांची पतसंस्था आहे. अडचणीच्या वेळी हि पतसंस्था शिक्षकांना आर्थिक पाठबळ देते.संस्थेचे कामकाज चांगले असल्यामुळे सभासदांना त्यांचा फायदा होतो असे प्रतिपादन ॲड.प्रदिप वळसे पाटील यांनी केले. निरगुडसर ( ता.आंबेगाव ) येथे आंबेगाव तालुका माध्यमिक शाळा सेवकांची सहकारी पतसंस्थेची ४६ वी वार्षिक सर्व साधारण सभेचे प्रमूख पाहूणे म्हणून ते बोलत होते. यावेळी पतसंस्थेचे सचिव प्रकाश तापकीर यांनी अहवाल वाचन करून सभासदांच्या प्रश्नांचे निरसन केले.त्यांना सहसचिव तानाजी रोकडे यांनी सहकार्य केले.यावेळी सभासंदाना संस्थेच्या वतीने कोणीतीच अडचण येणार नाही. याची काळजी घेतली जाते.आपली संस्था तालुक्यातील एक अग्रगण्य संस्था असून नेहमीच सभासदांच्या हिताचा विचार केला जातो.दरवर्षी संस्थेला " ऑडिट वर्ग-अ " मिळत आहे, असे अध्यक्ष प्रा. अरूण गोरडे यांनी सांगितले. यावेळी संस्थेच्या वतीने विविध विद्यालयातील सेवा निवृत होणाऱ्या मुख्याध्यापक, शिक्षक व सभासदांचा व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कांताराम टाव्हरे, कैलास येलभर, भानूदास धूमाळ, दत्तात्रय काळे, दिनेश ढोबळे, सुनंदा गोरे व संस्थेचे सर्व संचालक व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रामदास तनपूरे यांनी केले तर आभार संस्थेचे उपाध्यक्ष प्रकाश चव्हाण यांनी केले.

## दिव्यांगाचे राजकीय आरक्षण मागणीसाठी आंदोलन



**शिक्रापूर :** दिव्यांग बांधवांना राजकीय आरक्षण मिळावे या मागणीसाठी दिव्यांग बांधवांनी प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेचे प्रदेशाध्यक्ष धर्मेंद्र सातव यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र दिनी दिव्यांग बांधवांनी हातात संविधानाची प्रत घेऊन धरणे आंदोलन केले आहे. पुणे जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी राजकीय आरक्षणासाठी प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेचे माध्यमातून पुणे येथील दिव्यांग कल्याण आयुक्त कार्यालय समोर हातात संविधानाची प्रत घेऊन धरणे आंदोलन केले, यावेळी प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेचे प्रदेशाध्यक्ष धर्मेंद्र सातव, अनिता कदम, फिरोज पठाण, दत्ता भोसले, रामेश्वर मंत्री, सुरेश पाटील, सुप्रिया लोखंडे, काशिनाथ जगताप, सुनंदा बामणे, सचिन ओव्हाळ, बाळासाहेब काळभोर, विजय तांबे, नीतीन पकाले, उज्वला गाडेकर, भारती मोरे, लक्ष्मण पोकळे, रेश्मा कडलक, कुंडलिक वायकुळे, दिलीप सोनवणे, उमा काशीकर, संतोष कांबळे, अमोल माळवतकर, काशिनाथ मोरे, ज्ञानेश्वर शिंदे यांसह आदी दिव्याग बांधव उपस्थित होते.

## शेतातील सोलरपंप संच चोरी



**शिक्रापूर :** जातेगाव बुद्रुक, ता. शिरुर येथील दत्तात्रय खळदकर यांनी त्यांच्या शेतात विहिरीवर मोटार चालवण्यासाठी सोलर पंप संच बसवलेला असून ३० एप्रिल रोजी सकाळच्या सुमारास दत्तात्रय हे शेतात गेले असता त्यांना विहिरीवरील सोलर पंप संच नसल्याचे दिसून आल्याने त्यांनी आजूबाजूला पाहणी केली असता शेतातील सोलर पंप संच चोरीला गेल्याचे लक्षात आले, याबाबत दत्तात्रय सोमाजी खळदकर (५९ वर्षे, रा. जातेगाव बुद्रुक ता. शिरुर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# राज्यभरातील प्रत्येक घराघरात 'ज्ञानेश्वरी'!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून ग्रंथवाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** आळंदी येथे सुरु असलेल्या संत श्री ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जन्मोत्सवी वर्षा निमित्त आयोजित ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याच्या उद्‌घाटन दिनी राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून राज्यातील घरा घरात मोफत ज्ञानेश्वरी ग्रंथवाटप करणार असल्याची माहिती देत मंत्री भरत गोगावले यांनी महत्त्वपूर्ण घोषणा केली.

उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने आणि शिवसेना धर्मवीर आध्यात्मिक सेनेच्या माध्यमातून राज्यभर मोफत ज्ञानेश्वरी ग्रंथाचे वाटप करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

"घरात बसणाऱ्यांपेक्षा हिंदुत्वाचा विचार घेऊन जनतेत उतरलेल्या एकनाथ शिंदे यांच्यासारख्या नेत्यासोबत जाणे हेच योग्य ठरतं. त्यांचं संतविचारांवर निष्ठा आणि वारकऱ्यांप्रती प्रेम आहे," असेही ते म्हणाले.

राज्य सरकारकडून एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाने आळंदी पारायण सोहळ्यासाठी २ कोटी रुपयांचा विशेष निधी देण्यात आला असून, रायगडसारख्या शिवस्मारकांनाही वारकऱ्यांनी दर्शनासाठी अवश्य भेट द्यावी, असेही आवाहन मंत्री गोगावले यांनी केले. उपमुख्यमंत्री शिंदेंकडून शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष श्रीअक्षय महाराज भोसले पूर्णवेळ समन्वयक म्हणून आळंदी येथे उपस्थित आहेत.

उद्‌घाटन सोहळ्यात आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, ॲड. राजेंद्र उमाप, चैतन्य महाराज कबीर, पुरुषोत्तम महाराज पाटील, भगवान पोखरकर, राहुल चव्हाण, प्रकाश काळे, रोहिदास कदम आदी मान्यवर उपस्थित होते. तत्पूर्वी अखंड हरीनाम सप्ताहात बापूसाहेब मोरे यांची सुश्राव्य कीर्तन सेवा रुजू झाली. त्यांनतर आळंदी ग्रामस्थांचे वतीने अन्नदान सेवा महाप्रसाद वाटप झाला.

ज्ञानेश्वरी पारायणासह कीर्तनास भाविकांची मोठी गर्दी झाली होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्फत राज्यभर मोफत 'ज्ञानेश्वरी' वाटप करण्यात येणार आहे. आळंदीतील पारायण सोहळ्यास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी २ कोटींचा निधी जाहीर केला आहे. यामुळे सोहळ्यास भाविकांची प्रशस्त व्यवस्था, नागरी सेवा सुविधा, मंडप व्यवस्था, पर्यायांनी प्रती मोफत भाविकांना देण्यात आल्या आहेत.



## संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त

# आळंदीत अखंड हरिनाम सप्ताहाचे उद्‌घाटन

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांची प्रमुख उपस्थिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर (७५० वा) सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त अलंकापुरीत उत्साही मंगलमय, धार्मिक, भक्तिमय वातावरणात वारकरी संप्रदायास साजेसा अखंड हरिनाम सप्ताह अंतर्गत ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचा प्रारंभ डॉ. नारायण महाराज जाधव यांचे हस्ते हरिनाम गजरात झाला. हजारो वारकरी, भाविकांनी प्रतिसाद देत सोहळ्यात सहभागी झाले.

आळंदीतील या सोहळ्यास भल्या पहाटे उद्‌घाटनास महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, डॉ. नारायण महाराज जाधव, श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थानचे सह अध्यक्ष गहिनीनाथ औसेकर महाराज, आमदार बापूसाहेब पठारे, मुक्ताईनगर देवस्थानचे प्रमुख रवींद्र भैय्या पाटील, पुरुषोत्तम महाराज मोरे, माणिक महाराज मोरे, आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, विश्वस्त राजेंद्र उमाप, डॉ. भवार्थ देखणे, चैतन्य महाराज लोंढे कबीरबुवा, विश्वस्त रोहिणी पवार, विश्वस्त पुरुषोत्तम दादा पाटील, माजी नगरसेवक डी डी भोसले पाटील, माजी नगराध्यक्ष राहुल चिताळकर, वैजयंती उमरगेकर, बबनराव कुऱ्हाडे, नंदकुमार कुऱ्हाडे, संजय घुंडरे, आळंदी ग्रामस्थ, वारकरी, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोहळ्याचे उदघाटन प्रसंगी विना पूजन, प्रतिमा पूजन, दीप प्रज्वलन वेदमंत्र जयघोषात झाले. श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यातील ग्रंथ पूजन प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब यांचे हस्ते हरिनाम जयघोषात झाले. यावेळी पारायण नेतृत्व कोष्टी महाराज यांनी आपल्या सुश्राव्य वाणीतून केले. पहिल्या दवशी पहिले तीन अध्याय पारायण घेण्यात आले. आळंदी भक्तीनगरी भाविकांचे स्वागतास सजली असून विविध ठिकाणी कमानी, माउली मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली. धार्मिक पर्वणी भाविकांना लाभली आहे. ओळख श्री ज्ञानेश्वरी परिवाराने केलेल्या आवाहनास प्रतिसाद देत अनेक महिला बचत गटातील महिला, शाळांतील विध्यार्थी, शिक्षकांनीही या पारायण सोहळ्यात सहभाग घेतला आहे.सोहळ्यात पहाटे सहा ते रात्री अकरा या वेळात विविध कार्यक्रम होणार आहेत. यात पारायण, कीर्तन, चरित्र कथा चिंतन, प्रवचन, हरिपाठ, संगीत भजन आदींचा समावेश आहे. सोहळ्यातील ज्ञान यज्ञात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे. आळंदी देवस्थान चे वतीने माऊलींची प्रतिमा देत मान्यवरांना सन्मानित करण्यात आले.



### ज्ञानेश्वरी आचरणात आली पाहिजे

मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी सोहळयास सद्दिच्छा दिल्या. ते म्हणाले, श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास एवढ्या पहाटे पासून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित आहेत. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या साडेसातशे व्या जन्मोत्सवी वर्षा निमित्त तसेच संत नामदेवांच्या ६७५ व्या समाधी वर्षे, संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या सदेह वैकुंठ गमना वर्ष पूर्ती निमित्ताने तीनही योग आलेत. येथे मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा होत आहे. या सोहळ्याचे आयोजनात संस्थान आणि गावकरी यांचा सोहळ्यात समन्वय दिसत आहे. त्याबद्दल खूप आनंद व्यक्त करतो. ज्ञानेश्वरीवर बोलण्याची माझी पात्रता नाही. मात्र ज्ञानेश्वरीचे जवळ आहे. मी आज जो आहे तो चौथ्या वर्षी कळत नव्हतं अशा वेळेला निरक्षर सही पण करता न येणाऱ्या वडिलांनी ज्ञानेश्वरी वाचनाचा आग्रह झाला. काहीच कळत नव्हतं. तेव्हापासून सातत्याने ज्ञानेश्वरी वाचनाचा माझ्यावर परिणाम आहे. ज्ञानेश्वरी वाचताना ती समजली पण पाहिजे. आणि आचरणात पण आली पाहिजे. समजल्याशिवाय आचरणात आणता येत नसल्याचे सांगत ते दहा मिनिटे ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायणात ज्ञानेश्वरी वाचण्यास बसले.

## सरपंचपदी कोणाची वर्णी, उरुळी कांचनमध्ये चर्चांना वेग



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** उरुळी कांचनचे सरपंच अमितबाबा कांचन यांनी राजीनामा दिल्याने नव्याने या पदावर कोण आरुढ होणार याकडे सगळ्यांच्या नजरा लागल्या असून, याबाबत वेगवेगळ्या चर्चा, बैठकांना जोर आला असल्याचे वास्तव चित्र उरुळी कांचन मध्ये पाहायला मिळत आहे. सरपंच निवडीची अधिकृत तारीख अजून ठरलेली नाही.

अमित कांचन यांनी दिलेला राजीनामा २१ एप्रिलच्या ग्रामपंचायत कार्यकारी मंडळाच्या मासिक बैठकीमध्ये मंजूर करण्यात आलेला आहे. या राजीनामा मंजुरीच्या घटनेला सरपंच अमितबाबा कांचन यांनी दुजोरा दिला आहे. ग्रामपंचायतीची मुदत संपायला अवघे ७ महिने बाकी असताना व सरपंच पद सर्वसाधारण गटासाठी आरक्षित असताना या पदावर आरुढ होण्यासाठी, निवडणूकी नंतर या ना त्या कारणाने मतलबी राजकारणात, कधी एकत्र तर कधी वेगळे राहणाऱ्या १७ जणांच्या टोळीतून, सध्या तरी चार जण प्रबळ दावेदार आहेत. यामध्ये दोन महिला, एक ओबीसी प्रवर्गातून निवडून आलेला पुरुष व एक सर्वसाधारण पुरुष दावेदार मानले जातात.

उरुळी कांचन हे पुणे शहराजवळ वसलेले व वेगाने विकसित होत असलेले उपनगर असून, या गावात १७ सदस्य असणारी ग्रामपंचायत आहे. २०२० साली झालेल्या ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुकीत १७ जागांवर १२ - ३ - २ अशा गटबाजीतून सदस्य निवडून आले. सामोपचाराने १२ जणांच्या गटाने सरपंच व उपसरपंच पदी समन्वयातून प्रत्येकाला संधी देण्याच्या भूमिकेतून सत्ता काबीज करण्याला प्राधान्य दिले. मात्र त्यानंतर हे १७ ही जण आपल्या वार्डातील विकास कामांच्या संदर्भात एकत्र येऊन त्यांच्या मधील विरोधाची दरी कमी झाली. आणि त्यातून तीन सदस्य निवडून आणत, ग्रामपंचायत मध्ये पाऊल ठेवलेले अमितबाबा कांचन हे सरपंच होण्याची किमया घडली! आता या पदावर कोण आणि तो किती दिवसासाठी आरुढ होतोय याकडे नजरा लागल्या आहेत.

## बारामती परिमंडलातील वीज कर्मचाऱ्यांचा गौरव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** जागतिक कामगार दिनाच्या निमित्ताने महावितरण बारामती परिमंडलातील ७४ वीज कर्मचाऱ्यांचा मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला आहे. यामध्ये १३ यंत्रचालक तर ६१ तारमार्ग कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

विभागातून एका यंत्रचालकाची तर उपविभागातून एका वीज कर्मचाऱ्याची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्यानुसार अनुक्रमे १३ यंत्रचालकांना व ६१ तारमार्ग कर्मचाऱ्यांना पुरस्कार मिळाले. यावेळी मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, अधीक्षक अभियंता दिपक लहामगे, सहा. महाव्यवस्थापक (मासं) धैर्यशील गायकवाड, कार्यकारी अभियंते संजय गायकवाड, म्हसू मिसाळ, संजय सोनवलकर, विशाल शिवतरे व प्रमोद रागीट, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्रीकृष्ण वायदंडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रोहित राख यांनी केले.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना मुख्य अभियंता धर्मराज पेठकर म्हणाले, पुरस्कारामुळे कामाची जबाबदारी आणखी वाढते. वीज कर्मचाऱ्यांनी कामे करताना वीजगळती रोखणे, शंभर टक्के थकबाकी वसूल करणे, अखंडित वीजपुरवठा करणे यांसह वीज सुरक्षेला प्राधान्य दिले पाहिजे. फाजील आत्मविश्वासामुळे अपघात घडतात. त्यामुळे कामे करताना सुरक्षा साधनांचा वापर केला पाहिजे.



# माळवाडीच्या सख्ख्या बहिणी झाल्या प्रथमच पोलीस




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** उजनी धरण पाणलोट क्षेत्रातील माळवाडी नंबर दोन येथील दोन सख्या बहिणी पोलीस दलात सेवा बजावत आहेत. या दोघी बहिणी राष्ट्रीय खेळाडू असून देखील दोघींनी आपल्या कर्तृत्वावर पोलीस खात्यात प्रवेश मिळवून आपली प्रतिमा उजळवली व गावाचा मानसन्मान उंचावला.

दोन्ही मुलींची पहिल्यापासून पोलीस होण्याची इच्छा होती. दोन्ही मुलींना त्यांनी दत्तात्रय व्यवहारे यांच्या इंदापूर येथील ज्युडो कराटे अकॅडमीमध्ये घातले. त्यानंतर भूतानमध्ये झालेल्या स्पर्धेत काजलने लक्षवेधी कामगिरी करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर तिने ज्यूडो राज्यस्तरीय स्पर्धेत सिल्वर, कुराश नॅशनल स्पर्धेत ब्रांझ, हाफकिडो इंटरनॅशनल स्पर्धेत गोल्ड तसेच बेल्टरेस्टिंग राज्यस्तरीय स्पर्धेत गोल्ड मेडल मिळवून आपली कामगिरी उंचावली. दोन वर्षांपूर्वी तिची पोलीस खात्यात निवड झाली. ती आता पिंपरी चिंचवड पोलीस ठाण्यांतर्गत दिघी येथे सेवा करत आहे.

शिवानी ही सुद्धा उत्तम ज्युडो खेळाडू आहे. बेल्ट रेसलिंग राज्यस्तरीय स्पर्धेत तिने गोल्ड, ज्युडो राज्य स्तरीय स्पर्धेत तिने गोल्ड पदक संपादन केले. थोरली बहीण काजल प्रमाणेच पोलीस खात्यात जाण्याचे तिने निश्चित केले. दोघींचे पोलीस होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी श्री. जाधव यांनी त्यांना बारामती येथील सह्याद्री अकॅडमीमध्ये प्रवेश दिला. काजल हिची पोलीस दलात निवड झाली. तिच्या पावलावर पाऊल ठेवत शिवानी हिने देखील पोलीस बनण्यासाठी कष्ट घेतले. आता शिवानी पोलीस भरती झाली.

मध्यंतरी क्रीडा, युवक कल्याण व अल्पसंख्याक मंत्री दत्तात्रय भरणे, इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मधुकर भरणे, ज्युडो कराटे अकॅडमीचे अध्यक्ष दत्तात्रय व्यवहारे, शहा हेल्थ क्लबचे भरत शहा, बाळासाहेब गुंडेकर, पंचायत समितीचे माजी सदस्य सतीश पांढरे यांनी दोघींचा सत्कार केला. दोघांचे प्राथमिक शिक्षण माळवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, माध्यमिक शिक्षण श्री नारायणदास रामदास हायस्कूल, महाविद्यालयीन शिक्षण इंदापूर महाविद्यालयात झाले.

मात्र या गावच्या दोन्ही लेकी पोलीस झाल्याने या गावात लोकांना कौतुक वाटत आहे. आपले स्वप्न पूर्ण झाल्यामुळे दोघी बहिणी आनंदी आहेत, तर मुलींचे स्वप्न पूर्ण करण्यास मदत केल्याने आई वडील समाधानी आहेत.

जोश



# एन्जॉय होममेड केक

दोस्तांनो, उन्हाच्या उद्रेकात बाहेर पडावेसे वाटत नसताना जिभेचे चोचले कसे पुरवायचे हा प्रश्न पडतो. त्यातच एखाद्याचा वाढदिवस असेल तर काय करायचं? बट, नो वरी...अगदी मोजक्या साहित्यात झटपट घरीच केक करता येईल.

**झटपट रेसिपी**

**सामग्री:** पाव वाटी मैदा दोन चमचे साखररहित कोको पावडर, पाव चमचा बेकिंग पावडर, दोन चमचे साखर, चिमुटभर मीठ, दोन चमचे तेल, एक चमचा चॉकलेट स्प्रेड, पाव कप दूध इत्यादी.

**कृती:** हे सगळं साहित्य एका मोठ्या बाऊलमध्ये एकत्र करुन नीट फेटून घ्या. आता हे मिश्रण मायक्रोवेव्ह सेफ मगमध्ये भरुन बेकिंगसाठी ठेवावं. दहा मिनिटांमध्ये केक तयार होतो. तयार केकवर चॉकलेट स्प्रेड पसरा.

# ताण घेऊ नकोस

मी गेली दोन वर्षं एका मुलासोबत रिलेशनशीपमध्ये होते. आम्ही या नात्याकडे गांभीर्याने बघत होतो. मात्र मित्राला परदेशी नोकरी मिळाल्यानंतर लॉंग डिस्टन्स रिलेशनशीप नको असल्याने आम्ही ब्रेक अपचा निर्णय घेतला. पण त्यानंतर फक्त दोन महिन्यांमध्येच तो नव्या रिलेशनशीपमध्ये असून लवकरच त्या मुलीशी लग्न करणार असल्याचं एका कॉमन फ्रेंडकडून समजलं आहे. खरं तर मला त्याच्याबद्दल आनंदच आहे, पण इतक्या लवकर तो माझं प्रेम विसरल्याचं दु:खही आहे. या घटनेमुळे प्रेमाकडे बघण्याचा माझा दृष्टिकोनच बदलला आहे. या नैराश्यातून मी कशी बाहेर पडू?

**मॅच मेकिंग**

– एखाद्या नात्याकडे बघण्याची प्रत्येकाची पद्धत वेगळी असते. कोणी लवकर मूव्ह ऑन करतो तर कोणाला अधिक वेळ लागतो. त्यामुळे ब्रेक अप नंतर तुझ्या बॉयफ्रेंडने लगेचच नवं नातं स्वीकारलं यात चुकीचं काही नाही आणि तू थोडा वेळ घेत आहेस हेदेखील सामान्य आहे. म्हणूनच विनाकारण ताण घेऊ नकोस. कोणत्याही कॉमन फ्रेंडच्या माध्यमातून अथवा सोशल मीडियावरुन एक्स बॉयफ्रेंडबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न करु नकोस. आता तू पूर्णपणे तुझ्या करिअरकडे आणि भविष्याकडे लक्ष दे. म्युच्युअली ब्रेक अपचा निर्णय घेतला असल्यामुळे स्वत:ला अपराधी समजू नकोस.



# मुलांना जपणारे 'माझे घर'

**गरीब पार्श्वभूमीतील मुलांची परिस्थिती पाहून शरद आणि संगीता जरे यांनी त्यांच्या शिक्षणासाठी पावले उचलली खरी, पण त्यांना वेगवेगळी कौशल्ये शिकवली तरच भविष्य सुरक्षित होईल हे समजल्यामुळे त्यांनी आपल्या नियोजनात बदल केला. या जोडप्याने औसा तालुक्यातील बुधोडा गावाजवळ १४ एकर जागेवर 'माणूस प्रतिष्ठान' द्वारे चालवण्यात येणारा 'माझे घर' हा आश्रम स्थापन केला.**



महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील एका खेड्यातील एका जोडप्याने वंचित मुलांना शिक्षित आणि स्वावलंबी बनवण्यासाठी एक निवारास्थान उभारले आहे. आता हे दांपत्य ५१ मुला-मुलींचे पालक आहेत. गरीब पार्श्वभूमीतील मुलांची परिस्थिती पाहून शरद आणि संगीता जरे यांनी त्यांच्या शिक्षणासाठी पावले उचलली खरी, पण लवकरच त्यांना समजले की या मुलांना वेगवेगळी कौशल्ये शिकवली तरच त्यांचे भविष्य सुरक्षित होईल. त्यामुळे त्यांनी आपल्या नियोजनात योग्य तो बदल केला.

या जोडप्याने औसा तालुक्यातील बुधोडा गावाजवळ १४ एकर जागेवर 'माणूस प्रतिष्ठान' या त्यांच्या संस्थेद्वारे चालवण्यात येणारा 'माझे घर' हा आश्रम स्थापन केला. हा आश्रम १.१० एकरवर बांधला असून उर्वरित जमीन शेतीसाठी वापरली जाते. येथे मुले येथे विविध पिके घेतात. शरद जरे या कामाबद्दल सांगतात की, 'महात्मा गांधींनी १९३७ मध्ये खेडी स्वतंत्र आणि स्वावलंबी बनविण्याचे स्वप्न घेऊन 'नई तालीम' ही संकल्पना मांडली होती. त्याचप्रमाणे मला माझ्या मुलांना स्वावलंबी बनवायचे आहे. आम्ही मुलांना वस्तूंचा पुनर्वापर करून शिल्पे आणि इतर वस्तू बनवायला शिकवतो.'

मुलांच्या कष्टातून पिकलेला शेतीमाल आणि हस्तकला यांच्या विक्रीतून आश्रमाचा खर्च भागवला जातो. या जोडप्याने गेल्या काही वर्षांत विविध कौटुंबिक पार्श्वभूमीतील आलेल्या ५१ मुलांना दत्तक घेतले आहे. यातील काही 'रेड-लाइट' भागातील मुले आहेत तर काही अनाथ, ऊस तोडणाऱ्यांची मुले आहेत. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांचाही त्यात समावेश आहे. मास कम्युनिकेशनमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन केलेले शरद पुढे सांगतात, '२०१६ मध्ये पुण्यात एका आदिवासी मुलीला रोप स्टंट करताना पाहून वंचित मुलांसाठी काम करण्याची कल्पना माझ्या मनात आली. ती मुलगी खूप हुशार होती, पण गरीब कुटुंबातील असल्यामुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागले होते.'

**अचिव्हर**

बरेचदा संधीच्या कमतरतेमुळे अशा पार्श्वभूमीतील मुले अंमली पदार्थांचे सेवन आणि गुन्हेगारीच्या दुष्टचक्रात अडकतात. हे लक्षात घेऊन या जोडप्याने सुरुवातीला म्हणजेच २०१९ मध्ये ७० मुलांसह परळी तालुक्यातील वंटकाली गावातील डोंगराळ भागात आश्रम सुरू केला होता, परंतु राजकीय दबावामुळे दोन वर्षांनंतर त्यांना तो सोडावा लागला. त्यानंतर ते अंबेजोगाई, काटगाव येथे गेले आणि शेवटी गेल्या वर्षी मार्चमध्ये लातूर जिल्ह्यात स्थलांतरित झाले. त्यांच्या आश्रमात सध्या सहा ते १६ वर्षे वयोगटातील मुले राहत असून काहींना जवळच्या शाळेत प्रवेश दिला जातो तर बाकीच्यांना आश्रमातच शिकवले जाते.

## फंडू एसएमएस

मिल जाता है दो पल का सुकुन
चंद यारों की बंदगी में,
वरना परेशां कौन नहीं
अपनी अपनी जिंदगी में।

किसी की सलाह से रास्ते जरूर
मिलते हैं।
पर मंजिल तो खुद की
मेहनतसेही मिलती है।

न बोलूं न लिखूं तो ये मत
समझना
कि भूल गए हम,
खामोशियों ने भी कुछ
जिम्मेदारी
ले रखी है।

## स्मार्ट ट्रिक्स

### असा पाठवा झटपट मेसेज


व्हॉट्स ॲपवर टाईप न करता मेसेज पाठवता आला तर...




यासाठीची एक युक्ती आहे. तुम्ही व्हॉट्स ॲप युजरचं अकाउंट ओपन करून की बोर्डवर क्लिक करा. वरच्या बाजूला माईकच्या चिन्हावर टॅप करून तुम्हाला जो मेसेज पाठवायचा आहे तो तोंडाने बोला. हा मेसेज आपोआप टाईप होईल आणि सेंड बॉक्समध्ये दिसेल. आता सेंडच्या पर्यायावर क्लिक करून मेसेज पाठवा. यामुळे टाईप करण्याचा त्रास वाचेल.

## ॲप वर्ल्ड

### प्ले स्टोअरवर खास फीचर



गुगल ही प्रसिद्ध टेक कंपनी गुगल प्ले स्टोअरवर एक खास फीचर आणणार आहे. अँड्रॉइड वापरकर्त्यांना लवकरच गुगल प्ले स्टोअर बदललेले दिसेल. यामध्ये युजर्सना बायोमेट्रिक सपोर्ट मिळेल, जो गुगल अकाउंट पासवर्ड रिप्लेस करेल. तेव्हा गुगल प्ले स्टोअर वरील बायोमेट्रिक पडताळणीसाठी सेटिंग्जवर नेव्हिगेट करा. यानंतर तुम्हाला बायोमेट्रिक सत्यापन टॉगल करण्याचा पर्याय मिळेल. येथे गुगल खात्याचा पासवर्ड टाकावा लागेल. ही प्रक्रिया अधिक सोपी केली जाईल, असे आश्वासन गुगल देत आहे.

## स्मार्ट टिप्स

### पोस्टसाठी पैसे मोजा




'एक्स' चे सीईओ एलोन मस्क यांनी सशुल्क सेवा सुरू केली आहे. या सेवेअंतर्गत तुम्हाला ब्लू टिकसाठी पैसे द्यावे लागतील. पूर्वी ते मोफत उपलब्ध होते. अर्थात त्यासाठी काही अटीही होत्या. मात्र आता नवीन वापरकर्त्यांना पोस्टिंगसाठी पैसे द्यावे लागतील. अर्थात ही रक्कम कमी असेल. नवीन धोरणानुसार 'एक्स' वर पोस्ट करणे, एखाद्याच्या पोस्ट लाइक करणे, पोस्ट बुकमार्क करणे आणि पोस्टला उत्तर देणे यासाठीही तुम्हाला पैसे द्यावे लागतील. कोणत्याही खात्याचे अनुसरण करणे मात्र विनामूल्य असेल.

## उपयुक्त

### वाढेल प्रतिकारशक्ती



वजन कमी करण्यासाठी तसेच उन्हाळ्यातील शारीरिक त्रास कमी करण्यासाठी दही अवश्य खा. दह्यामध्ये प्रोबायोटिक्स भरपूर प्रमाणात असतात, जे तुमच्या आतड्यांचे आरोग्य सुधारण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करतात. विशेषत: उन्हाळ्यात वाढत्या तापमानामुळे पचनाच्या समस्या सामान्य असतात तेव्हा दही हा एक सोपा उपाय ठरु शकतो. हवामानातील बदलामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते आणि संसर्गाचा धोका वाढतो. अशा परिस्थितीत दह्यातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे गुणधर्म आजारांना कारणीभूत असणाऱ्या जंतूंशी लढण्यास मदत करतात.

# कारकीर्द निसर्गाशी जोडणारी

तुम्हाला निसर्गाप्रती प्रेम असेल, जंगलं, प्राणी, पक्षी, किटक यांमध्ये रमायला आवडत असेल तर निसर्गतज्ज्ञ म्हणून काम करता येईल. ऑफबीट अशा या करीअरमध्ये आज असंख्य संधी आहेत. निसर्गाकडे अनेकांचा कल वाढतो आहे. निसर्ग संवर्धनाची जाणीव होते आहे. अशा परिस्थितीत निसर्गतज्ज्ञ लोकांना मार्गदर्शन करू शकतात.

**करीअरवेध**

आपल्या देशात अनेक अभयारण्यं आणि राष्ट्रीय उद्यानं आहेत. इथे गेल्यावर प्राणी, पक्षी दुरून बघण्यापेक्षा त्यांची योग्य ती माहिती मिळाली तर भटकंतीचा अनुभव अनेक अर्थांनी समृद्ध होत जातो. जंगलांमधल्या बऱ्याच गोष्टी आपल्याला माहीत नसतात. सर्वसामान्यांना ती दृष्टी नसते. एखाद्या पक्ष्याचा आवाज काहीतरी संदेश देत असतो. हरणांचं ओरडणं वाघ येत असल्याची वर्दी असू शकते. निसर्गतज्ज्ञांना या सर्वांचं ज्ञान असतं.

राष्ट्रीय उद्यानांमध्ये येणाऱ्या पर्यटकांना मार्गदर्शन करण्याचं काम निसर्गतज्ज्ञ करतात. वन विभागाशी सहकार्य करून गाईड्सना प्रशिक्षण देण्याचं कामही ते करतात. जंगलात सर्वेक्षण करतानाही यांची मदत घेतली जाते. शास्त्रज्ञांनाही त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ होतो. बायोसायन्स किंवा पर्यावरण व्यवस्थापनासारख्या विषयांमध्ये पदवी मिळवल्यानंतर तुम्ही या क्षेत्राकडे वळू शकता. नोकरी करण्यासोबतच तुम्ही स्वत:चा व्यवसाय सुरू करू शकता. टूर्स आयोजित करता येतील.





# सफर जादुई बेटांची

महाराष्ट्रात भटकंतीची अनेक ठिकाणं आहेत. कोकणातले रम्य समुद्रकिनारे आपल्याला आकर्षित करतात. यासोबतच महाराष्ट्रातली काही बेटंही भटकंतीचा चांगला पर्याय ठरू शकतात. कोरोनाची तीव्रता कमी झाल्यावर जवळपास भटकंती करण्याचा विचार करत असाल तर या बेटांची सफर करायला हरकत नाही.

**भटकंती**

✻ मुंबईपासून काही किलोमीटर अंतरावर असणाऱ्या घारापुरीच्या लेण्या म्हणजे एलिफंटा केव्हज. युनेस्कोने या लेण्यांना पुरातन वास्तूचा दर्जा दिला आहे. मुंबईतले गेट वे ऑफ इंडियापासून बोटीने घारापुरीला जाता येईल. इथे अनोखी वास्तुशिल्प न्याहाळता येतील.

✻ तुम्ही खंडेरी बेटाला भेट देऊ शकता. निसर्गसौंदर्याने नटलेल्या या बेटावर कान्होजी आंग्रे प्रकाशगृह आहे. अलीबागच्या जवळ असणाऱ्या या बेटाची सफर एक भन्नाट अनुभव ठरू शकतो.

✻ वसई खाडीतलं पंजू बेट भटकंतीचा ऑफबीट पर्याय आहे. इथे फारशी गर्दी नसते. त्यामुळे निवांतपणा अनुभवण्यासाठी इथे जाता येईल. या बेटाला ऐतिहासिक महत्त्व आहे. या वेटावर वाहनांची वर्दळही नसते. त्यामुळे इथे पक्षी निरिक्षण, मासेमारीही करता येईल. कोरोनाची बंदी उठल्यानंतर थोडा निवांतपणा अनुभवण्यासाठी या बेटावर जायला हरकत नाही. इथला निसर्ग तुमच्या मनाला नवतजेला देऊन जाईल.

# प्रवास होईल हायटेक

सध्या प्रवाशांसाठी बाजारात नवनवीन गोष्टी उपलब्ध आहेत. तुम्हीही प्रवासाची आखणी करत असाल तर कूल-पॉट्सपासून पासकोड लॉकपर्यंतच्या सामानाचा अवश्य विचार करा. हे स्मार्ट लगेज बाळगले तर प्रवास सुरक्षित आणि सुखाचा होईल तसेच तो हायटेक बनवेल. यामध्ये जीपीएस ट्रॅकिंग, बायोमेट्रिक्स, बिल्ट-इन-चार्जर्ससारखे कनेक्टिव्हिटी असे नानाविध पर्याय उपलब्ध आहेत.

स्मार्ट लगेजमध्ये तुम्हाला इन-बिल्ट चार्जिंग पॉवर बँकची सुविधा मिळते, ज्यामुळे तुम्हाला चार्जिंग पॉइंट शोधण्याची गरज भासणार नाही. तुम्ही फोन-लॅपटॉप बॅगेत किंवा सुटकेसमध्ये ठेवून चार्ज करू शकता. खेरीज प्रगत लॉकिंग सिस्टीममध्ये बायोमेट्रिक्सची सोय आहे. त्यामुळे तुमचे फिंगरप्रिंट स्कॅन केल्याशिवाय सामान उघडणार नाही. काही स्मार्ट सामान बायो-मेट्रिक्ससह ब्लूटूथ लॉकसह देखील येतात, जे सुरक्षिततेचा अतिरिक्त स्तर जोडतात. यामुळे तुमच्या वस्तू अधिक सुरक्षित होतात. अनेक स्मार्ट सामान जीपीएस ट्रॅकिंगसहदेखील येतात, ज्यामुळे तुम्हाला सामानाचा रिअल-टाइम ट्रॅक करता येतो.



स्मार्ट लगेजमध्ये अनेक कनेक्टिव्हिटी पर्याय आहेत, जे तुम्हाला सामानाशी जोडलेलेच ठेवत नाहीत, तर इंटरनेटशी कनेक्ट राहण्यातही मदत करतात. बाजारातील काही निवडक स्मार्ट लगेज मॉडेल्समध्ये वायफाय हॉट-स्पॉट देखील असतात. यामुळे तुम्ही प्रवासात देश आणि जगाशी कनेक्टेड राहू शकता. तुम्ही ई-मेल आणि व्हॉट्सपवरही मेसेज पाठवू शकता.

**जाणून घ्या**

असे असले तरी स्मार्ट सामान खरेदी करण्यापूर्वी काही गोष्टी लक्षात ठेवा. स्मार्ट सामान खरेदी करण्यापूर्वी, तुम्हाला कोणत्या वैशिष्ट्यांची आवश्यकता आहे आणि कोणती नाही हे ठरवा. फीचर्सच्या आधारे किंमतही ठरवली जाते. तेव्हा गरजेनुसार फीचर्स शॉर्टलिस्ट करा आणि पैसे वाचवा. तुम्ही विमानाने बराच प्रवास करत असाल तर बॅटरीबद्दल काही माहिती तुमच्या स्मार्ट लगेजमध्ये ठेवा. जसे की एअरलाइन्समधील लिथियम आयन बॅटरीचे धोरण काय आहे आणि त्यानुसार तुमचे स्मार्ट लगेज किती आहे हे बघा. एअरलाइन कंपनीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तुम्ही काही स्मार्ट लगेच केबिनमध्ये घेऊ शकत नाही. स्मार्ट सामान निवडण्यापूर्वी, आपल्याला किती सुरक्षिततेची आवश्यकता आहे याची खात्री करा. तुम्हाला बायोमेट्रिक लॉक्स किंवा आरएफआयडी लॉक्सची गरज आहे का, ते तपासा आणि नंतरच खरेदी करा.

# चेक युवर चेक्स

दोस्तांनो, चेक्स म्हणजे चौकटीच्या डिझाइनचे शर्ट तुमच्या वॉर्डरोबचा भाग असतात. मात्र चेक्सचा प्रत्येक शर्ट सारखाच नसतो. या चेक्समध्येही वेगवेगळे प्रकार आहेत. तुम्हीही चेक्सचे वैविध्यपूर्ण शर्ट कॅरी करू शकता. चेक्सच्या विविध प्रकारांविषयी...

✻ ग्राफ चेक्स हा चेक्सचा सर्वसाधारण प्रकार आहे. ग्राफ चेक्सचा शर्ट एखाद्या ग्राफ पेपर सारखा दिसतो. असे शर्ट उन्हाळ्यासाठी अगदी परफेक्ट आहेत. ग्राफ चेक्सचा फिकट रंगाचा शर्ट खरेदी करा. अशा शर्टसोबत गडद रंगाची ट्राउझर किंवा चिनोज शॉर्ट कॅरी करता येईल. या लूकसोबत लोफर्स छान दिसतील.

**फॅशन पॅशन**

✻ प्लेड किंवा टर्टन चेक्सचा प्रकारही लोकप्रिय आहे. बोल्ड आणि आकर्षक रंगाच्या उभ्या आडव्या पट्ट्यांनी सजलेला हा शर्ट तुमच्या लूकला चार चांद लावतो. प्लेड चेक्सचा नाईट सूट खरेदी करायला हरकत नाही. सध्याच्या उष्ण हवामानात असे आरामदायी कपडे घालणं योग्य ठरेल.



✻हाउंडस्टूथ हा प्रकारही स्टायलिश दिसतो. हाउंडस्टूथ चेक्सचं बॉम्बर जॅकेट छान दिसेल.

✻ गिंघम चेक्सची भाव खाऊन जातात. सध्याच्या काळात गिंघम चेक्सचे बंदाना स्कार्फ खरेदी करा.

✻ शेफर्ड चेक्स हा प्रकारही छान दिसतो. शेफर्ड चेक्सचा लॉंग शर्ट रिप्ड डेनिमसह कॅरी करा. कॅज्युअल स्निकर्स घाला आणि मस्त दिसा.







# पराभवानंतरही लखनौ प्लेऑफमध्ये?

## आव्हान अद्याप जिवंत; उर्वरित तिन्ही सामने जिंकावेच लागणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चेन्नई :** आयपीएलमध्ये रविवारी पंजाब किंग्सविरुद्ध झालेल्या सामन्यात लखनौला ३७ धावांनी पराभव स्वीकाराला लागला आहे. लखनौचा हा यंदाच्या हंगामातील ६ वा पराभव आहे. या पराभवानंतर लखनौचा संघ गुणतालिकेत सातव्या क्रमांकावर घसरला आहे. मात्र, पंजाबविरुद्धच्या सामन्यात पराभव झाला असला तरी त्यांच्या प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आशा अद्यापही जिवंत आहे.



लखनौने आतापर्यंत ११ सामने खेळले असून त्यापैकी ५ सामन्यात विजय मिळवला आहे. ते १० अंकांसह सातव्या स्थानावर आहे. अशातच लखनौला आणखी ३ सामने खेळायचे आहेत. प्लेऑफच्या शर्यतीत राहण्यासाठी प्रत्येक संघाला किमान १६ अंकाची गरज आहे. त्यामुळे लखनौला प्लेऑफच्या शर्यतीत राहण्यासाठी पुढील तिन्ही सामने जिंकावे लागणार आहेत.

IPL 2025 SRH vs DC : हैदराबादसाठी आज अस्तित्वाची लढाई; तर दिल्लीला विजयपथावर येण्याची आशा, कशी असेल दोघांची प्लेइंग XI?

जर लखनौने तिन्ही सामने जिंकले तर त्यांचे एकूण १६ अंक होतील. मात्र, एकही सामना गमावल्यास त्यांच्या प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आशेवर पाणी फेरणार आहे. लखनौचे पुढचे तीन सामने गुजरात, हैदराबाद आणि बंगळुरूशी होणार आहे. यापैकी दोन सामने घरच्या मैदानावर तर एक सामना अहमदाबादमध्ये होणार आहे.

या तिन्ही संघांपैकी हैदराबादचे प्लेऑफमधील आव्हान संपुष्टात आलं आहे. तर गुजरात आणि बंगळुरूचा संघ अद्यापही प्लेऑफच्या शर्यतीत आहे. त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे दोन्ही संघ सध्या चांगल्या फॉर्ममध्ये आहे. त्यामुळे लखनौसाठी ही लढत म्हणावी तितकी सोप्पी नक्कीच नाही.

लखनौचे आव्हान अद्याप जिवंत असले, तरी त्यांचे आता तीन सामने बाकी आहेत. त्यामुळे लखनौला आता फक्त १६ पॉइंट्सपर्यंतच पोहचता येणार आहे. त्यामुळे त्यांना आता प्लेऑफमध्ये पोहचायचे असेल, तर उर्वरित तिन्ही सामने जिंकावेच लागणार आहेत. याबाबत पंजाबविरुद्धच्या पराभवानंतर लखनौचा कर्णधार रिषभ पंतने प्रतिक्रिया दिली आहे.

धरमशाला येथे झालेल्या या सामन्यात पंजाब किंग्सने लखनौसमोर विजयासाठी २३७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनौला २० षटकात ७ बाद १९९ धावाच करता आल्या.

या सामन्यानंतर रिषभ पंत म्हणाला, 'नक्कीच खूप जास्त धावा होत्या. जेव्हा तुम्ही चुकीच्यावेळी महत्त्वाचे झेल सोडता, तेव्हा त्याचे परिणाम चांगले होत नाहीत. आम्ही सुरुवातीला योग्य लेन्थ पकडू शकलो नाही. पण हा खेळाचाच एक भाग आहे.'

## १६ अंक घेऊनही RCB चा प्लेऑफमधील प्रवेश लांबणीवर



**पुणे :** प्लेऑफची शर्यत यंदा चांगलीच रंगतदार झाली आहे. अद्यापही सात संघ प्लेऑफच्या शर्यतीत कायम आहेत. आयपीएल 2025 मध्ये साखळी सामने अंतिम टप्प्यात असून लवकरच प्लेऑफच्या सामन्यांना सुरुवात होणार आहे. मात्र, प्लेऑफची शर्यत यंदा चांगलीच रंगतदार झाली आहे. अद्यापही सात संघ प्लेऑफच्या शर्यतीत कायम आहेत. प्लेऑफमध्ये पोहोचण्यासाठी या संघांना किमान 16 गुण मिळवणे आवश्यक आहे. बंगळुरूच्या संघाने हा 16 गुणांचा टप्पा पार केला आहे. पण इतर सहा संघ असे आहेत, जे 16 गुण मिळवू शकतात. त्यामुळे आरसीबीचा प्लेऑफमधील प्रवेश लांबणीवर पडला आहे. आरसीबीने 11 सामने खेळले असून 8 सामन्यांत विजय मिळवला आहे. ते गुणतालिकेत 16 गुणांसह पहिल्या स्थानावर आहेत. आरसीबीला आणखी 3 सामने खेळायचे आहेत. यापैकी त्यांनी एक सामना जरी जिंकला तरी त्यांचे 18 गुण होतील. त्यानंतर त्यांचा प्लेऑफमध्ये प्रवेश निश्चित होणार आहे.

# जसप्रीत बुमराहचं उपकर्णधारपद कायमचं गेलं?

## बीसीसीआय नव्या चेहऱ्याच्या शोधात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जसप्रीत बुमराहऐवजी कसोटी संघाचं उपकर्णधारपद शुभमन गिल किंवा रिषभ पंत यांच्याकडे जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



यंदाचं वर्ष भारताचा जलदगती गोलंदाज आणि भारताच्या भात्यातलं ब्रह्मास्त्र म्हणून ओळखला जाणारा जसप्रीत बुमराह याच्यासाठी काही फारसं चांगलं जाताना दिसत नाही. वर्षाच्या सुरुवातीलाच ऑस्ट्रेलिया दौऱ्यात बुमराहच्या नेतृत्वाखाली भारतीय संघानं एक कसोटी सामना जिंकला. त्याव्यतिरिक्त दोन कसोटी सामन्यातही त्यानं नेतृत्व केलं. पण तेव्हापासून बुमराहच्या सातत्याला घरघर लागली. भारतीय कसोटी संघाचा उपकर्णधार असणाऱ्या बुमराहला या वर्षी एकही कसोटी मालिका पूर्ण खेळता आलेली नाही. या पार्श्वभूमीवर बुमराहचं उपकर्णधारपद कायमचं जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

येत्या जून महिन्यात भारताचा कसोटी संघ रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. या मालिकेत पाच सामने खेळवले जाणार आहेत. पण वैयक्तिक कारणांमुळे बुमराहला या सर्व पाच सामन्यांत खेळता येणार नसल्याचं स्पष्ट झालंय. या पार्श्वभूमीवर आता निवड समितीकडून कसोटी उपकर्णधारपदासाठी नव्या नावाचा विचार केला जात असल्याचं म्हटलं आहे.

## पाचव्या पूना क्लब रॅकेट लीग २०२५ स्पर्धा

# वेकफील्ड डिलाइट्स, स्टॅश प्रो परमार ऑल स्टार्स संघ विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पूना क्लब लिमिटेड यांच्या तर्फे आयोजित पाचव्या पूना क्लब रॅकेट लीग स्पर्धेत साखळी फेरीत वेकफील्ड डिलाइट्स, स्टॅश प्रो परमार ऑल स्टार्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सुरुवात केली.

पूना क्लबच्या टेबलटेनिस, टेनिस, बॅडमिंटन, स्क्वॅश, पिकलबॉल कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत पहिल्या सामन्यात वेकफील्ड डिलाइट्स संघाने मानव अव्हेंजर्स संघाचा 262-253 असा पराभव करून विजयी सलामी दिली. बॅडमिंटन प्रकारात समीर सॅलियन, सतीश मुंदडा, विनय मूतल्याल, प्रकाश भुतरा, देव घुवालेवाला, रामचंद्रन यांच्या विजयी कामगिरीच्या जोरावर डिलाइट्स संघाने अव्हेंजर्स संघाचा 74-58 असा तर, टेनिसमध्ये चेतन घुवालेवाला, देव घुवालेवाला, लियान अक्कलकोटकर, प्रकाश भुतरा, उदित बंसल, आकाश धलवानी यांच्या सुरेख खेळीच्या जोरावर डिलाइट्स संघाने अव्हेंजर्स संघाचा 63-27 असा पराभव करून संघाला भक्कम आघाडी मिळवून दिली. टेबल टेनिसमध्ये अव्हेंजर्स संघाने डिलाइट्सचा 69-43 असा तर, स्क्वॅशमध्ये अव्हेंजर्स संघाने डिलाइट्सचा 41-34असा पराभव करून हि आघाडी कमी केली.



अखेरच्या पिकलबॉल प्रकारात अव्हेंजर्स संघाने डिलाइट्सचा 58-48 असा पराभव केला. पण डिलाइट्स संघाने आपले वर्चस्व कायम राखत सामन्यात विजय मिळवला.

दुसऱ्या लढतीत स्टॅश प्रो परमार ऑल स्टार्स संघाने मनप्रीत अँड जीजीज जॅग्वार्स संघाचा 298-194 असा पराभव करून धडाकेबाज सुरुवात केली.

बॅडमिंटनमध्ये मृणाल शहा, पंकज शहा, संजय बजाज, आनंद शहा, अद्विका परमार, सुशांत पवार, विवेक पंजाबी, विकास सूद यांच्या खेळीच्या जोरावर ऑल स्टार्स संघाने जॅग्वार्सचा 74-43 असा तर, टेनिसमध्ये मृणाल शहा, आदित्य, बीएस राजपुरोहित, अमन संचेती यांच्या कामगिरीच्या जोरावर ऑल स्टार्स संघाने जॅग्वार्स संघाचा 57-37 असा पराभव केला. टेबल टेनिसमध्ये मृणाल शहा, रायान राजगोपाल, पंकज शहा, वरून श्रीवास्तव यांच्या उत्कृष्ट खेळीच्या जोरावर ऑल स्टार्स संघाने जॅग्वार्सचा 68-52 असा तर, स्क्वॅशमध्ये अरण थवानी, मृणाल शहा यांच्या खेळीच्या जोरावर ऑल स्टार्स संघाने जॅग्वार्स संघाला 41-25 असे पराभूत करून संघाला विजयी आघाडी मिळवून दिली. पिकलबॉलयामध्ये ऑल स्टार्स संघाने जॅग्वार्स संघाचा 58-37 असा पराभव करून संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

## टीम इंडियाचा आयसीसीमध्ये दबदबा; पाकिस्तानची वाईट अवस्था



**पुणे :** आयसीसीने जाहीर केलेल्या ताज्या क्रमवारीत टीम इंडियाने दोन फॉरमॅटमध्ये वर्चस्व राखले आहे, तर ऑस्ट्रेलिया कसोटी क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे. भारतीय संघाशी स्पर्धा करणाऱ्या पाकिस्तानची इथेही अधोगती पाहायला मिळाली आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं जाहीर केलेल्या ताज्या क्रमवारीत ऑस्ट्रेलियाने कसोटीत, तर टीम इंडियाने वन डे व ट्वेंटी-२० संघात अव्वल स्थान कायम राखले आहे. या व्यतिरिक्त श्रीलंकेने तिन्ही फॉरमॅटमध्ये मोठी झेप घेतली आहे. मे २०२४ पासूने ते आतापर्यंत खेळलेल्या सामन्यातील १०० टक्के रँकिंग आणि मागील दोन वर्षांच्या ५० टक्के रँकिंगच्या मुल्यांकनावर ही क्रमवारी ठरवली गेली आहे.

जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचे गतविजेत्या ऑस्ट्रेलियाने कसोटी क्रमवारीत अव्वल स्थान पटवाले आहे, परंतु त्यांची आघाडी १५ वरून १३ गुणांवर आली आहे. पॅट कमिन्सचा हा संघ १२६ गुणांसह अव्वल स्थानावर आहे, तर इंग्लंडने ११३ गुणांसह दोन स्थानांची सुधारणा करताना दुसरे स्थान पटकावले आहे. दक्षिण आफ्रिका ( १११) व भारत ( १०५) अनुक्रमे तिसऱ्या व चौथ्या क्रमांकावर आहे. न्यूझीलंडने ( ९५) अव्वल पाचमध्ये आपले स्थान टिकवले आहे. त्यानंतर श्रीलंका, पाकिस्तान, वेस्ट इंडिज, बांगलादेश, झिम्बाब्वे असा क्रम येतो. आयर्लंडला पुढील १२ महिन्यात एक कसोटी खेळावी लागेल आणइ त्यानंतर ते रँकिंगसाठी पात्र ठरतील, तर अफगाणिस्तानला याच कालावधीत तीन कसोटी सामने खेळावे लागतील.

वन डे क्रमवारीत भारताने अव्वल स्थान कायम राखले आहे, तर श्रीलंकेने मोठी झेप घेतली आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ विजेत्या भारताने १२२ वरून १२४ गुण वाढवताना अव्वल स्थानावरील पकड मजबूत केली आहे. उपविजेता न्यूझीलंडचा संघ दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि त्यांनी ऑस्ट्रेलियाला तिसऱ्या क्रमांकावर ढकलले आहे. श्रीलंकेने घरच्या मैदानावर वर्चस्व राखताना भारत व ऑस्ट्रेलियाविरुद्ध वन डे मालिका जिंकली होती. त्यामुळे ते पाकिस्तानला बाजूला करून चौथ्या क्रमांकावर आले आहेत.

# मास्टर्स कप २०२५ क्रिकेट स्पर्धेत विनायक द्रविड इलेव्हन व श्रीकांत कल्याणी इलेव्हन यांच्यात अंतिम लढत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** द पिनॅकल ग्रुप व द नेचर मुकाईवाडी पुरस्कृत मास्टर्स कप 2025क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत विनायक द्रविड इलेव्हन, श्रीकांत कल्याणी इलेव्हन या संघांनी आपली विजयी मालिका कायम ठेवत अंतिम फेरीत प्रवेश केला.



पीवायसी हिंदू जिमखाना क्रिकेट मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत पहिल्या लढतीत अमेय श्रीखंडे 67धावा व 1-6) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर श्रीकांत कल्याणी इलेव्हन संघाने श्रीकांत जाधव इलेव्हन संघाचा 37 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना श्रीकांत कल्याणी इलेव्हन संघाने 10 षटकात 6 बाद 132 धावा केल्या.

सहा गडी बाद झाल्याने संघाची अंतिम धावसंख्या 102धावा (वजा30 धावा) झाली. यात अमेय श्रीखंडेने धडाकेबाज खेळी करत 20 चेंडूत 2चौकार व 9षटकारासह 67 धावा चोपल्या. त्याला राहुल कानडे 22, हेमंत आठल्ये 15 यांनी धावा काढून साथ दिली. याच्या उत्तरात श्रीकांत जाधव इलेव्हन संघाला 10 षटकात 5बाद 65धावा(वजा25 धावा) करता आल्या. यात दिगंबर वाघमारे 28, निरंजन गोडबोले 11 यांनी थोडासा प्रतिकार केला. विजयी संघाकडून नितीन हर्डीकर(2-11), अमेय श्रीखंडे(1-6), राहुल कानडे(1-17), हेमंत आठल्ये(1-18) यांनी सुरेख गोलंदाजी करत संघाला 37 धावांनी विजय मिळवून दिला.

दुसऱ्या लढतीत गजानन राडकर(2-9) याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर विनायक द्रविड इलेव्हन संघाने संजय कोंढाळकर इलेव्हन संघावर 8 गडी राखून विजय मिळवत अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. श्रीकांत कल्याणी इलेव्हन संघाने 10 षटकात 6 बाद 132 धावा केल्या.

## १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेचे ६ मे पासून आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्पोटर्सफिल्ड मॅनेजमेंट तर्फे चौथ्या 'स्पोटर्सफिल्ड करंडक' अजिंक्यपद १२ वर्षाखालील २५-२५ षटकांच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ६ ते २१ मे २०२५ या कालावधीते सातारा रस्त्यावरील टेंभेकर फार्म्स ॲकॅडमीच्या मैदानावर होणार आहे.

या स्पर्धेबाबत अधिक माहिती देताना स्पोटर्सफिल्ड मॅनेजमेंटचे संचालक आणि स्पर्धेचे संचालक सनी मारवाडी यांनी सांगितले की, स्पर्धेचे हे चौथे वर्ष असून आंतरक्लब स्पर्धेत १२ वर्षाखालील वयोगटातील एकूण १० निमंत्रित संघ सहभागी झाले आहेत. स्पर्धेचा प्रत्येक सामना हा २५-२५ षटकांचा असणार असून अंतिम सामना ३०-३० षटकांचा असणार आहे.

साखळी आणि बाद फेरीमध्ये होणाऱ्या या स्पर्धेत २२ याडर्स क्रिकेट ॲकॅडमी, आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमी, किरण क्रिकेट ॲकॅडमी, स्पार्क क्रिकेट ॲकॅडमी, स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लिनिक, अष्टपैलु स्पोटर्स ॲकॅडमी, ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमी, क्लब ऑफ महाराष्ट्र, क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमी ब संघ आणि स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट ॲकॅडमी या १० निमंत्रित संघांमध्ये विजेतपदाची चुरस पहावयास मिळणार आहे. स्पर्धेतील विजेत्या संघाला आणि उपविजेत्या संघाला मेडल्स् आणि करंडक मिळणार आहे.

## वॉरीयर्स स्पोटर्स तर्फे आयोजित 'वॉरीयर्स करंडक' आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेत

# वॉरीयर्स ॲकॅडमी, ज्युनिअर चॅम्प्स् संघांची विजयी सलामी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वॉरीयर्स स्पोटर्स तर्फे आयोजित 'वॉरीयर्स करंडक' १५ वर्षाखालील मुलींच्या आंतरक्लब क्रिकेट दिवस-रात्र स्पर्धेत वॉरीयर्स ॲकॅडमी आणि ज्युनिअर चॅम्प्स् या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सलामी देत शानदार सुरूवात केली.

फुरसुंगी येथील वॉरीयर्स क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत निहीरा शर्मा हिने फटकावलेल्या तडाखेबाज शतकी खेळीच्या जोरावर ज्युनिअर चॅम्प्स् संघाने एसएआरके ॲकॅडमीचा ११० धावांनी एकतर्फी पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना ज्युनिअर चॅम्प्स् संघाने ३५ षटकामध्ये २११ धावांचा डोंगर उभा केला. निहीरा शर्मा हिने ८३ चेंडूत १८ चौकार आणि एका षटकारासह १०७ धावांची खेळी करून स्पर्धेतील पहिले शतक नोंदविले.



निहीराला दुसऱ्या बाजुने आर्या जांभुळकर हिने ५७ धावांची खेळी करून योग्य साथ दिली. या दोघींनी दुसऱ्या गड्यासाठी १२४ चेंडूत १४७ धावांची मोठी भागिदारी करून संघाला मोठी धावसंख्या गाठून दिली. या धावसंख्येचा पाठलाग करताना एसएआरके ॲकॅडमीचा डाव १०१ धावांवर गडगडला.



आर्या शेवाळे हिने केलेल्या ८६ धावांच्या जोरावर वॉरीयर्स ॲकॅडमीने एसपीएम ॲकॅडमीचा २२ धावांनी पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना वॉरीयर्स ॲकॅडमीने ३५ षटकात १७६ धावा धावफलकावर लावल्या. सलामीची फलंदाज आर्या शेवाळे हिने १०८ चेंडूत ११ चौकारांसह ८६ धावांची खेळी केली. उर्शिता सणशे हिने ३७ धावांची खेळी केली. या दोघांनी १०८ चेंडूत ८७ धावांची सलामी देत संघाचा डाव उभा केला. याला उत्तर देताना एसपीएम ॲकॅडमीचा डाव १५४ धावांवर मर्यादित राहीला.

एसपीएमकडून अनुसया कबाडे (३२ धावा) आणि तनुजा माळी (२१ धावा) यांनी प्रतिकार केला. गोलंदाजीमध्ये रागिणी चव्हाण हिने ३ गडी बाद केले. शरयु गायकवाड आणि रेहा थॉमस यांनी प्रत्येकी दोन गडी टिपले.

#रा